मराठी महाराष्ट्राचा बुलंद आवाज

# महासागर

» मुंबई कार्यालय
बोरा बजार स्ट्रीट, फोर्ट, मुंबई - ४०० ००१.
फोन : ०२२ ३१८५ ०७३५

» पालघर कार्यालय
२०८/बी, लोकमान्य बिल्डींग, तालुका पंचायत समिती कार्यालयासमोर, पालघर, ४०१४०४ मो. ९८९२९६८७२५

» नाशिक कार्यालय
'आनंदी', कोतवाल पार्क, टिळकवाडी, वेद मंदिरासमोर, धामणकर कॉर्नर, नाशिक ४२२००२. मो. ९८९०१०९९७८

» वितरण
मो. नं. ८४२४९३६४३६

मुंबई | RNI No.: MAHAMAR/2016/79101 | » बुधवार, २५ जून २०२५ | » वर्ष: १० » अंक: ५६ | » पाने-८ | » किमत रू. २ + वितरण खर्च रू. १ एकूण रू.३

## मराठवाड्यात वादळी वाऱ्यासह पावसाची शक्यता

**मुंबई , दि. २४ प्रतिनिधी**

राज्यभरात पुढील पाच दिवस पावसाला पोषक स्थिती तयार झाली असून मराठवाड्यात आजपासून २८ जूनपर्यंत पावसाची हजेरी राहणार असल्याचे प्रादेशिक हवामान केंद्रानं सांगितले आहे. मराठवाड्यात अनेक भागात वादळी वारा व मेघगर्जनेसह पावसाची शक्यता आहे. प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबई येथून प्राप्त झालेल्या अंदाजानुसार दिनांक २४ व २५ जून रोजी छत्रपती संभाजी नगर, जालना, नांदेड, परभणी व हिंगोली जिल्ह्यात, दिनांक २६ जून रोजी छत्रपती संभाजी नगर व जालना जिल्ह्यात तूरळक ठिकाणी वादळी वारा, मेघगर्जना, वाऱ्याचा वेग अधिक (ताशी ३० ते ४० कि.मी.) राहून हल्क्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाची शक्यता आहे. मराठवाड्यात दिनांक २४ जून रोजी काही ठिकाणी तर दिनांक २५ व २६ जून रोजी तूरळक ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या तर दिनांक २७ व २८ जून रोजी तूरळक ठिकाणी हलक्या स्वरूपाच्या पावसाची शक्यता आहे.

# शक्तिपीठ महामार्गाच्या भूसंपादनाला मान्यता

## शक्तिपीठ महामार्ग १८ तीर्थक्षेत्रांना जोडणार; राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत ८ महत्वाचे निर्णय

**मुंबई, दि. २४ प्रतिनिधी**

राज्य सरकारच्या मंत्रिमंडळाची कॅबिनेट बैठक आज मंत्रालयात संपन्न झाली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या आजच्या बैठकीत शक्तिपीठ महामार्गास मंजुरी देण्यात आली आहे. शक्तिपीठ महामार्गाच्या भूसंपादनाला मान्यता देण्यात आली आहे. राज्यातील १८ तीर्थक्षेत्रांना जोडणाऱ्या या महामार्गास अनेक जिल्ह्यात शेतकऱ्यांचा विरोध असतानाही मंत्रिमंडळ बैठकीत मंजुरी देण्यात आल्याने शेतकरी व आंदोलक आक्रमक होण्याची चिन्हे आहे. तसेच, राज्यात वस्तू व सेवा कर विधेयक आणण्याचा निर्णयही या बैठकीत घेण्यात आला आहे.



महाराष्ट्र शक्तीपीठ महामार्ग - पवनार (जि.वर्धा) ते पत्रादेवी ( जि. सिंधुदुर्ग) या महाराष्ट्र गोवा सरहद्द शिघ्रसंचार द्रुतगती महामार्गास मान्यता. राज्यातील साडेतीन शक्तिपीठ , दोन ज्योतिर्लिंग आणि पंढरपूर अंबेजोगाई सहित १८ तीर्थक्षेत्रांना जोडणारा शक्तिपीठ महामार्ग. प्रकल्प महामंडळामार्फत राबवणार, प्रकल्पाच्या आखणीस तसेच भूसंपादनासाठी २० हजार कोटी रुपयांच्या तरतुदीस मान्यता. (सार्वजनिक बांधकाम विभाग)

### इतर निर्णय पुढिलप्रमाणे

आदिवासी शासकीय वसतीगृहांमधील विद्यार्थ्यांच्या निर्वाह भत्ता, शैक्षणिक साहित्य खरेदी भत्ता व आहार भत्यामध्ये वाढ. दरमहा मिळणाऱ्या निर्वाह व आहार भत्त्यात दुपटीने वाढ, वार्षिक शैक्षणिक साहित्य खरेदी भत्त्यात भरीव वाढ. (आदिवासी विकास विभाग)

कोयना धरणाच्या पायथा विद्युतगृहाच्या प्रकल्पास सुधारित प्रशासकीय मान्यता. (जलसंपदा विभाग)

महाराष्ट्र वस्तू व सेवा कर अधिनियम, २०१७ मध्ये सुधारणा करून, आगामी अधिवेशनात महाराष्ट्र वस्तू व सेवा कर विधेयक आणणार. (वित्त विभाग)

सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम कंपन्यांसाठी महाराष्ट्र कर, व्याज, शास्ती किंवा विलंब शुल्क यांच्या थकबाकीतील तडजोडीसाठी सुधारणा विधेयक आणणार. (वित्त विभाग)

वांद्रे पूर्व येथील उच्च न्यायालयासाठी आरक्षित भूखंडावरील विस्थापितांसाठी द्यावे लागणारे ३१ कोटी ७५ लाख रुपयांचे शुल्क माफ. याठिकाणचे विस्थापितांचे अनिवासी व निवासी गाळे सार्वजनिक बांधकाम विभागास निशुल्क हस्तांतरीत होणार. (सार्वजनिक बांधकाम विभाग)

पिंपरी - चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील मौ. चिखली येथील "दफनभुमी" च्या १ हेक्टर ७५ आर क्षेत्रापैकी ४०% क्षेत्र (७००० चौ.मी.) मैला शुध्दीकरण केंद्रासाठी (STP) वापरण्यास मंजुरी. (नगर विकास विभाग)

महाराष्ट्र नागरी पायाभूत सुविधा विकास कर्ज योजनेंतर्गत हडको संस्थेकडून घेण्यात येणाऱ्या २ हजार कोटींच्या कर्जास शासन हमी देण्याचा, त्यापोटीचे हमी शुल्क माफ करण्याचा निर्णय. यात छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्य पाणी पुरवठा प्रकल्पाच्या हिश्श्यापोटीचे ८२२ कोटी २२ लाख, नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या चार मलनिःसारण प्रकल्पासाठी २६८ कोटी ८४ लाख रुपये व मिरा-भाईंदर महापालिकेच्या पाणी पुरवठा प्रकल्पाच्या हिश्श्यापोटीच्या ११६ कोटी २८ लाख रुपयांच्या मागणीचा समावेश. (नगरविकास विभाग)

## अग्राग्रलेख खरीखरी

### नकट्यांचा सीझफायर

जगातील सर्वाधिक मानलेला नेत्यान्याहू नावाचा नरपुंगव आणि नोबेलसाठी आसुसलेले भारतद्रोही ट्रम्प या दोघांचेही नाक इराणने छाटून टाकले आहे. इराणने कालपर्यंत जे जे पराक्रम केले. त्याची नक्कीच इतिहासात नोंद होईल. नेत्यान्याहू नावाचा एक हृदयविहीन इसम जो इस्रायलचा प्रधानमंत्री आहे. तो इराणला दूषणे देत होता. मानवतेची आठवण करून देत होता. पण जेव्हा गाझावर याच नेत्यान्याहुने अनेक अमानुष अत्याचार केले. लहान बालकांवरही अनन्वित छळाचार केले. हजारोंना ठार मारले. 'असूनी खास मालक घराचा' असा असणारा गाझा गरज नसताना रक्तबंबाळ झाला. तोपर्यंत सदासर्वदा विजय मिळवणाऱ्या इस्रायलला कुणीही महागुरू मिळाला नव्हता. जो हमासने हल्ला केला तो हमासचा घोर अपराध होता. हे मान्यच करावे लागेल. त्यानंतर इस्रायलने निरपराधांचा जो जीवघेणा संहार केला. त्याला काय म्हणायचे. त्याचाच बदला इराणने घेऊन टाकलेला आहे. अमेरिकेच्या भिकेवर इस्रायल सारख्या कुत्र्याला बैल झाल्याचा भास झाला होता. पण इराणने इस्रायलचा घास आपल्या घशात घालून त्याची अशी काही भंबेरी उडवली आहे की, आता यापुढे दहा हजार वर्षे इस्रायल इराणचा ई सुद्धा तोंडाने उच्चारणार नाही. इस्रायल जवळ बारा दिवस लढण्याची ताकद होती. त्यात इस्रायलला असे वाटले की, दोन ते चार दिवसात इराणला नामोहरम करून आपण विजेता होऊ. त्यांना इराणवर आक्रमणाचे निमित्त हवे होते. म्हणून संयुक्त राष्ट्रसंघाने इराणकडे अणू युद्धाची शक्ती नाही. हे स्पष्ट केल्यावरही इस्रायलने पहिला हल्ला केला. त्यानंतर इराणने केलेले पलटवार इस्रायलने स्वप्नातही कल्पना सारखे नव्हते. असे हल्ले इस्रायलने कधीच पाहिले नव्हते. कोणे एकेकाळी मध्यपूर्वेतील पाच-सहा राष्ट्रांना एकाच वेळी इस्रायलने धूळ चारली होती. त्यावेळी त्यांना चढलेली नशाही इराणने काही झापडीमध्येच खटाखट उतरवून टाकली. दोन-तीन दिवसांपूर्वी इस्रायल नेस्तनाबूत होण्याच्या काठावर आला होता. नंतर त्याने चक्क एका दुसऱ्या नकट्याला म्हणजेच अमेरिकेच्या ट्रम्पला आपल्या नकट्या नाकाने इराणचे नाक कापण्याची विनंती केली. हपापलेल्या ट्रम्पने झपाटलेल्या नेत्यान्याहुचे एकून इराणवर हल्ला करण्याची चूक केली. हल्ला करायचा म्हणून, जे नाही ते आहे. अशी हाकाटी पेटवून अणू-अणू करत जणू काय अमेरिकेवरच अणू हल्ला होणार आहे. अशा अविर्भावात तथाकथित शांतिदूत ट्रम्पने आपली अस्त्रे डागली. लगेच त्यानंतर इराण आता शरणागती पत्करणार असे घोषितही करून टाकले. परंतु, इराणला ना याने ओळखले. ना त्याने ओळखले. इराणने त्यांच्या हल्ल्याला जराही धूप न घालता प्रतिहल्ला करण्याची केवळ धमकीच दिली नाही. तर इमानदारीने अमेरिकेला इशारा देऊन कतारच्या अमेरिकी सैनिक तळावर हल्ला केला. इराणला जर मानव संहार करायचा असता. तर त्याने पूर्वसूचना न देताही हल्ला केला असता. पण माणुसकी शाबूत असल्यामुळे अमेरिकेच्या एकाही सैनिकाला ठार केले नाही. तरीही त्या सैनिकी तळाला मारमार मारून अमेरिकेला आपला हिसका दाखवूनच दिला. इराण प्रेमाने एकत नाही. धमकीला तो मानत नाही. शरण येण्याचे नाव काढत नाही आणि आपल्या राक्षसपुत्र म्हणजे नेत्यान्याहू व त्याच्या राष्ट्राला आपल्या संहार करण्याच्या अस्त्राने संपवू शकतो. हे ट्रम्पच्या डोक्यात फिट बसल्यामुळे इकडून तिकडून मस्का मारून, आगाऊ पणासाठी प्रसिद्ध असलेल्या ट्रम्पने आपल्या कापलेल्या नाकाला साक्षी ठेवून सीझफायर म्हणजे शस्त्रसंधीची घोषणा करून टाकली. त्याने सीझफायर साठी तीन तासांचा अवधी दिला. तो अगदी संपण्याच्या पाच मिनिटे अगोदर इराणने इस्रायलच्या शहरांवर जबरदस्त मारा करून त्यांचे प्रचंड मोठे नुकसान केले. त्यानंतर नकट्या इस्रायलला आपल्या आकाच्या म्हणजेच ट्रम्पच्या आदेशाचे उल्लंघन करणे शक्य नव्हते. म्हणजे इराणने सीझफायर पूर्वीच्या वेळेचा सदुपयोग करून धूम धडाक्याने केलेला घणाघाती हल्ला मुजोर इस्रायलला मूग गिळून पचवावा लागला. त्यानंतर इराणने स्पष्टच म्हटले की, सीझफायर नंतर आम्ही हल्ला केलेला नाही. पण इस्रायलने जराही हूं किंवा चूं केले, तर त्याची खैर आम्ही अजिबात करणार नाही. आता ट्रम्पला नोबेलसाठी आपले नामांकन दाखल करायला हरकत नाही. आपण एक नव्हे तर दोन युद्धांमध्ये आगाऊगिरी करून नकट्या नाकाने का होईना, सीझफायर करून टाकले. म्हणूनच आपण नोबेल साठी नोबल मॅन आहोत असे समजून उद्या ट्रम्पने स्वतःलाच नोबेल पुरस्काराची घोषणा केल्यास आम्हाला नवल वाटणार नाही. कसेही असो, या दोन नकट्यांच्या सीझफायरमुळे जगाला दिलासा मिळाला आहे. तिसरे विश्व युद्ध टळले आहे, असे सध्या तरी वाटते. हाच काय तो दिलासा!

nagpurpost@gmail.com
Mob.No.9922970023

# फडणवीसांच्या मतदारसंघात पाच महिन्यांत आठ टक्के मतदार वाढले

## राहुल गांधींचा मोठा दावा

**नवी दिल्ली, दि. २४ वृत्तसंस्था**

लोकसभेचे विरोधी पक्षनेते व काँग्रेसचे माजी अध्यक्ष राहुल गांधी यांनी २०२४ च्या महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीच्या मतदानात मोठा घोळ झाल्याचा दावा सातत्याने केला आहे. त्यांनी वेगवेगळ्या अहवालांचा दाखला देत मतदानाच्या दिवशी शेवटच्या तासांत वाढलेल्या मतदानाची आकडेवारी, वाढलेले मतदार यासह मतदानाच्या निकालावर सातत्याने प्रश्न उपस्थित केले आहेत. दरम्यान, राहुल गांधी यांनी दावा केला आहे की मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मतदारसंघातही मतदानाच्या आधी शेवटच्या पाच महिन्यांत अचानक आठ टक्के मतदार वाढले होते. मतदानाच्या दिवशी अनेक बूथवर अचानक २० ते ५० टक्के मतदार वाढल्याचं निदर्शनास आलं आहे.

राहुल गांधी यांनी महाराष्ट्राच्या विधानसभा निवडणुकीत शेवटच्या क्षणात वाढलेल्या मतदारांवरून सातत्याने आक्षेप घेतला आहे. आता त्यांनी देवेंद्र फडणवीस यांच्या मतदारसंघातील मतदानावरून प्रश्न उपस्थित केले आहेत. राहुल गांधी यांनी एक्सवर एक पोस्ट शेअर केली आहे. या पोस्टमध्ये त्यांनी न्यूजलॉन्ड्री या संकेतस्थळावरील माहिती शेअर करत म्हटलं आहे की मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मतदारसंघात (दक्षिण-मध्य नागपूर) शेवटच्या पाच महिन्यांमध्ये आठ टक्के मतदार वाढले आहेत. तर, काही बूथवर २० ते ५० टक्के मतदार वाढले. काँग्रेस खासदार राहुल गांधी यांनी महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीवेळी वाढलेल्या मतदारांच्या संख्येवरून निवडणूक आयोगाला सतत्याने प्रश्न विचारले आहेत. आता त्यांनी फडणवीसांच्या मतदारसंघातील आकडेवारीवरून मोठा दावा केला आहे. राहुल गांधी म्हणाले, "बूथ स्तरावरील अधिकाऱ्यांनी (BLOs) अज्ञात व्यक्तींनी मतदान केल्याची तक्रार केली आहे. ज्यांच्या पत्त्यांची पडताळणी झालेली नाही असे हजारो मतदार प्रसारमाध्यमांनी शोधून काढले आहेत. मात्र, या सगळ्यावर निवडणूक आयोगाने मौन बाळगलं आहे. निवडणूक आयोगही या घोटाळ्यात सहभागी आहे का?



असा प्रश्न देखील निर्माण होत आहे असे अनेक घोळ समोर येत आहेत. ही एक प्रकारची मतांची चोरी आहे. मात्र निवडणूक आयोग व सरकार हे सगळं झाकण्याचा प्रयत्न करतंय. हीच त्यांची कबुली नव्हे का? म्हणूनच आम्ही मशीन-रीडेबल डिजिटल मतदार याद्या आणि मतदानाचं सीसीटीव्ही फूटेज प्रसिद्ध करण्याची मागणी करत आहोत."

# झूठ बोले कौवा काटे , काले कौवे से डरियो...

## मुख्यमंत्र्यांचे राहुल गांधींना प्रत्युत्तर

**मुंबई, दि. २४ प्रतिनिधी**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राहुल गांधी यांच्या व्होट चारीच्या आरोपांना जोरदार उत्तर दिले आहे. झूठ बोले कौवा काटे , काले कौवे से डरियो... असे एक्सवर पोस्ट करत फडणवीस म्हणाले की, राहुल गांधी यांची महाराष्ट्रातील पराभवाची वेदना दिवसेंदिवस वाढत जात आहे.परंतू कुठपर्यंत तुम्ही हवेतच तीर चालवत राहणार ? तुमच्या माहीतीसाठी सांगतो की महाराष्ट्रात असे २५ हून अधिक मतदार संघ आहेत.ज्यात लोकसभा आणि विधानसभा दरम्यान ८ टक्के मतदार वाढले आहेत.

महाराष्ट्रातील २५ मतदार संघात लोकसभा आणि विधानसभा निवडणूकांदरम्यान ८ टक्क्यांहून अधिक मतदार वाढले आहेत आणि अनेक जागी काँग्रेसही जिंकलेली आहे.माझ्या दक्षिण-पश्चिम नागपूर मतदार संघाला लागून असलेल्या पश्चिम नागपुर मतदार संघात ७ टक्के (२७,०६५) मतदार वाढले आणि तेथून काँग्रेसचे विकास ठाकरे निवडून आले आहेत असे देवेंद्र फडणवीस यांनी आपल्या या ट्वीटमध्ये म्हटले आहे.

आपल्या या ट्वीटमध्ये देवेंद्र फडणवीस पुढे म्हणतात की उत्तर नागपूर मतदार संघात ७% (२९,३४८) मतदार वाढले आणि तेथून काँग्रेसचे नितीन राऊत जिंकले आहेत. अशाच प्रकारे पुणे जिल्ह्यातील वडगाव शेरी मतदार संघात १०% (५०,९११) मतदार याच काळात वाढले आणि तेथे शरद पवार गटाचे बापूसाहेब पाठारे जिंकले आहेत. मालाड पश्चिम येथे ११% (३८,६२५ ) मतदार वाढले आणि तेथे काँग्रेस पक्षाचे अस्लम शेख निवडून आले आहेत. मुंब्रा येथे ९% (४६,०४१) मतदार वाढले आणि तेथे शरद पवार गटाचे जितेंद्र आव्हाड निवडून आले आहेत.

सहकारी पक्षाच्या जाऊ देत परंतू स्वत:च्या पक्षाच्या अस्लम शेख, विकास ठाकरे, नितिन राऊत सारख्या जुन्या सहकाऱ्यांशी तरी ट्वीट करण्यापूर्वी राहुल गांधी बोलले असते तर चांगले झाले असते असा टोला देवेंद्र फडणवीस यांनी राहुल यांना लगावला आहे. कमीत कमी काँग्रेसमधील संवादाच्या अभावाचे इतके वाईट प्रदर्शन तरी झाले नसते असे फडणवीस यांनी म्हटले आहे.

## सुरू करूया आता लढा

मातृभाषेचा टाहो ऐका, आज हाक मारते मराठी
असून स्वामिनी दारावरती, पहा भीक मागते मराठी....
आव आणून काही सांगती , आम्ही मराठीचे तारणहार,
माय मारुनी मावशीसाठी, त्यांनी उघडले मागील दार...
मायबोलीच्या शिलेदारांनो, चला करू आवाज खडा,
पुरे जाहली सहिष्णूता, सुरू करूया आता लढा ...
सुरू करूया आता लढा

गजानन तुपे ,
मुख्य वृत्तसंपादक- दैनिक महासागर

# १ जुलैपासून रेल्वे प्रवास महागणार

**नवी दिल्ली, दि. २४ वृत्तसंस्था**

रेल्वे प्रवाशांसाठी एक धक्कादायक बातमी समोर आली आहे. भारतीय रेल्वे १ जुलैपासून एसी आणि नॉन-एसी मेल तसेच एक्सप्रेस सेवांसह लांब पल्ल्याच्या विविध प्रवासी गाड्यांच्या वर्गांमध्ये भाड्यात थोडी वाढ करणार आहे. नॉन-एसी मेल आणि एक्सप्रेस गाड्यांच्या भाड्यात प्रति किलोमीटर १ पैसे इतकी वाढ होणार आहे, तर एसी वर्गासाठी भाड्यात प्रति किलोमीटर २ पैसे इतकी वाढ केली जाणार आहे. लोकलच्या भाड्यात कोणतेही वाढ करण्यात आलेली नाही. १ जुलै २०२५ पासून लागू होणाऱ्या नव्या भाडा रचनेनुसार, उपनगरीय गाड्या आणि मासिक सीझन तिकिटांच्या दरांमध्ये कोणताही बदल होणार नाही. तसेच, साधारण सेकंड क्लासमध्ये ५०० किलोमीटरपर्यंतच्या प्रवासासाठी देखील भाड्यात कोणतीही वाढ केली गेलेली नाही.

मात्र, ५०० किलोमीटरहून अधिक अंतरासाठी प्रवास करणाऱ्यांसाठी भाड्यात प्रति किलोमीटर ०.५ पैसे इतकी वाढ केली जाईल.

# माळेगाव साखर कारखाना निवडणुकीत अजितदादांची बाजी

## सरकारी पदावर असताना मी कधीही सहकारी संस्थाची निवडणूक लढवली नाही; शरद पवार

**बारामती, दि. २४ प्रतिनिधी**

माळेगाव साखर कारखाना निवडणुकीवरून शरद पवारांनी अजित पवारांनी टीका केली आहे. सरकारमध्ये मोठ्या पदावर असलेल्या व्यक्तींनी सहकारी संस्थांच्या निवडणुका लढवू नये, मी माझ्या ४० वर्षांच्या कारकिर्दीत सरकारी पदावर असताना कधीही सहकारी संस्थांच्या निवडणुका लढलो नाही असं शरद पवार म्हणाले. ते बारामतीत पत्रकारांशी अनौपचारिक गप्पा मारत होते. माळेगाव सहकारी साखर कारखान्याच्या निवडणुकीच्या निकालाचे चित्र स्पष्ट झालं आहे. त्यामध्ये अजित पवारांच्या निळकंठेश्वर पॅनेलला घवघवीत यश मिळाल्याचं दिसून येतंय. त्याचवेळी शरद पवारांनी त्यांच्यावर



नाव न घेता टीका केल्याचं दिसून आलं. राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार हे स्वतः कारखान्याच्या निवडणुकीत उभे आहेत.

आपण आपल्या ४० वर्षांच्या कारकिर्दीत, सरकारी पदावर असताना सहकारी संस्थांची निवडणूक निवडणूक लढवली नाही. विरोधकांना काही अडचण आली तर सरकारी पदावरील व्यक्ती जो कारखान्याचा प्रमुख असेल, तर तो विरोधकांना न्याय कसा देईल? असं शरद पवार म्हणाले. माळेगाव सहकारी साखर कारखान्यासाठी २२ जून रोजी मतदान प्रक्रिया पार पडली. या निवडणुकीमध्ये अजित पवारांचे निळकंठेश्वर पॅनेल, शरद पवारांच्या नेतृत्वाखाली बळिराजा सहकार बचाव पॅनेल, भाजप नेते चंद्रराव तावरे- रंजन तावरे यांचे सहकार बचाव शेतकरी पॅनेल आणि कष्टकरी शेतकरी समिती, अपक्षांचे एक पॅनेल, असे चार पॅनेल या निवडणुकीच्या रिंगणात होते. या निवडणुकीचा पहिला निकाल हाती आला असून 'ब वर्ग गटातून' उपमुख्यमंत्री अजित पवार हे विजयी झाले आहेत. १०२ पैकी १०१ मतं वैध ठरली. त्यातील अजित पवारांना ९१ मतं मिळाली आहेत. सहकारी संस्था या गटासाठी मतदान करतात. यामध्ये अजित पवारांनी बाजी मारली आहे.

# अबू आझमींनी मागितली माफी

**मुंबई, दि. २४ प्रतिनिधी**

समाजवादी पक्षाचे मुंबईतील मानखुर्द-शिवाजीनगर मतदारसंघाचे आमदार अबू आझमी हे कायम त्यांच्या विधानावरून चर्चेत असतात. काही दिवसांपूर्वी औरंगजेबाची स्तुती केल्यावरून आमदार अबू आझमी चांगलेच वादात सापडले होते. त्यानंतर आता अबू आझमी यांनी पंढरपूरच्या वारीबाबत वादग्रस्त वक्तव्य केल्यामुळे पुन्हा एकदा चांगलंच राजकारण तापलं आहे. त्यांच्या या विधानावरून अबू आझमी यांच्यावर जोरदार टीका होत आहे. यानंतर अखेर अबू आझमी यांनी माफी मागितली आहे. पंढरपूर वारीबाबतच्या आपल्या वक्तव्याचा विपर्यास करण्यात आल्याचं म्हणत अबू आझमी यांनी मी माझे शब्द मागे घेतो, असं म्हटलं आहे.



"सोलापूरमध्ये मी नुकत्याच केलेल्या एका टिप्पणीबाबत पसरलेल्या गैरसमजाबाबत मी स्पष्ट करू इच्छितो की, माझ्या वक्तव्याचा विपर्यास केला गेला. त्यामुळे वारकरी समुदायाच्या धार्मिक भावना दुखावल्या असतील, तर मी माझे शब्द मागे घेतो आणि माफी मागतो. माझा हेतू कधीही कोणाच्याही धार्मिक भावना दुखावण्याचा नव्हता. मी एक निष्ठावंत समाजवादी आहे आणि नेहमीच प्रत्येक धर्म, संस्कृती आणि परंपरांचा आदर करतो. वारीच्या परंपरेचं पालन करणाऱ्या सर्व वारकरी बांधवांना मी मनापासून शुभेच्छा देतो आणि त्यांच्याबद्दल आदर व्यक्त करतो", असं अबू आझमी यांनी म्हटलं आहे.

"ही परंपरा महाराष्ट्राच्या समृद्ध सांस्कृतिक आणि आध्यात्मिक परंपरेचा एक अभिमानास्पद भाग आहे, ज्याचा मी वैयक्तिकरित्या आदर करतो. मी वारी पालखीचा उल्लेख फक्त मुस्लिम समुदायाविरुद्ध होणाऱ्या भेदभावाच्या आणि त्यांच्या हक्कांच्या संदर्भात केला होता. ती कोणत्याही प्रकारची तुलना नव्हती आणि माझा हेतू आणि माझी मागणी कोणत्याही प्रकारे अयोग्य नव्हती. माझा एकमेव उद्देश सरकारचं लक्ष वेधण्याचा होता. त्यांच्या दुटप्पीपणामुळे अल्पसंख्याक समुदायाच्या मनात अशी भावना निर्माण होऊ नये की या देशात त्यांच्यासाठी वेगळे कायदे आहेत. आपल्या देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी स्वतः सबका साथ, सबका विकास आणि सबका विश्वास म्हणतात. आम्ही उपेक्षित समाजाच्या हक्कांसाठी आदरासाठी आणि समानतेसाठी जोरदार लढत राहू, परंतु देशाच्या एकतेशी कधीही तडजोड होऊ देणार नाही", असं अबू आझमी यांनी म्हटलं आहे.

# ट्रम्प यांच्या युद्धविरामाच्या घोषणेनंतरही इराणने डागली क्षेपणास्त्रे

**तेल अविव, दि. २४ वृत्तसंस्था**

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी केलेल्या युद्धबंदीच्या घोषणेनंतर इराणने आज (दि. २४) इस्रायलवर ६ वेळा बॅलिस्टिक क्षेपणास्त्रांनी हल्ला केला आहे. 'टाईम्स ऑफ इस्रायल'च्या वृत्तानुसार, बेअरशेबा शहरातील इमारतीवर क्षेपणास्त्र कोसळले. वैद्यकीय विभागाने म्हटलं आहे की, इराणने आज केलेल्या क्षेपणास्त्र हल्ल्यात चार जणांचा मृत्यू झाला आहे, तर अनेक जण जखमी झाले आहेत.

इराण आणि इस्रायलमध्ये युद्धबंदी झाली आहे, असा दावा अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी आज पहाटे ३:३० वाजता सोशल मीडिया प्लॅटफॉर्म ट्रुथवर पोस्ट करत केला. त्यांनी आपल्या पोस्टमध्ये लिहिलं की, "मला हे जाहीर करताना आनंद होत आहे की, इस्रायल आणि इराणमध्ये १२ तासांत म्हणजेच आतापासून ६ तासांत पूर्ण युद्धबंदी लागू होईल. इराण पहिल्या १२ तासांसाठी शस्त्रे ठेवेल आणि त्यानंतर पुढील १२ तासांसाठी इस्रायल शस्त्रे ठेवेल. मात्र यानंतर काही वेळातच इराणचे परराष्ट्र मंत्री अब्बास अराघची यांनी इस्रायलशी युद्धबंदीच्या वृत्तांना नकार दिला. ते म्हणाले की, इस्रायलशी



अद्याप कोणताही अंतिम युद्धबंदी करार झालेला नाही. जर इस्रायल हल्ले थांबवले तर इराणही हल्ला करणार नाही.

### इराणने इस्रायलवर पुन्हा एकदा डागली बॅलिस्टिक क्षेपणास्त्रे

इस्रायली सैन्याच्या मते, इराणने आज ६ वेळा बॅलिस्टि क्षेपणास्त्रे डागली आहेत. यामध्ये एकूण १५ क्षेपणास्त्रे डागण्यात आली आहेत. रिपोर्टनुसार, इराणच्या दिशेने चौथ्या, पाचव्या आणि सहाव्या हल्ल्यात डागण्यात आलेले क्षेपणास्त्रे अद्याप इस्रायलपर्यंत पोहोचलेले नाहीत. कान न्यूजच्या वृत्तानुसार, इराणने आतापर्यंत ११ हून अधिक क्षेपणास्त्रे डागली आहेत.

### दोन्ही देशांनी शस्त्रसंधीचे उल्लंघन केले: ट्रम्प



डोनाल्ड ट्रम्प यांनी शस्त्रसंधीची घोषणा केली. पण त्यानंतर आता ट्रम्प यांनी काही तासांतच नाराजी व्यक्त केली आहे. 'इराण आणि इस्रायल या दोन्ही देशांनी शस्त्रसंधीचं उल्लंघन केलं आहे,' असं ट्रम्प म्हणाले. त्यांनी विशेषत: इस्रायलचा निषेध केला. शस्त्रसंधी झाल्यानंतर इस्रायलनं इतका मोठा हल्ला करायला नको होता, असं म्हणत ट्रम्प संतापले. इस्रायल, तुम्ही बॉम्बफेक करु नका. जर तुम्ही असं केलंत, तर ते शस्त्रसंधीचं उल्लंघन असेल. तुमच्या वैमानिकांना लगेच माघारी बोलवा, असं ट्रम्प कठोरपणे म्हणाले.

### इराण कधीही शरणागती पत्करत नाही - खोमेनी

इराणचे परराष्ट्र मंत्री अब्बास अराघची यांनी इराण आणि इस्रायलमध्ये शस्त्रविराम झाल्याचा दावा फेटाळला. सध्या असा कोणताही करार झालेला नाही, असे अराघची यांनी म्हटले आहे. दरम्यान इराणचे सर्वोच्च अयातुल्ला खामेनी यांची पोस्ट चर्चेत आली आहे. "इराणची जनता आणि इराणचा इतिहास ज्यांना ठाऊक आहे त्यांना हे देखील ठाऊक आहे की इराण कधीही शरणागती पत्करत नाही. शरणागती पत्करणं हा आमच्या देशाचा स्वभावच नाही." अशी पोस्ट खामेनी यांनी केली आहे. . दरम्यान इराणचे परराष्ट्र मंत्री सईद अराघाची यांनीही शस्त्रविराम झाल्याचं वृत्त फेटाळलं आहे. इराणचे परराष्ट्रमंत्री सय्यद अब्बास अरघाची यांनी धक्कादायक विधान करत या बाबत प्रतिक्रिया दिली आहे. ते म्हणाले की, इस्रायलला त्याच्या कृत्यांसाठी शिक्षा देण्यासाठी आमच्या सशस्त्र दलांची लष्करी कारवाई पहाटे चार वाजेपर्यंत सुरू राहिली.

# उबरच्या ड्रायव्हरचा दादर ते पुणे प्रवास ठरला शेवटचा
# गाडी गॅरेजमध्ये तर मृतदेह सापडला टोलनाक्याला

**मुंबई, दि. २४ : प्रतिनिधी**

मुंबईतील उबर कॅब ड्रायव्हरच्या 'मिसिंग मिस्ट्री'चा उलगडा करण्यात मुंबई पोलिसांना अखेर यश आलं. मानखूर्द पोलिसांनी दोन दिवसांच्या कसून तपासानंतर बेपत्ता उबर चालकाच्या प्रकरणाचा तपास लावला. पोलिसांना तपासादरम्यान, उबर चालकाची हत्या झाल्याचे कळलं. त्यानंतर पोलिसांनी हत्या करणाऱ्या आरोपीला लगेचच अटक केली. महत्त्वाची बाब म्हणजे बेपत्ता असलेल्या उबर चालकाची हत्या करणारा त्याचाच मित्र आहे. कारच्या व्यवहारातून मित्रानेच उबर चालकाची हत्या केल्याचे मानखुर्द पोलिसांच्या तपासातून स्पष्ट झाले आहे. मोहम्मद सलिम अब्दुल करीम वाहीद अन्सारी (३०) असे मृत उबेर चालकाचे नाव आहे. तो १९ जूनपासून बेपत्ता होता. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, अन्सारी प्रवासी घेऊन पुण्यात गेल्यापासून तो बेपत्ता होता. नातेवाइकांनी संपर्क साधला, पण तो झाला नाही. अखेर त्याच्या भावाने मानखुर्द पोलीस ठाण्यात तक्रार दिली. अन्सारीच्या शोधासाठी तीन विशेष पथके तयार करण्यात आली होती. पोलिसांनी त्याचा शोध सुरू केला. अन्सारीची कार भोसरी पुणे येथे आढळली. त्यानंतर त्या परिसरात कार पार्क करणाऱ्या व्यक्तीचा शोध घेण्यास पोलिसांनी सुरुवात केली. त्यावेळी उर्स टोलनाक्याजवळ एकाची हत्या झाल्याची माहिती पोलिसांना मिळाली. पोलिसांनी तिथे धाव घेतली असता तो मृतदेह अन्सारीचा असल्याचे स्पष्ट झाले. पोलिसांनी सलीमच्या संपर्कात आलेल्या लोकांची चौकशी केली. पोलिसांनी अन्सारीच्या मोबाइलवर आलेले आणि त्याने केलेले कॉल याचाही पोलिसांनी शोध घेतला. पोलिसांनी मुंबई-पुणे एक्स्प्रेस हायवेवरील टोल नाका आणि खासगी ठिकाणचे सीसीटीव्ही फुटेज तपासले. पुराव्याच्या आधारे पोलिसांनी आरोपी आदित्यला लातूर येथून अटक केली. चौकशीदरम्यान आदित्यने सांगितले की काही दिवसांपूर्वी त्याने सलीमशी त्याची गाडी खरेदी करण्याबाबत बोलणे केलं होते. १८ जून रोजी दोघेही दादरमध्ये भेटले आणि तेथून ते पुण्याला निघाले. वाटेतच दोघांमध्ये पैशांवरून वाद झाल. आदित्यने संतापाच्या भरात डॅशबोर्डमध्ये ठेवलेल्या चाकूने सलीमची हत्या केली आणि मृतदेह रस्त्याच्या कडेला फेकून देऊन पळ काढला. गाडी खराब झाल्यावर, आदित्यने टोइंग व्हॅनच्या मदतीने ती भोसरीतील एका गॅरेजमध्ये सोडली. पोलीस गाडीपर्यंत पोहोचल्यामुळे या प्रकरणाचा उलगडा झाला.

# राज्यात 'ई-कॅबिनेट'चा शुभारंभ; पेपरलेस मंत्रिमंडळाची पहिली पायरी मुख्यमंत्री फडणवीसांच्या पुढाकारातून

**मुंबई, दि. २४ : प्रतिनिधी**

राज्य शासनाच्या निर्णय प्रक्रियेत आता डिजिटल क्रांतीचा नवा अध्याय सुरू झाला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या आग्रही पुढाकारातून आजपासून राज्यात 'ई-कॅबिनेट' प्रणालीची औपचारिक सुरुवात करण्यात आली. पारंपरिक कागदपत्रांऐवजी आता मंत्रिमंडळ बैठकीत सर्व मंत्र्यांना iPad वाटप करून पेपरलेस यंत्रणेची अंमलबजावणी सुरू करण्यात आली आहे.



**ई-कॅबिनेट म्हणजे काय?**

'ई-कॅबिनेट' ही एक अत्याधुनिक डिजिटल प्रणाली असून, यामध्ये मंत्रिमंडळ बैठकीचे अजेंडे, प्रस्ताव, नोंदी आणि निर्णयांची माहिती फक्त डिजिटल स्वरूपातच सादर केली जाते. त्यामुळे कागदाचा वापर पूर्णतः बंद केला जातो आणि निर्णय प्रक्रिया अधिक पारदर्शक, कार्यक्षम आणि सुरक्षित बनते.

**मुख्यमंत्र्यांचा स्पष्ट संदेश – पारदर्शकता, गुप्तता आणि कार्यक्षमता**

ई-कॅबिनेट सुरू करण्यामागे दोन महत्त्वाचे उद्देश आहेत:

मंत्रिमंडळ बैठकीपूर्वी अजेंडा गुप्त ठेवणे – बैठकीपूर्वी अजेंडा बाहेर जाऊ नये, यासाठी डिजिटल वितरणावर भर.

कागदमुक्त, जलद निर्णय प्रक्रिया – प्रशासन अधिक गतिमान व्हावे आणि पर्यावरणपूरक शासन तयार व्हावे.

मुख्यमंत्री फडणवीस यांचा स्पष्ट दृष्टिकोन आहे की, "डिजिटल तंत्रज्ञानाच्या साहाय्याने शासन अधिक जवळीक, कार्यक्षम आणि जबाबदार व्हावे."

**सर्व मंत्र्यांना iPad वाटप**

आजच्या मंत्रिमंडळ बैठकीपूर्वी सर्व मंत्रीमंडळ सदस्यांना iPad वाटप करण्यात आले. यामध्ये ई-कॅबिनेटसाठी आवश्यक ॲप्लिकेशन्स आणि सुरक्षित लॉगिन यंत्रणा आधीच सेटअप करण्यात आली होती. यामुळे प्रत्येक मंत्री स्वतःचा अजेंडा फक्त वैयक्तिक आयडीवर पाहू शकतो.

**'ई-गव्हर्नन्स'च्या दिशेने मोठं पाऊल**

राज्यातील प्रशासकीय कार्यपद्धतीत 'ई-कॅबिनेट' ही एक क्रांतिकारी पायरी मानली जात आहे. यामुळे वाढता दस्तऐवज भार, मुद्रण खर्च, सुरक्षा त्रुटी यावर आळा बसेल. याशिवाय, डिजिटल दस्तऐवज सहज संग्रहित व पाहणीसाठी उपलब्ध राहतील.

पुढील टप्प्यात जिल्हास्तरीय बैठकींनाही डिजिटल स्वरूप

सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, पुढील काही महिन्यांत जिल्हा स्तरावरही ई-कॅबिनेट किंवा ई-मीटिंग सिस्टम लागू करण्याचा विचार राज्य सरकार करत आहे.

शासनाची निर्णय प्रक्रिया आता डिजिटल युगात प्रवेश करत असून, 'ई-कॅबिनेट'मुळे गती, गुप्तता आणि पारदर्शकता हे प्रशासनाचे नवे ब्रीदवाक्य ठरणार आहे.

## 'जनतेचा मंत्री'! मंगलप्रभात लोढा यांच्या जनता दरबाराला अभूतपूर्व प्रतिसाद
# एकाच छताखाली 12 विभागांचे अधिकारी

**मुंबई, दि. २४ : प्रतिनिधी**

कौशल्य विकास आणि मुंबई उपनगरचे पालकमंत्री मंगलप्रभात लोढा यांनी आपल्या कार्यशैलीने पुन्हा एकदा 'जनतेचा मंत्री' ही ओळख अधोरेखित केली आहे. लोकशाहीच्या मूलभूत तत्त्वांना मूर्त स्वरूप देत, त्यांनी एकाच छताखाली विविध विभागांच्या अधिकाऱ्यांना एकत्र आणून थेट जनतेच्या अडचणी सोडविणारा 'जनता दरबार' आयोजित करून नवा आदर्श घालून दिला आहे.

भाजप प्रदेश कार्यालयात आयोजित या विशेष दरबारात राज्यभरातून तब्बल ५०० नागरिकांनी हजेरी लावली. या नागरिकांनी आपापले प्रश्न थेट मंत्री लोढा यांच्या समोर मांडले, आणि आश्चर्य म्हणजे, त्यांच्यासमवेत महानगरपालिका, एमएमआरडीए, जिल्हाधिकारी कार्यालय, वीज, पाणी, रस्ते, पोर्ट ट्रस्ट, रेल्वे अशा तब्बल १२ विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

**समस्या आणि उपाय एकाच ठिकाणी**

ज्येष्ठ नागरिक जोतींद्र आणि मीनाक्षी लोटवाल यांचा वर्षानुवर्षे प्रलंबित असलेला गतिरोधकाचा प्रश्न, मुंबई महापालिका आणि एमएमआरडीएच्या उपस्थित अधिकाऱ्यांमुळे तात्काळ सुटला. त्यांनी भरलेल्या डोळ्यांनी मंत्री लोढा यांचे आभार मानले.



मुलुंडच्या क्रिशा कोठारी या विद्यार्थिनीचा उच्च शिक्षण प्रवेश अडथळा दूर झाला, असे तिचे नातेवाईक जतिन चंदे यांनी सांगितले. अशा असंख्य नागरिकांच्या तक्रारींना एका बैठकीतच योग्य प्रतिसाद मिळाल्याने दरबारातील वातावरण आश्वासक आणि समाधानकारक होते.

**तत्परता, समजूतदारपणा आणि स्पष्ट आदेश**

मंत्री लोढा यांनी प्रत्येक नागरिकाचे म्हणणे संयमपूर्वक ऐकले आणि संबंधित अधिकाऱ्यांना "तातडीने कार्यवाही करा" असे स्पष्ट निर्देश दिले. "लोकांच्या समस्या फायलीत न राहता प्रत्यक्षात सुटल्या पाहिजेत, हीच माझी भूमिका आहे. जनतेशी थेट संवाद हा लोकशाहीचा आत्मा आहे," असे लोढा यांनी स्पष्ट केले.

**बावनकुळेंचे कौतुक, महाराष्ट्र दौऱ्याची सूचनाही**

दरबारात भाजप प्रदेशाध्यक्ष व महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळेही हजर होते. त्यांनी या अभिनव उपक्रमाचे स्वागत करताना म्हटले की, "मंत्री लोढा यांनी केवळ मुंबईतच नव्हे, तर संपूर्ण महाराष्ट्रात अशा जनता दरबारांचे आयोजन करावे." त्यांनी लोढा यांचे अभिनंदन करताना जनतेशी थेट संवाद साधण्याची ही कार्यपद्धती इतरांसाठीही प्रेरणादायक ठरेल, असे मत व्यक्त केले.

**नागरिकांनी व्यक्त केला समाधानाचा सूर**

एकाच ठिकाणी, एकाच वेळेस विविध विभागांचे अधिकारी उपलब्ध असल्यामुळे नागरिकांनी "आज आमच्या समस्या खऱ्या अर्थाने ऐकल्या गेल्या," असे म्हणत समाधान व्यक्त केले.

एकूणच, मंत्री मंगलप्रभात लोढा यांच्या जनता दरबाराने प्रशासकीय यंत्रणेला जागं करत, लोकशाहीतील संवादाचे उत्तम उदाहरण समोर ठेवलं आहे. अशा उपक्रमांतून खऱ्या अर्थाने 'जनतेचे सरकार' आणि 'जनतेचे मंत्री' दिसू लागतात.

# मुंबई डेंग्यूची राजधानी

**मुंबई, दि. २४ : प्रतिनिधी**

पावसाळ्याच्या सुरुवातीलाच राज्याला डेंग्यूच्या आजाराने विळखा घातला आहे. शहरासह ग्रामीण भागात डेंग्यूचे रुग्ण आढळत असल्याने राज्याच्या आरोग्य विभागाची झोपच उडाली आहे. डेंग्यूचा डंख वाढल्याने पालिका प्रशासनही सतर्क झाले आहे. यंदा जानेवारीपासून 16 जून 2025 दरम्यान डेंग्यूचे 2031 रुग्ण आढळले आहेत. पावसाळ्याच्या सुरुवातीची ही रुग्णसंख्या चिंताजनक असल्याचे आरोग्य विभागाचेही म्हणणे आहे.

राज्यात डासाचा डंख सुरूच असून सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अहवालानुसार, यावर्षी जानेवारी ते 16 जून 2025 दरम्यान 2031 रुग्ण आढळले. परंतु सुदैवाने अद्याप एकही मृत्यू नाही. गेल्या पाच वर्षांत डेंग्यूचे सर्वाधिक रुग्ण गेल्यावर्षी 2024 मध्ये आढळून आले असून तो आकडा 19 हजारांहून अधिक होता. मात्र यावर्षी पावसाळ्याच्या सुरुवातीलाच साथ वाढत आहे. कोरोनाच्या कालावधीत डेंग्यूची रुग्णसंख्या कमी झालेली होती.

डेंग्यू हा सर्वांत मोठ्या प्रमाणावर डासांमुळे पसरणारा विषाणूजन्य आजार आहे. हवामान बदल, जलद शहरीकरण आणि लोकसंख्यावाढीमुळे तो वेगाने पसरत आहे. प्रादुर्भाव हा सहसा हंगामी असतो. पावसाळ्यात आणि नंतरच्या काळात रुग्णसंख्या वाढत असते. जागतिक आरोग्य संघटनेने डेंग्यूला सार्वजनिक आरोग्यासाठी असलेल्या टॉप टेन धोक्यांपैकी एक म्हणून वर्गीकृत केले आहे .

डेंग्यूची वेगळी अशी लक्षणे नसतात. ती फ्लूसारखी गंभीर असतात. थोड्या प्रमाणात लोकांमध्ये गंभीर डेंग्यू होतो. जो प्राणघातक ठरू शकतो. डेंग्यूचे चार विषाणू आहेत, ज्यांना डेंग्यू सेरोटाइप म्हणतात. संसर्गातून बरे होण्यामुळे डेंग्यूच्या त्याच सीरोटाइपपासून प्रतिकारशक्ती मिळते, तरीही लोकांना नंतर वेगळ्या सीरोटाइपने संसर्ग झाल्यास गंभीर डेंग्यूचा धोकाही वाढतो.

80 टक्के रुग्णांच्या घरामध्ये किंवा घराशेजारील परिसरात डेंग्यू विषाणूंचा प्रसार करणाऱ्या 'एडीस इजिप्टाय' डासांची उत्पत्तीस्थाने आढळून येतात. डेंग्यूच्या विषाणूंचा प्रसार करणाऱ्या डासांची उत्पत्ती ही साचलेल्या किंवा साठविलेल्या स्वच्छ पाण्यातच होते. सर्वेक्षणातून उपलब्ध झालेल्या माहितीनुसार डेंग्यू विषाणूवाहक डासांच्या अळया प्राधान्याने पाण्याचे पिंप, फेंगशुई झाड, बांबू प्लॅन्ट्स, मनीप्लँट्सारखी शोभिवंत झाडे, घराच्या गॅलरीमध्ये किंवा झाडांच्या कुंड्यांमधील अतिरिक्त पाणी जमा होण्यासाठी ठेवण्यात येणाऱ्या प्लेट्स, वातानुकूलन यंत्रणा, शीतकपाटाचा (रेफ्रिजरेटर) डिफ्रॉस्ट ट्रे याठिकाणी डासांची उत्पत्ती आढळून आली आहे.

महापालिका क्षेत्रात मुंबईमध्ये डेंग्यूचे रुग्ण सर्वाधिक आहेत. 2023 मध्ये राज्यात 17 हजार डेंग्यूच्या रुग्णांपैकी मुंबईत 4 हजार 300 हून अधिक रुग्ण आढळले, तर 2024 मध्येही 19 हजार रुग्णांपैकी मुंबईत 5 हजार 852 रुग्ण आढळले, तर यावर्षी 2 हजार रुग्णांपैकी 395 रुग्ण मुंबईत आहेत.

डासांच्या प्रत्येक उत्पत्तीस्थानाच्या ठिकाणी एकावेळी एक मादी डास 100 ते 150 अंडी घालते. एका मादी डासाचे सरासरी आयुर्मान हे 3 आठवड्यांचे असते. या तीन आठवड्यांच्या कालावधीत मादी डास किमान 4 वेळा साचलेल्या पाण्यात अंडी घालते. म्हणजेच एका मादी डासामुळे साधारणपणे 400 ते 600 डास तयार होत असतात. हे डास मलेरिया, डेंग्यू-सारख्या आजारांच्या प्रसारास कारणीभूत ठरतात.

पावसाळ्यात दरवर्षी रुग्णसंख्या वाढत असते. यावर्षीही डेंग्यूचे रुग्ण उपचारासाठी येत आहेत. नागरिकांनी आठवड्यातून एकदा आपल्या भोवतालचा परिसर स्वच्छ करावा. पाणी साचले असल्यास पाणी वाहते करावे. डासापासून बचाव करण्यासाठी लांब हाताचे कपडे, मच्छरदाणी, डास नियंत्रण आधुनिक यंत्राचा वापर करावा. लोशन लावण्याबरोबरच ताप, अंगदुखी, डोकेदुखी असल्यास त्वरित सरकारी दवाखान्यात तपासणी करून घ्यावी.

सिडको
शहरांचे शिल्पकार

## निविदा सूचना

**खांदेश्वर रेल्वे स्टेशन फोरकोर्ट परिसरात पे अँड पार्क सिस्टीमचे कामकाज**

महाराष्ट्र शहर आणि औद्योगिक विकास महामंडळ लिमिटेड ई-निविदा प्रक्रियेद्वारे अनुभवी बोलीदारांकडून ऑनलाइन निविदा खाली दिलेल्या तपशीलांनुसार नवी मुंबईतील खांदेश्वर रेल्वे स्टेशन फोरकोर्ट परिसरात पे अँड पार्क सिस्टीमचे संचालन जसे आहे तिथे आहे तिथे (१ वर्षाच्या कालावधीसाठी) मागवत आहे ज्याचे तपशील खालील प्रमाणे आहे:

१. कामाचे नाव: खांदेश्वर रेल्वे स्टेशन फोरकोर्ट परिसरात पे अँड पार्क सिस्टीमचे संचालन. २.सी.ए. क्रमांक: ०१/सिडको/टी अँड सी/सीजीएम(टी अँड ए)/टीई(पी अँड यू)/२०२५-२६ ३. ई.एम.डी. : रु. ५८,०२२.२१/- (रुपये अठ्ठावन्न हजार बावीस रुपये आणि एकवीस पैसे फक्त) ४. कामकाजाचा कालावधी: एक (१) वर्ष ५. निविदा कागदपत्राची किंमत (जीएसटीसह): ५,९००/- रुपये (परतावा न मिळणारे) (पाच हजार नऊशे रुपये, जीएसटीसह) ६. मूळ किंमत: ५८,०२,२२१ रुपये (रुपये अठ्ठावन्न लाख दोन हजार दोनशे एकवीस फक्त.

निविदा कार्यक्रम आणि निविदा कागदपत्रे सिडको लिमिटेडच्या अधिकृत वेबसाइटवर म्हणजेच http://mahatenders.gov.in वर २५/०६/२०२५ पासून उपलब्ध असतील.

वाहतूक अभियंता
(पार्किंग आणि उपयुक्तता)

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
www.cidco.maharashtra.gov.in
सिडको/जनसंपर्क/१२६/२०२५-२६

OCDRC MAHARASHTRA
MUMBAI
OW NO 3064
DATE 3/6/2025

**CONSUMER DISPUTES REDRESSAL COMMISSION**
**MAHARASHTRA STATE**

Old Secretariats Building, Extension Building, Ground Floor, Next Elphinstone Collage, M. G. Road, Kala Ghoda, MUMBAI-400 032.

AEA/NO. 24/4

**Mr. Rajendra Chottelal Singh V/S Joy Chacko Konnukudi & Ors.**

**1) M/S. Avdhut Constructions Builders & Developers** **...Opponent No. 2**
Having its Office at:-
Sri Devi Complex, Plot No. D-18, Ram Mandir Marg,
Belapur Village, Kokan Bhavan P.O. Navi Mumbai-400614.

**2) Shri. Ramchandran Velayudhan Nair** ...Opponent No. 3
Adult, Proprietor Of:
M/S. Avdhut Constructions Builders & Developers
Having its Office at:-
Sri Devi Complex, Plot No. D-18, Ram Mandir Marg,
Belapur Village, Kokan Bhavan P.O. Navi Mumbai-400614.

## PUBLIC NOTICE

TAKE NOTICE THAT the Appellant above named has/have filed AEA No. 24/4, before, State Consumer Disputes Redressal Commission for Maharashtra at Mumbai

WHEREAS the Appeal above mentioned was listed before the Commission for the hearing/submission but as it is not possible to serve the notice by regular service. to Respondent No.2 & 3, hence the Hon'ble Commission ordered the service by substituted service i.e., Public Notice.

Notice is hereby given to Respondent No. 2 & 3, that if you wish to contest the Appeal you are required to remain present on 14/07/2025, at 10.30 am. in person or by pleader duly Instructed and produce the documents in your defense on which you desire to rely on

TAKE FURTHER NOTICE THAT in default of your appearance on the date and time above mentioned the Appeal will be proceeded for determination in your absence and no further Notice in relation thereto shall be given

**Given in my hand on this 3th Day of June, 2025**

**Mumbai.**

Seal

**Sd/-**
**Registrar**
**(Legal) Disputes Redressal Commission**
**Maharashtra. Mumbai**

## महाराष्ट्र वैद्यकीय वस्तु खरेदी प्राधिकरण, मुंबई

**कंत्राटी तत्वावर पदभरती**

**विधी सल्लागार या पदाची कंत्राटी पद्धतीने नेमणूक करणेबाबत**

महाराष्ट्र वैद्यकीय वस्तु खरेदी प्राधिकरण, मुंबई या कार्यालयाकडील न्यायालयीन प्रकरणांसंदर्भात शासनाची बाजू प्रभावीपणे मांडण्यासाठी व न्यायालयीन प्रकरणांचा तातडीने निपटारा करण्यासाठी विधी सल्लागार या पदाची एकत्रित दरमहा रु.४०,०००/- इतक्या ठोक मानधनावर कंत्राटी पध्दतीने ११ महिन्याच्या कालावधीकरिता नियुक्ती करण्यासाठी पात्र उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | पदनाम | मानधन | शैक्षणिक अर्हता व अनुभव | पद संख्या |
|---|---|---|---|---|
| १ | विधी सल्लागार | ठोक मानधन ४०,०००/- दरमहा | १. उमेदवार हा वैध मान्यता प्राप्त विद्यापीटाच्या कायद्याचा पदवीधर असावा व सनद धारक असावा.<br>२. न्यायालयीन प्रकरणे हाताळण्याचा किमान ५ वर्षाचा अनुभव असावा.<br>३. शासकीय खरेदीबाबत होणा-या न्यायालयीन प्रकरणे हाताळण्याचा अनुभव असल्यास प्राधान्य.<br>४. मा. उच्च न्यायालयात जास्तीत जास्त काम केल्याचा अनुभव असल्यास त्या उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल.<br>५. मराठी, हिंदी व इंग्रजी या भाषांचे पुरेसे ज्ञान असावे.<br>६. विधी सल्लागार या पदासाठी उमेदवाराचे वय नियुक्तीवेळी ४५ वर्षापेक्षा जास्त नसावे. | ०१ |

**निवड प्रक्रिया :**

विधी सल्लागार पदावरील नियुक्ती, गुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या अधिनस्त राहिल. तसेच महाराष्ट्र वैद्यकीय वस्तु खरेदी प्राधिकरण, मुंबई हे नियुक्ती प्राधिकारी राहतील.

संकेतस्थळावर जाहिरात प्रसिध्द केलेल्या दिनांकापासून **इच्छुक उमेदवारांनी आपला अर्ज दिनांक २०/०७/२०२५ रोजी सायंकाळी ०५.०० वाजेपर्यंत विहित कागदपत्रांसोबत (साक्षांकित प्रती) महाराष्ट्र वैद्यकीय वस्तु खरेदी प्राधिकरण, मुंबई आरोग्य भवन, १ ला मजला, सेंट जॉर्जेस रूग्णलाय आवार, मुंबई-०१ येथे हस्तपोच सादर करावा.**

* सदर पदाची जाहिरात प्राधिकरणाचे संकेतस्थळ (https://mmgpa.maharashtra.gov.in) यावर प्रसिध्द करण्यात येईल.

* प्राप्त अर्जाची छाननी प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर तोंडी मुलाखतीसाठी पात्र झालेल्या उमेदवारांची यादी प्राधिकरणाच्या सूचना फलकावर व संकेतस्थळ (https://mmgpa.maharashtra.gov.in) यावर प्रसिध्द करण्यात येईल.

* मुलाखतीसाठी पात्र उमेदवारांना त्यांनी अर्जामध्ये नमुद केलेल्या ई-मेलवर निश्चित केलेल्या दिनांक व वेळेनुसार महाराष्ट्र वैद्यकीय वस्तु खरेदी प्राधिकरण, मुंबई आरोग्य भवन. १ ला मजला, सेंट जॉर्जेस रुग्णलाय आवार, मुंबई-०१ येथे उपस्थित राहण्यावावत कळविण्यात येईल.

* मुलाखतीनंतर निवड झालेल्या उमेदवारास त्यांनी अर्जामध्ये नमूद केलेल्या पत्त्यावर व इमेल आयडीवर नियुक्ती आदेश पाठविण्यात येतील.

**सर्व साधारण अटी व शर्ती**

१. उमेदवार हा महाराष्ट्राचा अधिवास धारक असावा.
२. सदरवी नेमणुक ही कंत्राटी पद्धतीने असल्यामुळे त्यांना शासकीय कर्मचारी म्हणून गणले जाणार नाही.
३. सदर पदाची मुदत ११ महिन्यांच्या कालावधीकरीता राहील.
४ निवड झालेल्या उमेदवारास एकत्रित मानधनाव्यतिरिक्त कोणतेही भत्ते अनुज्ञेय राहणार नाही.
५. सदर उमेदवाराच्या सेवा पुर्वसूचना न देता रामाप्त करण्याचे अधिकार महाराष्ट्र वैद्यकीय वस्तु खरेदी प्राधिकरण, मुंबई यांना राहतील.
६. मुलाखतीस येताना उमेदवाराने शैक्षणिक अर्हता व पुर्वानुभवाच्या संदर्भातील सर्व मूळ कागदपत्रे आणणे आवश्यक आहे.
७. उमेदवाराने विहित अर्ज आवश्यक त्या कागदपत्रांसह मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र वैद्यकीय वस्तु खरेदी प्राधिकरण, मुंबई यांच्या नावे हस्तपोच सादर करावा. मुदतीनंतर प्राप्त झालेला अर्ज विचारात घेतला जाणार नाही.
८. उमेदवाराने मुलाखतीस स्वखर्चाने उपस्थित रहावे. उपस्थित राहणा-या उमेदवारास कोणताही प्रवासखर्च दिला जाणार नाही.
९. मुलाखतीच्या दिवशी उपस्थित न राहिलेल्या उमेदवारांची तक्रार / कोणत्याही प्रकारची सबब विचारात घेतली जाणार नाही.
१०. एखाद्या अर्जदाराने त्यांच्या निवडीसाठी निवड समितीवर प्रत्यक्ष / अप्रत्यक्षपणे दबाव आणल्यास त्यारा निवड प्रक्रियेतून बाद करण्यात येईल.
११. जाहिरातीत प्रसिध्द करण्यात आलेल्या पदाची संख्या कमी जास्त करण्याचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र वैद्यकीय वस्तु खरेदी प्राधिकरण, मुंबई यांना राहतील.
१२. सदर निवडप्रक्रिया कोणत्याही क्षणी स्थगित करणे / तहकूब करणे / रद्द करणे इत्यादिचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र वैद्यकीय वस्तु खरेदी प्राधिकरण, मुंबई यांनी राखून ठेवले आहेत.
१३. विवक्षित कार्याकरीता नियुक्त विधी सल्लागार यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र वैद्यकीय वस्तु खरेदी प्राधिकरण, मुंबई यांच्या परवानगीशिवाय कोणत्याही प्रकारचे खाजगी काम/व्यवसाय अथवा कायदेशिर सल्ला देण्याचे अधिकार राहणार नाही. याबाबत तक्रार प्राप्त झाल्यास आपल्या सेवा कोणतीही पुर्व सुचना न देता समाप्त करण्यात येतील.

**विधी सल्लागार या पदाची कर्तव्ये व जबाबदाऱ्या:**

१. महाराष्ट्र वैद्यकीय वस्तु खरेदी प्राधिकरण, मुंबई यांच्या कार्यालयात प्राप्त होणाऱ्या सर्व प्रकारच्या कायदेविषयक सर्व न्यायालयीन प्रकरणी / वाचींवावत सल्ला देणे व न्यायालयीन प्रकरणे हाताळणे.
२. सेवाविषयक, आस्थापना विषयक व खरेदी विषयक न्यायालयीन प्रकरणात परिच्छेदनिहाय अभिप्राय (PARAWISE COMMENTS) तयार करणे/सेवाविषयक / प्रशासकीय सर्व वाबी / विभागीय चौकशी इत्यादी तथा समकालीन कायद्याची प्रस्थापित स्थिती यावाचन सर्व प्रकरणी सल्ला देणे व ती प्रकरणे हाताळणे.
३. प्रलंबित न्यायालयीन प्रकरणे तत्परतेने निकाली काढण्यासाठी सरकारी वकीलाकडे पाठपुरावा करणे, जेथे महाराष्ट्र वैद्यकीय वस्तु खरेदी प्राधिकरण हे शासन प्रतिवादी आहे अशा प्रकरणी सादर करावयाची प्रतिज्ञापत्र संबंधित अधिकाऱ्याच्या सल्यान व मंदतीने तयार करणे.
४. शपथपत्राचा मसुदा तयार करणे व त्या सक्षम प्राधिका-याची मान्यता घेऊन न्यायालयात विहित मुदतीत सादर करणे तराव न्यायालयात सुनावणीच्या वेळी व इतर अनुषंगिक न्यायालयीन कामकाजासाठी न्यायालयात उपस्थित राहणे.
५. जेथे शासनाच्या विरोधात न्यायालयाने निकाल दिलेला आहे, अशा प्रकरणामध्ये न्यायालयाच्या निर्णयाचा अभ्यास करुन तद्नुषंगाने अपील दाखल करण्याच्या संदर्भात उचित कार्यवाही करणे.
६. अपील करणे, योग्य असल्यास व तसा निर्णय झाल्यास अपीलाचा मसुदा तयार करुन तो सबंधित सरकारी वकिलांकडे पाठविणे व अपिलाचा अंतिम निर्णय लागेपर्यंत पाठपुरावा करणे,
७. विधी विषयक कामकाजावावत वेळोवेळी नेमुन दिलेले कार्य विहित मुदतीत पार पाडणे, तसेच वरिष्ठांनी वेळोवेळी नमुद दिलेली काम पार पाडणे. न्यायालयीन प्रकरणाची नोंदवही तयार करुन, संवधित प्रकरणाची विषयनिहाय माहिती व तारखेची नाद घेणे,
८. न्यायालयीन प्रकरणांबावत न्यायालयाकडून प्रसिध्द होणा-या प्रकरणांचा तारिखनिहाय आढावा घेणे व संबधित अधिकारी व कार्यासनास याबाबात वेळोवेळी अवगत करणे.

**दिनांक :- / /२०२५**

**डी.जी.आय.पी.आर.आरओसी २०२५-२६/क्र-५/C१३३५**

**सही/-**
**(मुख्य कार्यकारी अधिकारी)**
**महाराष्ट्र वैद्यकीय वस्तु खरेदी प्राधिकरण. मुंबई**

# शाळेची पटसंख्या वाढविणे फक्त शिक्षकांची जबाबदारी?

**महाराष्ट्रात सध्या जिल्हा परिषद शाळांमध्ये पटसंख्या कमी असलेल्या शाळेतील अनेक शिक्षकांवर निलंबनाची कार्यवाही करण्यात आली. या कार्यवाही विषयी एक नागरिक म्हणून खुप प्रश्न निर्माण डोक्यात येतात.**

---------



**विनोद पंजाबराव सदावर्ते**
**समाज एकता अभियान**
**रा. आरेगांव, ता. मेहकर.**
**जि. बुलढाणा.**
**9130979300**

येथे मी शिक्षकांची बाजू अजिबात मांडत नाही फक्त न्यायीक पद्धतीने व्यवस्थेचा विचार करतो. अपवादात्मक शिक्षक वगळता अनेक शिक्षक सामाजिक व शैक्षणिक कायार्पासून खुप दुर आहेत.

पगार, पत्नी आणि परिवारात ते मग्न आहेत. शिक्षणाची गुणवत्ता व शिक्षणातील तर्कवाद कमी व्हायला शिक्षक जबाबदार आहेत हे कोणीही नाकारू शकत नाही. गुलामीच्या बेड्या तोडून मानवी स्वातंत्र्य व विज्ञानवादातुन मानसाची प्रगती हे ध्येय घेऊन महात्मा फुले व सावित्रीमाई फुले यांनी शिक्षण सुरू करून समाजात क्रांती करून जागृती केली, शिक्षण हे वाघिणीचे दुध आहे आणि जो प्राशन करेल तो गुरगुरल्या शिवाय राहणार नाही असे मत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे असताना किती शिक्षकांची विद्यार्थी विज्ञाननिष्ठ, तर्कवादी, जागृत व अन्याया विरूद्ध आवाज उठवणारे आहेत? याची समिक्षा शिक्षक करतील का?

शिक्षकांविषयी अनेक प्रश्न व शंका डोक्यात आहेतच तरीही पटसंख्या कमी झाली म्हणून शिक्षकांवर निलंबणाची कार्यवाही केली हा शिक्षकांवर झालेला अन्याय आहे. अन्याया विरोधी जो बोलतो तोच खरा सुशिक्षित आहे.

जिल्हा परिषद शाळेची पटसंख्या कमी का झाली? याला कारणीभूत फक्त शिक्षकच आहेत का? यावर विचार विनीमय होणे आवश्यक आहे. जेही लोक कारणीभूत आहेत त्या सर्वांवर कारवाई होणे गरजेचे आहे. चला आपण विचार करू या.

जिल्हा परिषद शाळेची विद्यार्थी संख्या कमी का झाली याचे एकमेव कारण म्हणजे खाजगीकरणाच्या नावाखाली खाजगी शाळांना मान्यता देऊन शिक्षणाचा व्यापर करणे. खाजगी शाळा सुरू झाल्या लाखों रुपये लोक फि भरून मुलांना शैक्षणिक कमकुवत करत आहेत ते फक्त खोटे स्टेटस टिकण्यासाठी.

श्रीमंत व नोकरदार व्यक्तींच्या लोकांनी आपली मुलं खाजगी शाळेत टाकले म्हणून सर्वसामान्य लोकांनी कर्ज काढून खोटी प्रतिष्ठा जपण्यासाठी व आपणही गरीब नाही हे दाखवण्यासाठी आपली मुलं खाजगी शाळेत टाकली. खाजगी शाळेत पैसे भरून मुलांना टाकणारे लोक सुशिक्षित आहेत का तर मुळीच नाही.

ते सुशिक्षित आणि हुशार या दोन्ही प्रवर्गात न येता ते खोटी प्रतिष्ठा जपणा?या बेगडी व मानसिक गुलाम प्रवर्गात मोडतात. याचे कारणही तसेच आहे शेतक?यांना कडून भाजीपाला घेतांना भाव करणारे, एकही रुपया गोरगरिबांना न देणारे, लोकांना व्याजाने पैसे देणारे व वरतोंड करून हक्क अधिकाराच्या बाता करणाऱ्यांना प्राथमिक शिक्षण हे सक्तीचे व मोफत आहे हे कळत नसेल आणि मोफतच्या शिक्षणासाठी वर्षाला लाखों रुपये खर्च करणाऱ्या लोकांना सुशिक्षित व हुशार कसं म्हणायचं?

खाजगी शाळांवर नियंत्रण हाच खुप मोठा उपाय आहे जिल्हा परिषद शाळेतील पटसंख्या वाढविण्यासाठी. दुसरी गोष्ट म्हणजे एकदा निवडून आलेल्या आमदार खासदारांचे एका वर्षाच्या आत मोठ मोठे प्रशस्त बंगले, हॉटेल, बँका, कंपन्या, भुखंड आणि बरेच काही महागड्या वस्तुची कमाई होते. परंतु पंधरा विस वर्षे आमदार खासदार राहीलेला एक तरी नेता छाती ठोक पणे सांगू शकतो का? माझ्या मतदार संघातील जिल्हापरिषद शाळेची इमारत प्रशस्त, स्वच्छ व आनंददायी आहे.

जिल्हा परिषद शाळेच्या इमारती आजही बहुतांश स्वातंत्र्य पुर्व काळातील आहेत. त्याची रंगरंगोटी करण्यासाठी सरकार कडे पैसे नसावे?

राज्यात बिअर पिणाऱ्यांची संख्या वाढविण्यासाठी समिती गठीत केली जाते उत्पादन शुल्क कमी केले जाते तर शाळेतील पटसंख्या वाढविण्यासाठी शासनाने समिती गठीत केल्याचे कुणाला माहिती आहे का?

जिल्हा परिषद शिक्षकांना शिकवण्याचे काम कमी आणि इतरकामे जास्त दिली जातात परंतु विद्यार्थांची संख्या वाढविण्यासाठी नियोजन करण्याचे काम दिले जात नाही. जिल्हा परिषद शाळेच्या पाच किलोमीटर पर्यंत तरी खाजगी शाळेची परवानगी नाकारली तरीही जिल्हा परिषद शाळेला सोन्याचे दिवस येतील.

शाळेतील पटसंख्या कमी होणे ही चिंतेची बाब आहेच हे कोणीही नाकारू शकत नाही पण शिक्षकांचे निलंबन हा योग्य उपाय आहे का? बरं पटसंख्ये सारख्याच अनेक गंभीर समस्या आपल्या समोर आहेत जसे अनेक ठिकाणी खड्यात रस्ते आहेत, जलजिवन मिशन योजनेचे कामही झाले नाहीत बिलही निघालेले आहेत, विमानतळ, रेल्वे, पुतळे, पुल उद्घाटन झाल्यानंतर काहीच दिवसात कोसळले, हजारो करोडो रुपयांचा चुराडा करून निकृष्ठ दर्जाचे काम केले गेले. किती गंभीर आहे? मग त्या मतदारसंघातील आमदार खासदार, संबंधित इंजिनिअर, मंजूर करणारे अधिकारी यांच्यावर कारवाई कधी होणार?

ब्रिटिश कालीन पुल, रस्ते, इमारती आजही मजबूत आहेत पण आपल्या सरकारने बांधलेले रस्ते, पुल, पुतळे वाऱ्या व पावसाने पडतात तर किती जबाबदार लोकांचे निलंबन केले? मग शिक्षकांवरच कारवाई का?

खाजगी शिक्षण संस्था बहुतांश राजकीय नेते व त्यांचे नातेवाईक यांच्या च आहेत म्हणजे राजकीय लोकांच्या हितासाठी सर्व सामान्य लोकांचा घात करणे यालाच पारदर्शक व इमानदार सरकार म्हणायचे का?

फक्त शिक्षकांवर कारवाई आणि इतरांना सुट यालाच न्याय म्हणायचे का? शिक्षकांचे निलंबन झाले असताना शिक्षकांनी गप्प राहणे याला सुशिक्षित म्हणायचे का? आज काही शिक्षक निलंबित झाले उद्या कोणावरही वेळ येऊ शकते परंतु याचे गांभीर्य किती लोकांना आहे?

जिल्हा परिषद शाळेची पटसंख्या कशी वाढेल या साठी ज्या गावात पटसंख्या कमी आहे तिथे जाऊन सर्वसामान्य लोकांना जरी विचारले आणि तसे उपाय केले तर पटसंख्या वाढू शकते. मुळात वर्ग सात शिक्षक चार, वर्ग चार शिक्षक दोन असे नियोजन आणि त्यातही निलंबन असे केले तर संख्या कशी वाढेल?

पटसंख्या वाढविण्यासाठी सोपे उपाय आहेत. परंतू ते उपाय सोडून शिक्षकांचे निलंबन करणे म्हणजे जिल्हा परिषद शाळेत प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थी व पालकांचे खच्चीकरण करणे होय. शाळेची इमारत जुनी व रंगरंगोटी नाही म्हणून कोण जबाबदारी स्विकारणार? शाळेमध्ये पुरेसे शिक्षक नाही म्हणून कोण जबाबदारी स्विकारणार?

प्रत्येक ऑफिस मध्ये भ्रष्टाचार आहे कोणाला निलंबित करणार? लोकांचे काम वेळेवर होत नाहीत कोणाला निलंबित करणार? पोलीस, तलाठी, ग्रामसेवक सारखे लोक करोडो रुपयांचे गबाड गोळा करतात कोणाचे निलंबन करणार? अनेक नोकरदार लोक दिवसभर कामाच्या ठिकाणी बसतच नाहीत त्यांच्या वर काय कारवाई होणार?


गुन्हेगारी वाढली म्हणून पोलीस निलंबित होत नाहीत, सर्वसामान्य लोकांना पैसे न देता योजनेचे घरकुल मिळत नाहीत तेव्हा मात्र कोणीही निलंबित केले जात नाही. खाजगीकरण आणून सर्वात अगोदर शिक्षणावर घाव घातला गेला तेव्हा एकही शिक्षक बोलला नाही.

आता शिक्षण राहिले बाजूला शिक्षकावरच घाव घालत आहेत. तेव्हाही शिक्षक पेटून उठून स्वतःचे भविष्य वाचवू शकत नसतील तर ते शिक्षक विद्यार्थ्यांचे भविष्य काय घडवणार? पटसंख्येचे कारण दाखवून शिक्षकांना घरी बसवले जात असेल आणि शिक्षक गप्प असतील तर याचा अर्थ पटसंख्या कमी व्हायला शिक्षकच जबाबदार आहेत, हे शिक्षकांना मान्य आहे आणि निलंबनाची कारवाई योग्यच आहे हे सिद्ध होते.

शिक्षकांनी जागृत होऊन आवाज उठवणे अत्यंत आवश्यक आहे. पटसंख्या कमी आहे म्हणून शिक्षकावर ठपका ठेऊन घरी बसवणे चुकीचे आहेच. शिक्षक दर्जेदार शिक्षण देत नाहीत, शिक्षक वेळेवर शाळेत येत नाहीत, शिक्षक धर्मनिरपेक्ष राहत नाहीत, शिक्षक अंधविश्वास व पाखंडाला चालना देऊन विद्यार्थ्यांना तर्क, सत्य व विज्ञान यापासून दुर ठेवतात या कारणांमुळे कमी केले तर कोणताही प्रश्न उपस्थित होणार नाही.

पण शिक्षकांना पटसंख्येचे कारण दाखवून निलंबित केले तर हाच नियम वेगवेगळ्या विभागात लागु होऊन त्या विभागातील कामाची संख्या व वेग कमी आहे म्हणून कर्मचाऱ्यांना निलंबित केले तर ऐंशीटक्के पेक्षा जास्त शासकीय कार्यालये खाली होतील. सरकारने कोणतेही पाऊल उचलतांना न्यायीक भूमिका घ्यायला पाहिजे सुड भावना मनात ठेवून शिक्षणावर घाव घालु नये एवढीच अपेक्षा.

# कर्करोग संशोधक डॉ. सुलोचना गवांदे




**अमेरिकेत गेली ४० वर्षे कर्करोगावर संशोधन करणाऱ्या आणि विविध माध्यमांद्वारे कर्करोगाविषयी जनजागृती करीत असलेल्या डॉ सुलोचना गवांदे यांची प्रेरणादायी जीवन कहाणी...**

-----------------

**देवेंद्र भुजबळ**
**_९८६९४८४८००**

-----------------

कर्करोगाचे आपल्याला मागच्या दशकात प्रामुख्याने चार पाच प्रकारच माहिती होते. पण आता समजतेय की ही संख्या १०० च्या वर आहे. कर्करोग आणि इतर आजार यातील मूळ फरक म्हणजे बहुतांश इतर रोग हे आपल्या शरीराच्या बाहेरून येणा?या जीवजंतूंमुळे होतात अथवा शरीरातील इंद्रिये, स्नायू इत्यादी दुर्बळ झाल्यामुळे होतात. कर्करोग हा मात्र स्वतःच्या शरीरातील पेशीतूनच निर्माण होतो.



कर्करोग झाल्याचे निदान कळताच केवळ रुग्णच नव्हे तर त्याचे कुटुंबीयही गर्भगळीत होतात, इतकी या रोगाची धास्ती आहे. अशा या वेगळ्या आणि विलक्षण रोगावर सखोल संशोधन करणाऱ्या, तो होऊच नये म्हणून आणि झालाच तर त्याच्याशी कसा सामना करायचा यासाठी जनजागरण करणाऱ्या डॉ. सुलोचना गवांदे यांच्याशी न्यूज स्टोरी टुडे पोर्टलच्या माध्यमातून आमचा संबंध आला आणि त्यांच्या कार्याने प्रभावित होऊन आम्ही त्यांना यथाशक्ती मदत करण्याचा प्रयत्न करू लागलो आणि करीत आहोत.

डॉ सुलोचना गवांदे या मूळ मुंबईकर आहेत ही आपल्या सर्वांसाठी मोठी अभिमानाची बाब आहे. त्यांचे शालेय आणि महाविद्यालयीन शिक्षण मुंबईतच झाले. त्यांनी टाटा मेमोरियल सेंटरशी संलग्न कर्करोग संशोधन संस्थेतून एम एससी व पीएच डी या पदव्या प्राप्त केल्या. पुढे कर्क रोगावर प्रगत संशोधन करण्यासाठी ४० वर्षांपूर्वी अमेरिकेत जाण्याचे धाडस त्यांनी केले.

सुरुवातीला फार बिकट परिस्थितीत कर्क रोगावरचे संशोधन करीत राहिल्या आणि अजूनही करीत आहेत. पण त्यांचे वैशिष्ट्य म्हणजे त्यांनी केवळ संशोधन, शास्त्रीय अभ्यास आणि या विषयावर होणाऱ्या जागतिक परिषदांपुरतेच स्वतःला बंदिस्त करून ठेवले नाही तर सामान्य माणसाला कर्करोगाची, त्या विषयी सुरू असलेल्या संशोधनाची अद्ययावत माहिती मिळावी.

त्यांना धीर, दिलासा मिळावा म्हणून त्या अनेक प्रकारे प्रयत्न करीत असतात. त्यांचे दीर्घकाळ परदेशात वास्तव्य असले तरी त्यांनी त्यांची मायभूमीशी आणि माय मराठीशी असलेली नाळ तुटू दिली नाही. त्यामुळेच कर्करोगाविषयीची जाणीव, जागृती ही मराठी समाजापर्यंत पोहोचण्यासाठी त्या भरीव कामगिरी करीत असतात.

डॉ सुलोचना गवांदे यांनी २०१६ मध्ये महाराष्ट्र टाइम्स या वृत्तपत्रात पंधरवाड्याला एक लेख असे सदर वर्षभर लिहिले. या सदरातून त्यांनी कर्करोगाचा इतिहास, कारणे व लक्षणे, उपचार हे सर्व विषय अतिशय सोप्या भाषेत मांडले. वाचकांना ही लेखमाला अत्यंत उपयुक्त वाटली. नंतर या लेखनावर आधारित त्यांचे कर्करोगः माहिती आणि अनुभव हे पुस्तक प्रकाशित झाले.

पुढे या पुस्तकात अधिक भर घालून त्याचे इंग्रजी रूपांतर Revealing the Secrets of Cancer या नावाने २०२२ मध्ये अमेरिकेत व नंतर भारतात प्रकाशित केले गेले. गेल्या वर्षीच्या (२०२४) मराठी व इंग्रजी कालनिर्णयच्या पृष्ठभागावर कर्करोगाची कारणे आणि तो टाळण्यासाठी काय करावे याबद्दल त्यांनी लिहिलेले लेख प्रसिद्ध झाले आहेत.

कर्करोगाविषयी बोलण्यासाठी गवांदे मॅडम यांना विविध प्रसार माध्यमांद्वारे निमंत्रित करण्यात येत असते. त्या नेहमीच "योग्य" माहिती देण्याचा आग्रह धरतात. इथे योग्य शब्द जाणीवपूर्वक वापरलेला आहे, तो अशासाठी की अनेक व्यक्ती,संस्था कर्करोग बरा करण्याविषयीचे अवास्तव दावे करतात. त्यांच्या उपचारांमुळे रुग्ण बरा तर होत नाहीच उलट त्याचे शारीरिक, मानसिक, आर्थिक नुकसानच होत असते.

कर्करोगाचे अनेक प्रकार योग्य औषधोपचारांनी पूर्ण बरे होतात किंवा कित्येक वर्षे आटोक्यात राहतात. नको त्या गोष्टींच्या मागे लागण्याने हे इलाज वेळेवर होत नाहीत, परिणामी रुग्णाचा आजार अधिक गंभीर होतो आणि कित्येकदा रोग कह्यात आणणे अशक्य होते. ही अत्यंत दुर्दैवी परिस्थिती आहे आणि याबद्दल लोकांना जागरूक करणे आवश्यक आहे.

म्हणून गवांदे मॅडम मुद्रित माध्यमापुरत्याच मर्यादित राहिल्या नाहीत तर आकाशवाणी, दूरचित्रवाणी, समाज माध्यमे, प्रत्यक्ष व्याख्याने, संवाद,मुलाखती अशा विविध प्रकारच्या माध्यमांद्वारे त्या कार्यरत आहेत. अर्थात खरं म्हणजे ही काही फक्त त्यांचीच किंवा सरकार, संशोधक आणि डॉक्टरांची पण नाही तर ही जागरूकता वाढवणे हे काम तुम्हा आम्हा सर्वांचेच आहे. इतकी ही कर्करोगाची समस्या भीषण आहे. गवांदे मॅडम यांच्या कर्करोगः माहिती आणि अनुभव या पुस्तकातील सर्व लेख मुंबई आकाशवाणीच्या निवेदिकांनी वाचून महाराष्ट्रातील केंद्रांवर प्रसारित केले. अमेरिकेत येल विद्यापीठाच्या कर्करोग समितीने NPR रेडिओवर या पुस्तकावर आधारित डॉ गवांदे यांचा कार्यक्रम प्रसारित केला.

डॉ गवांदे मॅडम गेल्या वर्षी मुंबईत आलेल्या असताना, त्यांचे विचार एबीपी माझा वाहिनीवर प्रसारित होण्याचे महत्व मी ज्या वेळी या वाहिनीचे संपादक राजीव खांडेकर यांना सांगितले, त्यावेळी त्यांनी क्षणाचाही विलंब न लावता डॉ गवांदे मॅडम यांची मुलाखत घेतली. या त्यांच्या कार्यक्रमाला खूप प्रतिसाद मिळाला. त्यांची ही मुलाखत आपण आजही यू ट्यूब वर पाहू शकता आणि आपण ती अवश्य पाहावी देखील. त्यांचे मराठी, हिंदी आणि इंग्रजी भाषेत पॉडकास्ट प्रसिद्ध झाले असून ते देखील यू ट्यूब वर उपलब्ध आहेत.

कर्करोगाविषयी प्रसार माध्यमांद्वारे जनजागृती करीत असतानाच गवांदे मॅडम लहानमोठ्या सभांतून लोकांना प्रत्यक्ष भेटून बोलत असतात. न्यूज स्टोरी टुडेच्या ठाणे येथील मेघना आणि हेमंत साने यांच्या घरी झालेल्या स्नेह मिलन कार्यक्रमात मेघना साने यांनी त्यांची घेतलेली उस्फुर्त मुलाखत आणि त्या नंतरची प्रश्नोत्तरे खूपच उद्बोधक ठरली. आकाशवाणीचे निवृत्त सहसंचालक भूपेंद्र मिस्त्री यांनी त्यांच्या कॅमेरा टीमद्वारे या मुलाखतीचे चित्रीकरण करून ती समाज माध्यमातून प्रसिद्ध केली. ही मुलाखत त्या स्नेह मिलन कार्यक्रमाचे मोठेच वैशिष्ट्य ठरले.

---------------

**(लेखाचा उर्वरीत भाग पुढील अंकी)**

■ ■ ■

# युद्धात अमेरिकेची उडी आणि संकट!

आता सिद्ध झाले आहे की अमेरिका जगाला तिसऱ्या महायुद्धाकडे नेतांना दिसत आहे. कारण अमेरिका-इजरायल - इराण याची फक्त वर्चस्वाची लढाई आहे.परंतु यात मिडलिस्टमधील अनेक देश भरडले जात आहे.

आपण युक्रेन-रशिया, इजरायल सोबतचे हमास-हिज्बुल्ला-हुती विद्रोही -इराण यांच्या संघर्ष व युद्ध पहाले.परंतु आपण ज्याला सुपर पॉवर म्हणतो तो अमेरिका तडजोड न करता इराणवर "ऑपरेशन मिडनाईट हॅमर"च्या माध्यमातून इराणवर अचानक अमेरिकेच्या बी-२ बॉम्बर विमानांनी इराणचे फॉर्डो उध्दवस्त करण्यासाठी बंकर बस्टर्ड बॉम्ब टाकतो आणि तेही १३६०० किलो वजनाचा एक बॉम्ब.

असे १४ बॉम्ब टाकून इराणचे फोर्डो, नातान्झ आणि इश्फाहान या ३ आण्विक केंद्रांवर हल्ले करून उध्वस्त करतो. याचाच अर्थ असा की जग विनाशाकडे जात असल्याचे दिसून येते.यामुळे आता जगातील अनेक राष्ट्र दोन गटात विभागल्या जाण्याची दाट शक्यता आहे आणि त्याची सुरुवात सुध्दा झाली आहे. अमेरिकेच्या कारवाईमुळे रशिया-चीन इराणकडून खुलेआम उतरू शकतो, यालाही नाकारता येत नाही.

अमेरिकेच्या हल्ल्यानंतर इराणने इस्त्रायलवर मोठ्या प्रमाणात क्षेपणास्त्रे डागण्यास सुरूवात केली आहे. अमेरिकेच्या इराणच्या अणुऊर्जा प्रकल्पांवर केलेल्या हल्ल्यामुळे जगात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. अमेरिकेच्या बी-२ बॉम्बर हल्ल्यानंतर इराण होर्मुझचा जलमार्ग बंद करून नाकाबंदी करण्याची दाट शक्यता आहे.

होर्मूझ खाडीतून जगातील २० टक्के कच्च्या तेलाचा व्यापार होतो आणि हा मार्ग इराणने बंद केला तर याचा परिणाम भारतासह जगातील अनेक देशांवर पडु शकतो.कारण अमेरिकेने थेट अणुकेंद्रांवर हल्ला केल्याने इराणच्या तळपायाची आग मस्तकात गेली आहे. त्यामुळे इराणने अखेरचे हुकुमी अस्त्र बाहेर काढले आहे.

होर्मुझ बंद झाल्यास तेल पुरवठासाखळी विस्कळीत होईल व जागतिक बाजारपेठेत तेलाच्या किमती भडकू शकतात.अमेरिकेच्या हल्ल्यानंतर इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्ला खोमेनेई व परराष्ट्रमंत्री अब्बास अराघची यांनी अमेरिकेला हल्याचा परिणाम भोगण्यास सज्ज रहाण्याचा इशारा दिला. कारण अमेरिकेने आमच्या अणुकेंद्रावर हल्ले करून संपूर्ण सिमा ओलांडल्या आहेत त्यामुळे आम्हालाही आमचे संरक्षण करण्याचा अधिकार आहे असा इशारा दिला.

त्यामुळे या युध्दावर योग्य तोडगा निघाला नाही तर भयावह परिणाम होवू शकतात.कारण इराण- इस्त्रायल युध्द व युक्रेन-रशिया युद्ध सध्याच्या परिस्थितीत थांबने शक्य नाही. परंतु अमेरिकेच्या इराणवरील हल्याने जगाला बेचैन केले असून तिसऱ्या महायुद्धाची घंटी वाजविल्याचे दिसून येते. डोनाल्ड ट्रम्पला वाटत असेल की हा अमेरिका, इस्त्रायल आणि जगासाठी ऐतिहासिक क्षण आहे परंतु ही बाब चुकीची आहे.

कारण युद्धामुळे अजून पर्यंत कोणालाच फायदा झालेला नाही उलट नुकसानच झाले आहे आणि आता अमेरिकेच्या इराणवरील हल्याने जगात युद्धजन्य परिस्थिती निर्माण झाली असून याचा गंभीरपणे परिणाम जगातील संपूर्ण देशांना भोगावे लागतील. त्यामुळे संयुक्त राष्ट्रसंघाने पुढाकार घेऊन हे युध्द ताबडतोब थांबविले पाहिजे अन्यथा विनाश अटळ आहे.

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष "डोनाल्ड ट्रम्प जे बोलतात ते करीत नाही, आणि जे बोलत नाही ते करतात" त्यामुळे सध्याच्या परिस्थितीत डोनाल्ड ट्रम्प हे विश्वास पात्र नेता रहाले नाही. अमेरिका सध्याच्या परिस्थितीत स्वार्थी व व्यापारी देश बनला आहे. अमेरिकेने स्वतःच्या स्वाथार्साठी दिनांक १४ जून २०२५ ला असीम मुनीरला अमेरिकि सशस्त्र दलाच्या २५० व्या वर्धापन दिनानिमित्त प्रमुख पाहुणे म्हणून आमंत्रित केले होते व सोबतच डोनाल्ड ट्रम्प यांचा ७९ वा वाढदिवस सुध्दा होता.

या निमित्ताने असीम मुनीरकडून इराणच्या अनेक महत्त्वपूर्ण ठिकाणांची व गुप्त माहिती अवगत केली.याचाही फायदा अमेरिकेने अवश्य घेतला असावा आणि असीम मुनीर पाकिस्तानला परत गेल्यानंतर डोनाल्ड ट्रम्प यांना २०२६ चा नोबेल पुरस्कार देण्याची मागणी मिडियाच्या माध्यमातून केली आणि दुसऱ्याच दिवशी २२ जून २०२५ ला अमेरिकेने इराणवर बी-२ बॉम्बर विमानांनी अणू केंद्रांवर हल्ला केला. यामुळे सध्याच्या परिस्थितीत पाकिस्तान अत्यंत कठीण परिस्थितीत फसल्याचे दिसून येते.

पाकिस्तानचे मित्र राष्ट्र चीन, इराण आणि वर्ल्ड बॅंकेकडुन कर्ज घेण्यासाठी अमेरिकेशी दोस्ती.त्यामुळे आता पाकिस्तान घर का ना घाट का अशी परिस्थिती झाली आहे. डोनाल्ड ट्रम्प ने स्पष्ट शब्दात सांगितले आहे की "आम्ही दोस्ती कोणाही सोबत फुकट करीत नाही". अमेरिकेला कल्पना होती की इराणचा खरा मित्र पाकिस्तान आहे. त्यामुळे अमेरिकेने इराणविषयी संपूर्ण गुप्त माहिती पाकिस्तान कडून हस्तगत केल्याचे स्पष्ट दिसून येते.

इराणला खाईत लोटण्याचे केले असेल तर पाकिस्ताननेच केले आणि ही बाब इराणच्याही लक्षात आली आहे. इराण व चीन पाकिस्तानला सुध्दा धडा शिकवु शकतो. या विनाशकारी महायुद्धाला संयुक्त राष्ट्रसंघाने, नाटो सह संपुर्ण देशांनी थांबवीण्यासाठी प्रयत्न करण्याची गरज आहे, अन्यथा विनाश अटळ आहे. इराणने अमेरिकेसोबत बदला घेण्यासाठी कतर, बहरिन, इराक येथील अमेरिकेनं एअर बेस वर इराणने १० बेलेस्टीक मिसाईल डागली असुन अमेरिकन हल्ल्याचा बदला घेतल्याचा दावा इराणने केला आहे.परंतु इराणने डागलेले १० मिसाईल अमेरिकेने उध्वस्त केल्याचा दावा पेंटागॉन मधुन करण्यात आला आहे.

यामुळे अमेरिकेन एअर बेसला कोणत्याही प्रकारचे नुकसान झाले नाही.युऐई ने इराणच्या हल्ल्याची निंदा केली आहे.अमेरिका, रशिया, चीन, संयुक्त राष्ट्र यांनी एकत्र येऊन ताबडतोब युद्धविराम करावा.



**रमेश कृष्णराव लांजेवार**
**स्वतंत्र पत्रकार, नागपूर.**
**९९२१६९०७७९**

## टीआरपी मागे माध्यमे का?

**वाचक लिहितात**

'श्री दाभोळकर हत्या आणि मी' या विक्रम भावे लिखित पुस्तकाचे नागपुरातील अमृत भवन येथे प्रकाशन झाले. विक्रम भावे यांना केवळ संशयाच्या आधारे अटक झाली होती. शेवटी न्यायालयाने त्यांची निर्दोष मुक्तता केली.

भावे यांना या काळात ज्या मानसिक यातना झाल्या, त्यांचं कौटुंबिक आयुष्य कसं उध्वस्त झालं! याविषयी लोकांना सांगण्यासाठी शेवटी पुस्तकच लिहावे लागले. हे त्यांच आत्मकथन आपल्याला अस्वस्थ करत. अगदी वडिलांचे निधन झालं असताना सुद्धा त्यांच्या अंत्य संस्काराला त्यांना जाता आलं नाही. कीती हा अन्याय! मी बरेचदा ऐकले आहे की, एखाद्या सराईत गुन्हेगाराला, खून्याला सुद्धा अशावेळी हजर करतात. मग इथेच का ही क्रूरता!

मुळातच हे सर्व वाचल्यावर लक्षात येतं की भावे हे या सामाजिक आणि राजकीय व्यवस्थेचे बळी ठरले आहे आणि मीडियाने सुद्धा पक्षपाती भूमिका घेतली असेच लक्षात येते. हल्ली टीआरपी मागे माध्यमे धावतात, त्यात त्यांचे उत्पन्न वाढते, असे असले तरी त्यामुळे एखाद्याच्या आयुष्याची वाताहत होते हे त्यांना कसं लक्षात येत नाही! याला काय म्हणायचं!

त्यांना समाज मनाच्या सुखदुःखाशी काही देणे घेणे नाही का? टीआरपी सोडून मीडियाने बाजू मांडल्यास जनतेची अधिक विश्वास संपादन करेल, आणि कुणा निर्दोष व्यक्तिचा नाहक बळी जाणार नाही.

■ **सौ. माधवी पत्की**
**नागपूर.**

## प्रसार माध्यमांची भूमिका महत्त्वाची..

नुकताच नागपूर येथे दाभोळकर हत्या आणि मी या पुस्तकाच्या प्रकाशन सोहळ्याचा कार्यक्रम झाला. कार्यक्रम पाहताना एका निर्दोष व्यक्तीवर झालेला अन्याय बघून मनात प्रचंड चीड निर्माण झाली.

या संपूर्ण प्रकरणात प्रसारमाध्यमांची भूमिका महत्त्वाची वाटली.

जेव्हा विक्रम भावे यांना केवळ संशयाच्या आधारावर अटक झाली, तेव्हा प्रसारमाध्यमांवर झालेल्या चर्चासत्रांमध्ये हिंदुत्ववादी विचारधारेला आरोपी असल्याचे दर्शविले. त्यांच्याविरोधात जनमत तयार करण्यात आले.

परंतु न्यायालयाने जेव्हा त्यांना निर्दोष घोषित केले, तेव्हा मात्र प्रसार माध्यमे लहानशी बातमी देऊन मोकळे झाले.

एका निर्दोष व्यक्तीला तीन वर्षे तुरुंगवास भोगावा लागला. त्यांना आणि त्यांच्या कुटुंबाला झालेला मनस्ताप आणि भोगाव्या लागलेल्या यातना, त्यांच्या वडिलांच्या निधनानंतर शेवटचे दर्शनही मोबाईलवर घ्यावे लागले. त्यावेळीही प्रसारमाध्यमांनी कुठेही आवाज उठवला नाही. असे का? प्रसार माध्यमे लोकशाहीचा चौथा स्तंभ आहे. त्यांनी निरपेक्षपणे बाजू मांडणे गरजेचे आहे ही सामान्य जनतेची अपेक्षा आहे.

■ **सौ. प्रिया बागडदेव**
**छिंदवाडा.**

## दररोज ब्रेडचे सेवन आणि मेंदूच्या आजाराची शक्यता



धावपळीच्या जीवनात, ब्रेड हा सर्वात सोपा नाश्ता आहे. ब्रेड लवकर तयार होते आणि अनेक चवींमध्ये उपलब्ध असते, लहान मुलांपासून ते मोठ्यांपर्यंत सर्वांची आवडती बनली आहे. आज बहुतेक लोक त्यांच्या सकाळची सुरुवात ब्रेड-जाम किंवा ब्रेड-बटर अशा नाश्त्याने करतात. परंतु सहज उपलब्ध आणि तयार होणारी ब्रेड अनेक समस्यांचे कारण देखील बनत आहे. तज्ज्ञांचा असा विश्वास आहे की जे लोक दररोज ब्रेड खातात ते केवळ शारीरिकच नाही तर मानसिक आजारांनाही बळी पडू शकतात.

ब्रेडमध्ये असलेले उच्च ग्लायसेमिक इंडेक्स रक्तातील साखरेचे प्रमाण वेगाने वाढवू शकते, ज्यामुळे मधुमेहाचा धोका वाढतो. ब्रेडमध्ये फायबर आणि व्हिटॅमिन ईची कमतरता असते, ज्यामुळे खराब कोलेस्ट्रॉल वाढू शकते आणि हृदयरोगाचा धोका वाढू शकतो.

ब्रेडमध्ये असलेले ग्लूटेन आणि रिफाइंड कार्ब्स बद्धकोष्ठता, पोटदुखी आणि अतिसार यासारख्या समस्या निर्माण करू शकतात. कॅलरीज आणि कार्बोहायड्रेट्सचे प्रमाण जास्त असल्याने, जास्त ब्रेड खाल्ल्याने वजन जलद वाढू शकते. याशिवाय, दररोज ब्रेड खाल्ल्याने यकृत आणि मूत्रपिंडांवर वाईट परिणाम होऊ शकतो. ब्रेडमध्ये अनेक प्रकारचे प्रिझर्व्हेटिव्ह्ज आणि रसायने मिसळली जातात, ज्यामुळे शरीराच्या पचनसंस्थेवर परिणाम होऊ शकतो.

**मानसिक आरोग्यावर होणारे परिणाम**

नॅशनल लायब्ररी ऑफ मेडिसिनच्या संशोधनातून असे दिसून आले आहे की दररोज ब्रेड खाल्ल्याने केवळ शारीरिकच नाही तर मानसिक आरोग्यावरही परिणाम होऊ शकतो. ब्रेडमध्ये असलेले रिफाइंड कार्ब्स आणि ग्लूटेनमुळे नैराश्य, ताण आणि एकाग्रतेचा अभाव यासारख्या मानसिक समस्या उद्भवू शकतात. सतत ब्रेड खाल्ल्याने शरीरात जळजळ देखील होऊ शकते, ज्यामुळे मेंदूच्या कार्य करण्याच्या क्षमतेवर परिणाम होऊ शकतो.

दररोज ब्रेड खाल्ल्याने ऑटो-ब्रूअरी सिंड्रोमचा धोका असतो. खरंतर, ब्रेड बनवण्यासाठी यीस्टचा वापर केला जातो. दररोज ब्रेड खाल्ल्याने पोटात यीस्टचे प्रमाण वाढू शकते. अशा परिस्थितीत, जेव्हा पोटात असलेले बॅक्टेरिया ब्रेडमध्ये असलेले कार्बोहायड्रेट्स पचवतात तेव्हा किण्वन होते, ज्यामुळे पोटात अल्कोहोल म्हणजेच इथेनॉल तयार होते. ज्यामुळे रुग्णाला अल्कोहोल न पिता नशेसारखे लक्षणे जाणवतात. हा एक प्रकारचा मानसिक आजार आहे, जो जास्त ब्रेड खाणाऱ्यांना होऊ शकतो.

■ ■ ■

**अशोकायन**
**प्रा. अशोक सारडा**
**मेहकर**
**(९४२१३९४३३९)**



## स्कुल बॅग!

पाठ ठणके कंबर ठणके
दुखू लागलेत खांदे
दप्तराच्या ओझ्याने
आरोग्याचे झालेत वांदे..!

नाकापेक्षा मोती जड
अशी आहे वस्तुस्थिती
शासकांनो पर्याय काढा
करतो आम्ही विनंती!

विषयात करा कपात
युनिट नुसारच हवी
पुस्तके व वह्या
आमच्या दप्तरात..!

## एसुस इंडियाने आरटीएक्स ५०५० जीपीयू असलेल्या नवीन टफ गेमिंग एफ १६ आणि रॉग स्ट्रिक्स जी१६ सह गेमिंग लाइनअपचा विस्तार



नवी दिल्ली, २४ जून : भारतातील नंबर १ गेमिंग ब्रँड असलेल्या रिपब्लिक ऑफ गेमर्स (रॉग) चे घर असलेल्या एसुस इंडियाने एन्व्हिडिया जिफोर्स आरटीएक्स ५०५० ग्राफिक्सने सुसज्ज असलेल्या रॉग स्ट्रिक्स जी१६ सोबत नवीन टफ गेमिंग एफ १६ सादर करून त्यांच्या गेमिंग लाइनअपचा विस्तार केला आहे. याशिवाय, एसुस रॉग ने त्यांच्या विद्यमान २०२४ रॉग स्ट्रिक्स जी१६ (जी६१४) लाइनअपला रिफ्रेश केलेल्या आरटीएक्स ५०५० जीपीयूने सुसज्ज करून अपग्रेड केले आहे, ज्यामुळे किंमत विभागांमध्ये उच्च-कार्यक्षमता गेमिंग प्रदान करण्याची त्यांची वचनबद्धता आणखी मजबूत झाली आहे.

रॉग स्ट्रिक्स जी१६ (जी६१५ जेएचआर-एस ५००५ डब्ल्यूएस) १,५९,९९० रुपये, रॉग स्ट्रिक्स जी१६ (जी६१४पीएच-आरवी ०३३ डब्ल्यूएस) १,४४,९९० रुपये, टफ एफ १६ (एफएक्स६०८जेएच-आरवी ०५७ डब्ल्यूएस) १,२४,९९० रुपयात उपलब्ध आहे.

गेमिंग लाइनअपच्या नवीन श्रेणीबद्दल बोलताना, एसुस इंडियाचे उपाध्यक्ष, ग्राहक आणि गेमिंग पीसी, अर्नोल्ड सु म्हणाले, एसुसमध्ये, आम्ही स्पर्धात्मक गेमर्सपासून ते दररोजच्या निर्मात्यांपर्यंत प्रत्येक प्रकारच्या वापरकर्त्यांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी आमच्या गेमिंग लाइनअपचा विस्तार आणि विकास करण्यासाठी सतत काम करत आहोत. आमच्या रॉग आणि टफ मालिकेत आरटीएक्स ५०५०-संचालित मॉडेल्स सादर करून, आम्ही हे सुनिश्चित करत आहोत की उच्च-कार्यक्षमता गेमिंग, एआई-तयारी आणि इमर्सिव्ह व्हिज्युअल्स अनेक किंमती आणि वापर प्रकरणांमध्ये उपलब्ध आहेत. हे लाँच भारताचा नंबर १ गेमिंग ब्रँड म्हणून आमचे स्थान मजबूत करण्यासाठी आणि गेमिंग इकोसिस्टमच्या प्रत्येक कोपऱ्याला सेवा देण्याच्या दिशेने आणखी एक पाऊल आहे.

## अदानी एअरपोर्ट्सने मुंबई इंटरनॅशनल एअरपोर्टसाठी जागतिक गुंतवणूकदारांकडून १ अब्ज डॉलर्सचे वित्तसहाय्य मिळवले

**मुंबई, २४ जून :** अदानी एंटरप्रायझेस लिमिटेडची पूर्ण मालकीची उपकंपनी आणि भारतातील सर्वात मोठी खासगी विमानतळ ऑपरेटर -अदानी एअरपोर्ट्स होल्डिंग्स लिमिटेड (एएएचएल) ने मुंबई इंटरनॅशनल एअरपोर्ट लिमिटेड (एमआयएएल) साठी प्रोजेक्ट फायनान्स संरचनेद्वारे यशस्वीरित्या १ अब्ज डॉलरचे वित्तसहाय्य प्राप्त केले आहे. या व्यवहारात जुलै २०२९ मध्ये परतफेड होणाऱ्या ७५० दशलक्ष डॉलर्सच्या नोट्सचा समावेश आहे, ज्यांचा वापर पुनर्वित्तासाठी केला जाणार आहे. याशिवाय अतिरिक्त २५० दशलक्ष डॉलर्स उभारण्याची तरतूदही या संरचनेत आहे, ज्यामुळे एकूण वित्तपुरवठा १ अब्ज डॉलर्सपर्यंत पोहोचतो. ही रचना एमआयएएल च्या विकास, आधुनिकीकरण आणि क्षमतेच्या वाढीसाठीच्या भांडवली खर्च कार्यक्रमासाठी अधिक वित्तीय लवचिकता प्रदान करेल.

ही भारतातील विमानतळ पायाभूत सुविधा क्षेत्रातील पहिला (इन्व्हेस्टमेंट ग्रेड- आयजी) रेटिंग असलेला खासगी बाँड इश्यू आहे. हा व्यवहार अपोलो व्यवस्थापित निधीच्या नेतृत्वाखाली झाला असून, ब्लॅकरॉक व्यवस्थापित निधी, स्टँडर्ड चार्टर्ड आणि इतर प्रमुख संस्थात्मक गुंतवणूकदार आणि विमा कंपन्यांच्या सहभागामुळे जागतिक गुंतवणूकदारांचा भारताच्या पायाभूत सुविधा क्षेत्रातील संधींवर आणि अदानी एअरपोर्ट्सच्या कार्यक्षम संचालन प्लॅटफॉर्मवर विश्वास अधोरेखित होतो. एमआयएएल च्या स्थिर मालमत्ता तळावर, नियमित रोख प्रवाह आणि कार्यक्षमतेच्या जोरावर या नोट्सना बीबीबी-/स्थिर अशी रेटिंग मिळण्याची अपेक्षा आहे.

एएएचएल दीर्घकालीन दृष्टिकोनाशी कटिबद्ध असून, भारतातील विमानतळ पायाभूत सुविधा क्षेत्रात सातत्याने आधुनिकीकरण, क्षमतेत वाढ, डिजिटायझेशन आणि तंत्रज्ञान एकत्रीकरणाच्या माध्यमातून गुंतवणूक करत आहे. हा व्यवहार एमआयएएल च्या शाश्वतता उद्दिष्टांना गती देईल आणि २०२९ पर्यंत नेट-झिरो उत्सर्जन प्राप्त करण्याच्या उद्दिष्टाला आधार देईल.

या इश्यूआधी एएएचएल ने जागतिक बँकांच्या गटाकडून ७५० दशलक्ष डॉलर्सचा वित्तपुरवठा मिळवला होता. हा नवीन व्यवहार भारताच्या पुढील पिढीच्या पायाभूत सुविधा व्यासपीठासाठी अदानी समूहाच्या जागतिक भांडवली बाजारांवरील प्रवेश क्षमता आणि गुणवत्तापूर्ण गुंतवणूकदार आकर्षित करण्याच्या क्षमतेला अधोरेखित करतो.

श्री. अरुण बन्सल, सीईओ, अदानी एअरपोर्ट्स होल्डिंग्स लिमिटेड म्हणाले:ही यशस्वी बाँड इश्यू अदानी एअरपोर्ट्सच्या कार्यप्रणालीची ताकद, मुंबई इंटरनॅशनल एअरपोर्टच्या भक्कम पाया आणि शाश्वत पायाभूत विकासासाठीची आमची कटिबद्धता अधोरेखित करते. अपोलो व्यवस्थापित निधी आणि आघाडीच्या संस्थात्मक गुंतवणूकदारांच्या सहभागामुळे आम्ही जागतिक भांडवलीच्या स्रोतांमध्ये आमचा प्रवेश अधिक मजबूत केला आहे. भारतातील सर्वात मोठ्या खासगी गुंतवणूक श्रेणीतील प्रोजेक्ट फायनान्स व्यवहारांपैकी एक सुरक्षित करण्याची आमची क्षमता हे आर्थिक शिस्त, भांडवली कार्यक्षमतेचा आणि दीर्घकालीन मूल्यनिर्मितीचा आमचा कटिबद्ध दृष्टिकोन दर्शवते.

या व्यवहारासाठी कायदेशीर सल्लागारांमध्ये एमआयएएल साठी एअँडओ शीअरमन आणि सायरिल अमरचंद मंगलदास यांचा समावेश होता, तर गुंतवणूकदारांसाठी मिलबँक एलएलपी आणि खैतान अँड कंपनी सल्लागार होते.

## करुणा पांडे हिच्याविषयी गौरव चोप्रा म्हणतो, कॉफी की चहा? या वादावरून आमच्यात संवाद सुरू झाला



**मुंबई, २४ जून :** सोनी सबवरील पुष्पा इम्पॉसिबल मालिकेत पुष्पाची हृदयस्पर्शी आणि आजच्या काळाशी सुसंबद्ध असलेली कथा सर्व वयोगटातील प्रेक्षकांना आपलीशी वाटत आहे. प्रसिद्ध अभिनेता गौरव चोप्राने या मालिकेच्या माध्यमातून टेलिव्हिजनवर दणक्यात पुनरागमन केले आहे. प्रोफेसर राजवीर शास्त्रीच्या भूमिकेत त्याने या मालिकेला वेगळे परिमाण दिले आहे. पुष्पाने कायद्याचा अभ्यास करण्यासाठी प्रोफेसर शास्त्रींच्याच कॉलेजात प्रवेश मिळवला आहे. या दोन्ही कलाकारांचे पडद्याच्या मागे जे सख्य जुळले आहे, ते पडद्यावरील त्यांच्या नात्यापेक्षा अगदी वेगळे आहे. गौरव चोप्राशी असलेल्या नात्याविषयी करुणा पांडे म्हणते, अगदी पहिल्या फोन कॉलपासूनच आमच्यात एक अनपेक्षित मोकळेपणा आला होता. एकमेकांविषयी वाटणारा आपलेपणा पडद्यावर आमच्या दृश्यांमध्ये प्रतिबिंबित झाला. आमचे दोघांचे स्वभाव खूप वेगळे आहेत. पण अभिनय कलेकडे आम्ही ज्या पद्धतीने पाहतो, त्यात एक अनोखे साम्य आहे. तो कामाच्या बाबतीत खूपच प्रामाणिक, उत्स्फूर्त आणि जागरूक आहे. तीव्रता आणि हास्य यांच्यातील संतुलन तो ज्या पद्धतीने सांभाळतो, ते बघायला मला आवडते. राजवीर ही खूप गुंतगुंतीची, गंभीर व्यक्तिरेखा आहे. पण दोन टेक्सच्या मधल्या वेळेत आम्ही एकमेकांची थट्टा मस्करी करतो आणि खूप हसतो. आमची जेवणाची वेळ जेवण आणि मजेशीर संभाषणाने भरलेली असते. काही क्षणात आम्ही अभिनय दुनियेतून बाहेर पडून मस्ती करू लागतो. आमच्यात सहजपणा आहे, एक लय आहे आणि सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे आम्हाला दोघांना अभिनयाचे वेड आहे. मला वाटते प्रेक्षकांना आमच्यातली हीच गोष्ट रुचली आहे.

करुणाशी झालेल्या व्यक्तिगत आणि सर्जनशील मैत्रीविषयी बोलताना गौरव म्हणतो, तीन वर्षांपासून सुरू असलेल्या एका यशस्वी मालिकेत इतक्या उशिरा एंट्री घेणे खूप आव्हानात्मक असते. मालिकेला एक लय आलेली असते, पात्रे प्रेक्षकांच्या परिचयाची झालेली असतात आणि अशात तुम्ही एंट्री घेऊन त्यात ढवळाढवळ करता! राजवीर एक गुंतगुंतीची व्यक्तिरेखा आहे. त्याच्या स्वभावात अनेक पदर आहेत. तो दुखावलेला आहे आणि त्याच्या भावना तीव्र आहेत. पण प्रेक्षक पुष्पाच्या नजरेतून त्याच्याकडे बघत आहेत. मी सेटवर पाऊल टाकण्याच्या अगोदरच, करुणा जींनी आपल्या टीमतर्फे मला शुभेच्छा दिल्या होत्या. आणि कदाचित तुमचा विश्वास बसणार नाही, पण सेटवर चहा की कॉफी या वादावरून आमच्यात संवाद वाढला. मजेमजेत सुरुवात होऊन हा वाद पुढे भलताच वाढला आणि सेटवरील सगळ्या मंडळींनी त्यांना पटणारी बाजू उचलून धरली. अशा काही क्षणांमुळे आमच्यात मोकळेपणा वाढला आणि ही केमिस्ट्री तुम्हाला पडद्यावर प्रतिबिंबित होताना दिसेल.

## या उन्हाळ्यात ट्रेनमधील स्विगी फूड विद्यार्थ्यांसाठी बनला प्रवासातील साथीदार

**नागपूर, २४ जून :** भारतातील अग्रेसर मागणी केल्यावर सुविधा उपलब्ध करून देणारे क्षेत्र म्हणजेच स्विगी लिमिटेडने जाहीर केले की, या उन्हाळ्याच्या सुटीमध्ये भारतामधील विद्यार्थ्यांसाठी फूड ऑन ट्रेन हा प्रवासाचा साथीदार बनत आहे. रेल्वेच्या कोचमध्ये मोठ्या प्रमाणात मिळणाऱ्या ऑर्डरपासून ते रेल्वेत नेहमी मिळणाऱ्या पदार्थांपेक्षा जास्त प्रमाणात विविध पदार्थांपर्यंत विद्यार्थी त्यांचा प्रवास अधिक चवदार आणि अविस्वमरणीय बनविण्यासाठी स्विगीचा वापर करत आहे. या उपक्रमाबद्दल बोलतांना, स्विगीच्या फूड स्ट्रॅटेजी, कस्टमर एक्सपिरियंस आणि न्यू इनिशिएटीव्हचे उपाध्यक्ष श्री. दीपक मालू म्हणाले, विद्यार्थ्यांना स्विगीची ट्रेनमधील फूड सर्व्हिस फारच आवडते! ते वेगवेगळ्या पदार्थांपासून ते रात्रीच्या जेवणापर्यंत आणि अगदी जास्त संख्येने जेवणापर्यंत सर्वकाही ऑर्डर करत आहेत. विद्यार्थ्यांकडून मिळणारी ही मोठी मागणी स्विगीला ऑनबोर्ड डायनिंग अनुभव सुधारत राहण्यासाठी आणि विद्यार्थ्यांना त्यांच्या प्रवासात कधीही आणि कुठेही हवे असलेले जेवण पोहोचवण्यावर लक्ष केंद्रित करण्यास प्रेरणा देत आहे.

आयआरसीटीसी सोबत स्विगीची भागीदारी आणि भारतातील १०० हून अधिक स्टेशनपर्यंतचा विस्तार हा रेल्वे प्रवास अधिक आनंददायी आणि सोयीस्कर बनवण्याच्या त्यांच्या वचनबद्धतेला पूर्ण करतो. खात्रीशीर प्रवास्यांच्या सीटवरच डिलिव्हरी, कटलरी आणि हजारो ब्रँड्समध्ये पसरलेल्या वैविध्यपूर्ण मेनूसह, स्विगी फूड ऑन ट्रेन प्रवासाला एका वेळी एक ऑर्डर देऊन अविस्मरणीय अन्नपदार्थांचा अनुभव देत आहे.

फूड ऑन द ट्रेनवर ऑर्डर देण्यासाठी, पुढील लिंकवर फॉलो करा - https://www.swiggy.com/order-food-online-in-train.

## ओप्पो लॉन्च करत आहे के१३एक्स ५जी अत्यंत मजबूत आणि टिकाऊ स्मार्टफोन

**नागपूर, २४ जून :** ओप्पो इंडिया ने ओप्पो के१३एक्स ५जी फोन दाखल केला आहे, हा या सेगमेन्टमधील सगळ्यात दणकट स्मार्टफोन आहे. टिकाऊपणा आणि तडजोड न करता सर्व फंक्शन्सची अपेक्षा ठेवणारे तरुण विद्यार्थी आणि नवे नवे व्यावसायिका यांच्यासाठी प्राधान्याने हा फोन बनवण्यात आला आहे. लवचिकता असलेल्या के१३एक्स ५जी मध्ये एसजीएस गोल्ड ड्रॉप सर्टिफिकेशन आणि एमआयएल-एसटीडी ८१०एच मिलिटरी-ग्रेड स्टँडर्ड आहेत. त्यामुळे या श्रेणीतील हा सगळ्यात दणकट फोन बनला आहे. एरोस्पेस-ग्रेडच्या एएम०४ अॅल्युमिनियम मिश्रधातूमधून याची ३६०ओ डॅमेज प्रूफ आर्मर बॉडी बनवण्यात अली आहे. क्रिस्टल शील्ड ग्लासने त्याला मजबुती दिली आहे आणि समुद्री स्पन्जने प्रेरित बायोमिमेटिक स्पॉन्ज शॉक अब्जॉर्प्शन सिस्टम मुळे हा फोन आणखी प्रगत बनला आहे. स्टाइल किंवा उपयोगिता यांच्याशी तडजोड न करता, ओप्पो के१३एक्स ५जी ने आयपी६५ वॉटर आणि डस्ट रेझिस्टन्ससह टिकाऊपणा आणि बिजोड मजबुतीच्या बाबतीत एक नवीन मापदंड स्थापित केला आहे.



ओप्पो के१३एक्स ५जी च्या ४जीबी+१२८जीबी व्हेरियन्टची किंमत ११,९९९रु., ६जीबी+१२८जीबी व्हेरियन्टची किंमत १२,९९९ रु. आणि ८जीबी+१२८जीबी व्हेरियन्टची किंमत १४,९९९रु. असून २७ जून २०२५ रोजी दुपारी १२ वाजल्यापासून हा फोन ओप्पो ई-स्टोअर मध्ये आणि फ्लिपकार्ट विक्रीसाठी उपलब्ध होईल. यामध्ये मिडनाइट व्हायोलेट आणि सनसेट पीच हे दोन रंगांचे पर्याय आहेत. हा फोन खरेदी करणाऱ्या ग्राहकांना सेलच्या दिवशी काही निवडक बँक ऑफर्सवर ४जीबी आणि ६जीबी च्या व्हेरियन्टवर १००० रु. आणि ८जीबी च्या व्हेरियन्टवर २००० रु. इन्स्टंट डिस्काउंट मिळेल किंवा १००० रु. चा एक्स्चेंज बोनस आणि अतिरिक्त ३ महिन्यांपर्यंत नो कॉस्ट ईएमआय पर्याय मिळेल. ज्यामुळे या तिन्ही व्हेरियन्टची प्रभावी किंमत अनुक्रमे १०,९९९, ११,९९९ आणि १२,९९९ रु. होईल.

ओप्पो इंडिया चे हेड ऑफ प्रॉडक्ट कम्युनिकेशन सॅव्हीओ डिसूझा म्हणाले, ओप्पो के१३एक्स लॉन्च करून आम्ही असामान्य टिकाऊपणा, फ्लूईड परफॉर्मन्स आणि उत्कृष्ट पॉवर कार्यक्षमता या जेन झीच्या वास्तविक गरजा, चांगल्या किंमतीत पूर्ण करण्याच्या आमच्या वचनबद्धतेस पुष्टी देत आहोत. के१३एक्स मध्ये आधुनिक बायोमिमेटिक शॉक अब्जॉर्प्शन सिस्टम, या श्रेणीतील आघाडीचे बॅटरी ऑप्टिमायझेशन आणि ५जी तत्परता आहे. या स्मार्टफोनमधून तडजोड न करता, एंट्री-स्तराच्या स्मार्टफोनमध्ये काय काय शक्य असू शकते याची व्याख्या करण्याचे ओप्पो चे व्हिजन झळकते.

स्मृती रविचंद्रन, उपाध्यक्ष- मोबाइल्स, फ्लिपकार्ट म्हणाल्या, फ्लिपकार्ट मध्ये आम्हाला फक्त दमदार परफॉर्मन्स देणाऱ्या नाही, तर दैनंदिन जीवनाच्या मागण्या पुरवणाऱ्या स्मार्टफोन्सची वाढती गरज स्पष्ट दिसत आहे. ओप्पो के१३एक्स ५जी च्या लॉन्चमुळे ग्राहकांची कोणतीही तडजोड न करता टिकाऊपणाची वाढती मागणी पूर्ण होणार आहे. मिलिटरी ग्रेडचा दणकटपणा, नावीन्यपूर्ण शॉक अब्जॉर्प्शन प्रणाली आणि विकसित फीचर्स असलेला के१३एक्स हा मूल्य, स्टाइल आणि लवचिकतेचा शोध घेणाऱ्या तरुणांसाठी एक उत्तम पर्याय आहे. हा दमदार आणि टिकाऊ फोन देशभरातील लक्षावधी ग्राहकांपर्यंत पोहोचवण्यासाठी ओप्पो सोबत पुन्हा एकदा भागीदारी करताना आम्हाला आनंद होत आहे.

## आजच्या डिजिटल युगात ओळखीचा सर्रास गैरवापर होतो : परिवा प्रणती

**मुंबई, २४ जून :** सोनी सबवरील वागले की दुनियामध्ये मध्यमवर्गीय माणसाच्या दैनंदिन जीवनातील आव्हानांचे, मूल्यांचे आणि त्यांच्या चिवटपणाचे चित्रण असते. जीवनातील चढ-उतारांमधून वागले कुटुंब प्रेक्षकांना कौटुंबिक मूल्ये, प्रामाणिकपणा आणि आशा यांचे महत्त्व जाणवून देते. त्यामुळेच ही मालिका प्रेक्षकांना आपलीशी वाटते.

आगामी भागांमध्ये, अगदी अनपेक्षित असे काही तरी घडते- साई दर्शन सोसायटीमध्ये पोलीस येतात आणि शेजारी देशासाठी हेरगिरी करण्याच्या आरोपावरून वंदना (परिवा प्रणती)ला अटक करतात. अधिकाऱ्यांनी सांगितल्या प्रमाणे, संवेदनशील सरकारी माहिती फुटली असते आणि या बनवाबनवीसाठी जो अॅड्रेस वापरलेला असतो, तो वंदनाच्या नावे असतो.

प्रेक्षक बघतील की संकट दाट होत जाते. एका अज्ञात विदेशी कंपनीमधून २५ लाख रु. वंदनाच्या खात्यात पाठवले जातात. तिने गुप्त माहिती दिल्याबद्दल तिला आलेली रक्कम असल्याचा संशय यामुळे बळावतो. पोलीस राजेशला (सुमित राघवन) सांगतात की, पुरावा सबळ आहे. वागले कुटुंब या प्रकाराने स्तब्ध होऊन जाते. वागले कुटुंबीय हे काय घडते आहे याचा अर्थ लावण्याचा प्रयत्न करत आहेत, तर वंदना सापळ्यात पूर्ण अडकलेली दिसत आहे.

सत्य शोधून वागले कुटुंब वंदनाचे निरपराधित्व सिद्ध करू शकेल का?

वंदना वागलेची भूमिका करणारी परिवा प्रणती म्हणते, आजच्या डिजिटल युगात, सायबर फसवेगिरी आणि ओळखीचा गैरवापर सर्रास होत आहे. वंदनाच्या बाबतीत जे झाले, तो एक सावधानतेचा इशारा आहे. तिला हेरगिरीसारख्या गंभीर आरोपात अडकवण्यासाठी तिच्या नावाचा आणि खात्याचा उपयोग झाला आहे. यावरून लक्षात येईल की आपणा सर्वांनाच किती मोठा धोका आहे. हा मुद्दा आमच्या मालिकेत हाताळत असल्याचा मला अभिमान वाटतो. कारण आपण सर्वांनीच अधिक जागरूक आणि सतर्क राहण्याची गरज आहे. अशा बनवाबनवीमुळे निरपराध जीवन उद्धवस्त होऊ शकते. नागरिक म्हणून सावध राहणे आणि संशयास्पद हालचालींची माहिती शासनास देणे आणि सशक्त सायबर सिक्युरिटी प्रणालीचा आग्रह धरणे ही आपली एकत्रित जबाबदारी आहे.

## वैयक्तिक इतिहास, अभिमान आणि दुखावलेपणात माझ्या व्यक्तिरेखेची प्रेरणा आहे : रजत दहिया

**मुंबई, २४ जून :** सोनी सबवरील उफ्फ ये लव है मुश्किल ... मालिकेतील अनपेक्षित कलाटण्या आणि जटिल व्यक्तिरेखा यांच्यामुळे प्रेक्षकांची उत्कंठा वाढत आहे. नुकत्याच, युग (शब्बीर अहलूवालिया) आणि कैरी (आशी सिंह) यांच्यातील बदलत्या नात्याचा आनंद घेऊ लागलेल्या प्रेक्षकांना अचानक विक्रम (विकी) मल्होत्रा (रजत दहिया)च्या एंट्रीमुळे एक नाट्यात्मक धक्का बसला आहे. विक्रम मल्होत्रा एक मोहक व्यक्तिमत्त्वाचा पण कुटिल वृत्तीचा वकील आहे, जो युगचा व्यावसायिक शत्रू आहे.

विक्रम ही काही साधीसुधी व्यक्तिरेखा नाही. तो युगचा जुना प्रतिस्पर्धी आहे. त्यांच्या इतिहासात फसवणूक आणि निरंतर संघर्ष आहे. त्यांच्या आगमनामुळे मनात खोल दाटलेले तणाव पुन्हा वर आले आहेत. युगच्या जीवनात तर त्यामुळे गोंधळ माजलाच आहे, पण कैरी सोबतचे त्याचे नाजुक नाते देखील प्रभावित होणार आहे. वरकरणी विक्रम शांत आणि मोहक दिसत असला, तरी त्याच्यात जुना राग ठासून भरला आहे. सत्य कसे खोटे भासवावे आणि खोट्याला कसा सत्याचा मान मिळवून द्यावा हे तो जाणतो. त्यामुळे त्याच्या येण्याने कथानकात अनपेक्षित वळणे येणार हे नक्की.

टेलिव्हिजन मालिकांमधील त्याच्या प्रभावी अभिनयाबद्दल ओळखला जाणारा रजत दहिया आपल्या भूमिकेविषयी म्हणतो, विक्रमच्या व्यक्तिरेखेतील गुंतागुंत आणि त्याचे अनपेक्षित वागणे यामुळे मी त्याच्याकडे आकृष्ट झालो. तो फक्त एक खलनायक नाही- लोकांची कमजोरी ओळखून त्यांचा उपयोग कसा करून घ्यायचा हे त्याला बरोबर समजते. तो तुम्हाला मोहित करतो, स्वतःविषयीच तुम्हाला साशंक करतो आणि त्याला हव्या त्या पद्धतीने परिस्थिती वळवून घेतो. हे करताना सगळ्यांपेक्षा तो दोन पावले पुढेच असतो. पण यातील मेख अशी आहे की, तो केवळ दुष्टपणाने हे करत नाही, तर त्याचे दुखावलेले मन, अभिमान आणि वैयक्तिक भूतकाळ यामुळे त्याचे वागणे असे आहे. युग आणि त्याच्यामधील मानसिक रस्सीखेच कशी चालते हे बघण्यास मी उत्सुक आहे. विशेषतः एका आगळ्यावेगळ्या प्रेमकहाणीत हा संघर्ष दाखवल्याने तो अधिकच रोचक होतो.




## आज का अंदाज

बुधवार २५ जून २०२५
जबरदस्त पास होणारे चान्सेस
पत्थर फोड एकच

कल्याण बाजार

| 3 | 6 | 9 | 0 |
|---|---|---|---|
| 120 | 123 | 900 | 235 |
| 247 | 259 | 450 | 370 |
| 300 | 349 | 360 | 480 |
| 32 | 62 | 91 | 01 |
| 35 | 65 | 97 | 07 |
| 38 | 68 | 94 | 04 |

मुंबई बाजार

| 3 | 4 | 7 | 8 |
|---|---|---|---|
| 149 | 239 | 377 | 224 |
| 256 | 590 | 449 | 350 |
| 670 | 400 | 557 | 440 |
| 32 | 42 | 70 | 80 |
| 35 | 45 | 71 | 81 |
| 36 | 46 | 79 | 89 |

२५ जून २०२५
सर्व बाजारांसाठी

| | | | |
|---|---|---|---|
| 10 | 40 | 53 | 82 |
| 19 | 49 | 52 | 83 |
| 17 | 47 | 56 | 86 |

कल्याण, मुंबई आणि सर्व बाजारासाठी 60 पानांचा चार्ट मिळेल. 100 टक्के खात्रीशीर.
प्रो. बालाजी कुमार
9822486034


## सुपरटेक ईव्ही सार्वजनिक इश्यूमधून २९.९० कोटी रुपये उभारणार

**नवी दिल्ली, २४ जून :** सुपरटेक ईव्ही लि. ही इलेक्ट्रिक वाहन बाजारपेठेतील एक अग्रणी शक्ती असून दुचाकी (ई२डब्ल्यू) आणि इलेक्ट्रिक तीन चाकी (ई३डब्ल्यू) वाहनांवर लक्ष केंद्रित करण्यासह कंपनी एसएमई सार्वजनिक इश्यूमधून २९.९० कोटी रुपये उभारण्याची योजना आखत आहे.

कंपनीला बीएसई एसएमई प्लॅटफॉर्मवर पब्लिक इश्यू लाँच करण्यास मान्यता मिळाली असून हा सार्वजनिक इश्यू २५ जून २०२५ रोजी सबस्क्रिप्शनसाठी खुला होईल आणि २७ जून २०२५ रोजी बंद होईल. कॉर्पोरेट मेकर्स कॅपिटल लि. हे या इश्यूचे बुक रनिंग लीड मॅनेजर आहे.

२९.९० कोटी रुपयांची प्रारंभिक सार्वजनिक ऑफर ही पूर्णपणे ३२,४९,६०० इक्विटी शेअर्सची एक नवीन इश्यू आहे, ज्याचे दर्शनी मूल्य १० रुपये आहे. इश्यूसाठी किंमत पट्टा ८७ ते ९२ रुपये प्रति शेअर आहे. या इश्यूमधून कंपनी १६.५० कोटी रुपये खेळत्या भांडवलाच्या गरजांसाठी, ३ कोटी रुपये काही कर्जांच्या भागाच्या परतफेडीसाठी आणि उर्वरित रक्कम सामान्य कॉर्पोरेट उद्देशांसाठी आणि इश्यूशी संबंधित खर्चासाठी वापरण्याची कंपनीची योजना आहे.

अर्जासाठी किमान लॉट साईज १,२०० शेअर्स आहे जे किमान १,१०,४०० रुपयांच्या गुंतवणुकीत रूपांतरित होतात. ९२ रुपये प्रति शेअर वरच्या किंमत बँड आहे. इश्यूसाठी रिटेल कोटा ४७.५१ टक्के, एनआयआय ४७.४७ टक्के, क्यूआयबी ५.०२ टक्के आणि मार्केट मेकर ५.०२ टक्के आहे.

दरम्यान, कंपनीच्या उत्पादन पोर्टफोलिओमध्ये १२ मॉडेल्स समाविष्ट आहेत, ज्यामध्ये ८ प्रकारचे इलेक्ट्रिक दुचाकी आणि ४ प्रकारचे ई-रिक्षा आहेत. आर्थिक वर्ष २४-२५ साठी कंपनीने ७५.१९ कोटी रुपयांचा महसूल आणि ६.१९ कोटी रुपयांचा निव्वळ नफा नोंदवला आहे.

## राशीभविष्य

**मेष :** आज पूर्ण होत असलेल्या कामात अनावश्यक विलंब होईल. तुम्ही तुमची बुद्धिमत्ता आणि विवेक वापरावा. नोकरीच्या शोधात तुम्हाला इकडे तिकडे भटकंती करावी लागेल.

**वृषभ :** आजचा दिवस तुमच्यासाठी मिश्र परिणामांचा असेल. तुमचे वागणं सुधारण्याचा प्रयत्न करा. समाजात तुमची ओळख निर्माण करण्याचा प्रयत्न करा. तुमची महत्त्वाची कामे इतरांवर सोपवू नका.

**मिथुन :** आज आर्थिक व्यवहारात अधिक काळजी घ्या. जास्त पैसे खर्च होऊ शकतात. परिस्थिती लक्षात घेऊन भांडवली गुंतवणुकीबाबत अंतिम निर्णय घ्या. प्रेमसंबंधांमध्ये जोडीदारावर संशय घेणे टाळा.

**कर्क :** आज तुमची जुन्या मित्राशी भेट होईल. निपुत्रिक लोकांना मुलांशी संबंधित चांगली बातमी मिळेल. प्रेमसंबंधांमध्ये संशयास्पद परिस्थिती टाळा. आज तुम्हाला एखादी चांगली बातमी मिळेल.

**सिंह :** खर्चावर नियंत्रण ठेवा. अनावश्यक खर्च टाळा. आर्थिक स्थिती मजबूत राहील. वादविवाद टाळा. मालमत्ता खरेदी-विक्रीत उशीर होईल. मात्र, प्रवासाचे योग संभवतील. कामाला सकारात्मक प्रतिसाद मिळेल.

**कन्या :** सहकाऱ्यांशी मतभेद होऊ शकतात. कधीकधी वातावरण आनंदी तर कधीकधी तणावपूर्ण असू शकते. कामाच्या ठिकाणी महत्त्वाच्या योजना एखाद्या अज्ञात कारणामुळे पुढे ढकलल्या जाऊ शकतात.

**तूळ :** तुम्हाला अतिशय महत्त्वाच्या कामात यश मिळेल. तुम्हाला स्वादिष्ट जेवण मिळेल. तुम्हाला लांबच्या प्रवासाला जावे लागू शकते. कामाच्या ठिकाणी तुमच्या अधीनस्थांशी जवळीक वाढेल.

**वृश्चिक :** आज प्रेमसंबंधांमध्ये तुमच्या भावनांना सकारात्मक दिशा द्या. सुसंवाद निर्माण करण्याची गरज भासेल. वैवाहिक जीवनात पती-पत्नीमध्ये आनंद आणि सहकार्य वाढेल.


**धनु :** आज तुम्ही कायदेशीर अडचणीत येऊ शकता. ज्यामुळे तुम्हाला प्रचंड शारीरिक आणि मानसिक त्रासाला तोंड द्यावे लागेल. दुविधा निर्माण करणाऱ्या परिस्थितीत ताणतणावाला हावी होऊ देऊ नका.

**मकर :** आजचा दिवस आनंदाचा आणि प्रगतीचा असेल. महत्त्वाच्या कामात कोणताही मोठा निर्णय तुमच्या वैयक्तिक परिस्थिती लक्षात घेऊनच घ्या. आज कामाच्या ठिकाणी निरर्थक वाद टाळा.

**कुंभ :** परस्पर विश्वास कायम ठेवा. वैवाहिक जीवनात पती-पत्नीमध्ये आनंद आणि सहकार्य वाढेल. तुमचे आरोग्य बिघडू शकते. महिलांचा वेळ हास्य आणि विनोदात जाईल.

**मीन :** तरुण मित्रांसोबत बाहेर जाण्याची योजना आखतील. भौतिक सुख, समृद्धी आणि व्यवसायात वाढ होण्याची शक्यता आहे. सामाजिक, राजकीय चर्चा किंवा वादविवाद टाळा.

## शब्दकोडे क्रमांक २१४६




**आडवे शब्द :-**
१) आश्चर्य
३) सैनिकांची एक स्फुर्तीदायक घोषणा
९) पार, ओटा
१०) गाणे गाणारा
११) मोठी जाड तलवार
१२) सुंदर युवती
१४) साय
१५) सुंदर, शहाणा
१७) गावाखालची जमीन
१९) नक्षीदार ताट
२१) शिसे आणि कथील यांचा मिश्र धातू
२२) मारझोड
२४) अनुमान, तर्क
२५) फळांचा राजा
२६) शोभिवंत, फक्कड
२७) घाण
२९) खोडण्याचे साधन
३०) बिया, रोपे इ
३२) पाणी, आयुष्य
३४) उपदेश
३६) वर-वधू मधील लग्नातील पडदा
३८) रेलचेल समृद्धी
३९) हरलेला
४१) गणितातील मध्यम प्रमाण
४३) लिखित निवेदन
४४) चेहेऱ्यावरील तेज
४६) घ्राणेंद्रिय
४७) फळातील खाद्यभाग
४८) हुप्प्या
५०) गाडीचे छत
५२) देशोदेशीचे नाणे
५४) नसत्या उठाठेवी करणारी
५६) धोबी
५७) श्रम, मेहनत
५८) बक
६०) पशुतुल्य आचरण करणारा मनुष्य, नराधम
६२) गव्हाचे बारीक पीठ
६३) हत्ती, वारण
६५) विंचवाचा डसण्याचा अवयव
६६) पटाईत
६८) मुसलमानांचा एक सण
७०) मेहनत, श्रम
७१) लाज
७२) गरळ ओकणारा सरपटी प्राणी
७४) समईतील कापसाची वळी
७५) पाण्याचा उकळताना होणारा आवाज
७६) ठकबाजी, फसविणे

**उभे शब्द :-**
१) परवानगी, मान्यता
२) बागांची लागवड करणारा मालक
३) उगाच
४) तात्काळ समर्पक उत्तर देणारा
५) दारूचा एक प्रकार
६) अस्वल, माकड यांना संभाळणारा
७) अस्थि, हाडूक,
८) उर्ध्व दिशा
९) गव्हाचे पीठ
१३) मृत्यू
१६) सरस्वती
१८) चावट, ताळतंत्र नसलेला
२०) गोंधळ व अव्यवस्थेची स्थिती
२२) मान देणे, मान्य करणे
२३) जयपराजय
२६) सावली
२७) थोडक्यात महानगरपालिका
२८) अफूचे बी
३१) बेलाचे पान
३३) वर देणारा, गणपती
३५) जननी
३६) फरक, तफावत
३७) कडक
३८) विसराळू मनुष्य
४०) बळकट, कणखर
४२) संताप
४३) मोकळीक, अनुमती
४५) मागणारा
४६) बेकरी मधील गोड बिस्किट प्रकार
४८) वक्र
४९) आकाश
५१) श्रीविष्णूचा सहावा अवतार
५३) धान्य कोठार
५५) पाणी
५९) हत्ती
६१) उथळ आकार
६४) साथ, मैत्री
६५) हल, शेतीतील एक अवजार
६७) माग, शोध
६९) प्रत्येक
७०) औषध
७१) बाण
७३) श्रीरामाचा एक पुत्र

(उत्तर उद्याच्या अंकात)

### मागील शब्दकोड्याचे उत्तर



महासागर



# पाणीपुरवठा योजनेची कामे तत्काळ पूर्ण करावी - गुलाबराव पाटील

**मुंबई, दि. २४ प्रतिनिधी**

हदगाव व हिमायतनगर तालुक्यातील नागरिकांना वॉटर ग्रीड १३२ या योजनेचा लाभ लवकर होण्यासाठी कामांमध्ये गती आणावी. तसेच पाणी पुरवठ्याची कामे तातडीने व गुणवत्तेने पूर्ण करावी, असे निर्देश पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री मंत्री गुलाबराव पाटील यांनी दिले.



पाणीपुरवठा मंत्री श्री. गुलाबराव पाटील यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयातील दालनात हदगाव व हिमायतनगर तालुक्यातील 'वॉटर ग्रीड १३२ पाणीपुरवठा योजनेचा' सविस्तर आढावा घेण्यात आला. या बैठकीस हदगाव-हिमायतनगरचे आमदार बाबुराव कोळेकर, जलजीवन मिशनचे व्यवस्थापकीय संचालक इ.रविंद्रन, सह सचिव बी.जी.पवार, नांदेड जिल्ह्याचे संबंधित अधिकारी तसेच मंत्रालयातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

पाणीपुरवठा मंत्री श्री. पाटील म्हणाले, ही योजना ग्रामीण भागातील पिण्याच्या पाण्याच्या गरजा पूर्ण करण्यासाठी अत्यंत महत्त्वाची आहे. त्यामुळे यामधील अडथळे दूर करून, वेळेवर आणि पारदर्शक पद्धतीने कामे पार पाडावीत.

योजनेच्या निधी वितरण, पाइपलाइन काम, जलसाठा केंद्रांचे बांधकाम, तसेच पाणी परीक्षणाच्या बाबतीत प्रशासनाने सकारात्मक पावले उचलावीत, हदगाव व हिमायतनगर तालुक्यातील नागरिकांच्या दीर्घकाळ प्रलंबित असलेल्या पाणीपुरवठा समस्येवर लवकरच तोडगा काढण्यासाठी प्रयत्न केले जातील, असे श्री. पाटील यांनी यावेळी सांगितले. या बैठकीत सद्यस्थितीतील कामांची माहिती सादर करण्यात आली. विविध अडचणींचा आणि प्रस्तावित उपाययोजनांचा आढावाही घेण्यात आला.

# मराठी सक्तीची, हिंदी पर्यायी – तिसऱ्या भाषेवरून सुरू असलेली चर्चा अतार्किक – आशिष शेलार

**मुंबई, दि. २४ प्रतिनिधी**

"महाराष्ट्रात सक्ती फक्त मराठी भाषेचीच आहे, हिंदीची नाही. उलट, आमच्या सरकारने पाचवी ते आठवीपर्यंत असलेली हिंदीची सक्ती रद्द करून ती पर्यायी भाषा म्हणून उपलब्ध करून दिली आहे. त्यामुळे सध्या सुरू असलेली चर्चा ही अवाजवी, अतार्किक आणि अवास्तव आहे," असे ठाम मत राज्याचे सांस्कृतिक कार्य व माहिती-तंत्रज्ञान मंत्री ॲड. आशिष शेलार यांनी मांडले.

मुंबईत आयोजित पत्रकार परिषदेत बोलताना शेलार म्हणाले, "भाजपा ही मराठीप्रेमी असून विद्यार्थ्यांच्या हितासाठी कटिबद्ध आहे. हिंदीसह इतर १५ पर्यायी भाषांचे विकल्प उपलब्ध करून देण्यात आले आहेत. यामध्ये कोणत्याही प्रकारची सक्ती नाही. फक्त तिसऱ्या भाषेचा पर्याय ठेवण्यात आला आहे."

राज्यभरात 'हिंदी सक्ती'चा आरोप करत काही ठिकाणी आंदोलन होत आहे, त्याबाबत विचारलेल्या प्रश्नांना उत्तर देताना शेलार म्हणाले, "हे चर्चासत्र लोकशाहीत अभिप्रेत असले तरी दिशाभूल करणारे आहे. काहीजण याचा राजकीय हेतूने विपर्यास करत आहेत. मी आज कोणतीही राजकीय टीका करत नाही. हा विषय फक्त विद्यार्थ्यांच्या हिताचा आहे. सध्या सुरू असलेली चर्चा भावनिक भंपकपणातून येते आहे."

"तिसऱ्या भाषेसंदर्भातील निर्णय हे काही एका दिवसात झालेले नाहीत. यासाठी एक अभ्यासगट नेमण्यात आला होता. शिक्षण तज्ञ, भाषा विशारद आणि तज्ज्ञांच्या ४५० सदस्यांनी वर्षभर चर्चा करून हा मसुदा तयार केला होता. त्यावर आलेल्या ३८०० हरकती-सूचनांचा सखोल अभ्यास करूनच हिंदी हा तिसऱ्या भाषेचा पर्याय ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला," अशी माहिती शेलार यांनी दिली.

"नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात त्रिभाषा सूत्राचे महत्त्व अधोरेखित केले गेले आहे. इतर राज्यांमध्ये जेव्हा तीन भाषा शिकवल्या जातात, तेव्हा महाराष्ट्र बोर्डाच्या विद्यार्थ्यांना केवळ दोन भाषांमध्ये मर्यादित ठेवणे ही शैक्षणिक असमानता ठरेल. अशाने ते स्पर्धात्मक परीक्षांतही मागे पडतील. म्हणूनच आमचा निर्णय शिक्षणसमृद्ध भारत घडविण्याच्या दिशेने आहे," असे शेलार यांनी ठामपणे सांगितले.

शेलार म्हणाले, "विद्यार्थ्यांच्या भविष्यासाठीचा निर्णय आहे, त्याला राजकीय रंग देणे अयोग्य आहे. आम्ही कोणत्याही सकारात्मक चर्चेसाठी तयार आहोत. मात्र माध्यमांनी, संपादकांनी, विचारवंतांनी, पालकांनी व विद्यार्थ्यांनीही विषय समजून घेतला पाहिजे. भावनिक आंदोलन किंवा चुकीच्या माहितीवर आधारित आरोप हे शिक्षणाच्या क्षेत्राला मारक ठरतात."

या पत्रकार परिषदेला आमदार विक्रांत पाटील, माजी आमदार अतुल शाह, भाजपा प्रवक्ते केशव उपाध्ये आणि माध्यम प्रमुख नवनाथ बन आदी उपस्थित होते.

# समाधानी समाजाची निर्मिती संवादातून - लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला

**मुंबई, दि. २४ प्रतिनिधी**

भगवान महावीरांनी सांगितलेले 'संवादातून समाधानाकडे' हे तत्व आजच्या काळात सर्वार्थाने उपयुक्त आणि आवश्यक आहे. कारण सशक्त संवादातून समाधानी समाजाची निर्मिती होत असते असे प्रतिपादन लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांनी केले.




महाविरायतन फाउंडेशनच्या वतीने यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित 'संवाद से समाधान- एक परिचर्चा' या कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे, कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा, खासदार मिलिंद देवरा, महाविरायतन फाऊंडेशनचे देवेंद्र ब्रम्हचारी यांच्या सह संबंधित मान्यवर उपस्थित होते.

लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला म्हणाले की, कोणत्याही प्रश्नाचे, समस्येचे निराकरण, पर्याय हा संवादातून, चर्चेतून निघत असतो. जगात लोकशाही संकल्पनेसाठी भारत आदर्श मानला जात असून संवादातून समाधानाकडे या तत्वाचा समावेश लोकशाही संकल्पनेत आहे. आपल्या देशातील सांस्कृतिक, भाषिक, भौगोलिक विविधता या सर्वांना एकत्रित ठेवत यशस्वी वाटचाल करण्यात भारताच्या लोकशाही संकल्पनेचा निश्चितचं खूप मोठा वाटा आहे. भारतीय संस्कृतीत लोकशाहीचे तत्व प्राचीन काळापासून अंर्तभूत आहे. देशातील विविध संस्कृती, परंपरा, विविधता यांना एकमेकांशी जोडण्याचे काम लोकशाहीमुळे शक्य झाले आहे. भारताने लोकशाही संकल्पनेच्या माध्यमातून मागील ७५ वर्षाच्या वाटचालीतून एक आदर्श निर्माण केला आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी म्हणतात त्याप्रमाणे आपल्या देशाचे मूलभूत वैशिष्ट आणि संस्कृती ही लोकशाही आहे. सशक्त लोकशाही समाधानी संवादी समाजाच्या निर्मितीला पूरक वातावरण तयार करण्यात महत्वाची भूमिका निभावत असते. जगाचाही लोकशाही संकल्पना स्विकारलेल्या देशांवर जास्त विश्वास आहे. लोकशाहीत संवाद महत्वाचा असतो. त्यामुळे ग्रामपातळीवरील पंचायत पासून ते देशाच्या संसदेपर्यंत कोणत्याही प्रश्नावर, विषयावर चर्चेतून संवादातून मार्ग काढला जातो. भगवान महावीर यांचे तत्वज्ञान आजही उपयुक्त असून मनुष्याला मनुष्यत्वाकडे नेणारे विचार, सिद्धांत त्यांनी सांगितलेले जे आजच्या काळातही प्रासंगिक आणि उपयोगी ठरणारे आहेत. महावीरांनी सांगितलेले 'जगा आणि जगू द्या', अहिंसा, अपरिग्रह संयमव्रत, संवादातून समाधानाकडे यासह त्यांचे विविध सिद्धांत केवळ जैन समाजालाच नाही तर संपूर्ण मानवसमाजासाठी दिशादर्शक आहेत. संवादातून समाधानाकडे या तत्वाची आज जगाला गरज आहे. कारण जगातील विविध शंका, समस्या, चिंता, आव्हाने या सगळ्यांवर संवादातून समाधानकारक उपाय तोडगा निघू शकतो, असे श्री.बिर्ला यावेळी म्हणाले.

# नाट्य-संगीत सादरीकरणाचे आयोजन

**मुंबई, दि.२४ प्रतिनिधी**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०० व्या जयंती वर्षानिमित्त भव्य नाट्य-संगीत सादरीकरणाचे आयोजन २६ जून रोजी सायंकाळी ७ वाजता, रवींद्र नाट्य मंदिर, प्रभादेवी येथे करण्यात आले आहे. हा कार्यक्रम सरफोजीराजे भोसले भरतनाट्य ट्रेनिंग आणि रिसर्च सेंटर सादर करीत आहे.

कार्यक्रमाची संकल्पना, दिग्दर्शन आणि क्युरेशनची जबाबदारी डॉ. संध्या पुरेचा यांच्यावर सोपवण्यात आली आहे. या कार्यक्रमाला महाराष्ट्र विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रमात अहिल्यादेवींच्या जीवनातील विविध टप्प्यांचे नाट्य-नृत्य-संगीत रूपांतर सादर करण्यात येणार असून, त्यात संहितालेखन विवेक आपटे व सुभाष सैगल, संगीत अजित परब, नृत्यदिग्दर्शन सुभाष नकाशे आणि निवेदन हरीश भिमानी यांचे आहे.

## महत्त्वाच्या बातम्या

### मुलुंड येथील मुलींच्या शासकीय वसतिगृह प्रवेश प्रक्रियेस सुरुवात

**मुंबई, दि. २४ प्रतिनिधी**

मुलुंड येथील मुक्ता साळवे मागासवर्गीय मुलींचे शासकीय वसतिगृह येथे सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षाकरिता रिक्त जागेवर प्रवेश प्रक्रियेस सुरुवात झाली आहे. इच्छुक विद्यार्थिनींनी कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत प्रवेशासाठी संपर्क साधावा,असे आवाहन वसतिगृहाचे गृहपाल यांनी केले आहे. प्रवेशित विद्यार्थिनींना वसतिगृहात राहण्याची व्यवस्था, भोजन, रुपये ९००-मासिक निर्वाह भत्ता, स्टेशनरी रक्कम, ग्रंथालय सुविधा, दैनंदिनी वर्तमानपत्र इत्यादी मोफत सोयी-सुविधा दिल्या जातात. प्रवेशासाठी विहित पात्रता आवश्यक आहे. या शैक्षणिक वर्षाच्या प्रवेशाची प्रक्रिया ऑनलाईन पध्दतीने होणार असून, वसतिगृह प्रवेशाचा अर्ज ऑनलाईन पध्दतीने स्विकारण्यात येणार आहे. तरी विद्यार्थ्यांनी https://hmas.mahait.org या संकेतस्थळावर आपला अर्ज करावा. या वसतिगृहात ११ वी व आय. टी. आय. अभ्यासक्रमाच्या विदयार्थिनींना प्रवेश दिला जाईल. प्रवेशासाठी ५५ टक्केपेक्षा जास्त गुण असावेत. विद्यार्थीनी महाराष्ट्र राज्याची रहिवासी असावी. गृहपाल, मुक्ता साळवे मागासवर्गीय मुलींचे शासकीय वसतिगृह, डी-१० पार्श्वनाथ कॉ. हौसिंग सोसायटी, सर्वोदय नगर मुलुंड, मुंबई-४०००८० येथे हे वसतिगृह आहे.

### दारूसाठी पैसे न दिल्याने पत्नीची हत्या

**मुंबई, दि. २४ प्रतिनिधी**

गोरेगाव परिसरात पत्नीने दारूसाठी पैसे देण्यास नकार दिल्याने संतापलेल्या पतीने तिची हत्या केली. मृत महिलेचे नाव गौसिया वसीम शेख (२५) आहे. या प्रकरणात बांगूर नगर पोलिसांनी आरोपी पतीविरुद्ध एफआयआर नोंदवून त्याला अटक केली आहे. तक्रारीनुसार, गौसिया आणि तिचा पती वसीम दारू पिण्यावरून अनेकदा भांडत असत. घटनेच्या दिवशी वसीमने गौसियाकडे दारूसाठी पैसे मागितले, परंतु गौसियाने नकार दिल्याने तो रागावला आणि त्याने गौसियाचा गळा दाबून खून केला आणि घटनास्थळावरून पळून गेला. घटनेची माहिती मिळताच बांगूर नगर पोलीस ठाण्यात हत्येचा गुन्हा दाखल करण्यात आला. वरिष्ठ पोलीस निरीक्षक अनिल ठाकरे यांनी तत्काळ घटनास्थळी पोहोचून वरिष्ठ अधिकाऱ्यांना माहिती दिली आणि आरोपींचा शोध घेण्यासाठी एक विशेष पथक तयार केले. या पथकात सहाय्यक पोलीस निरीक्षक संजय सारोळकर, सहाय्यक निरीक्षक राठी, पीएसआय पियूष तरे यांच्यासह डिटेक्शन बॅच आणि सायबर सेलचे अधिकारी यांचा समावेश होता.

### तोतया पोलिसांनी लुटले ५० लाख

**मुंबई, दि. २४ प्रतिनिधी**

मुंबई पोलिसांच्या नावावर धमकावून भुलेश्वर येथे तोतया पोलिसांनी एका व्यक्तीचे अपहरण करून त्याच्याकडील ५० लाख रुपये लुटल्याप्रकरणी मुंबई पोलिसांनी पाच जणांना अटक केली. आरोपींनी त्या व्यक्तीला फेक एन्काऊंटरमध्ये जीवे मारण्याची धमकी देत नवी मुंबईत सोडून पलायन केले होते. याबाबत लोकमान्य टिळक मार्ग पोलीस ठाण्यात रविवारी दरोड्याचा गुन्हा दाखल झाल्यानंतर अवघ्या सहा तासांच्या आत पोलिसांनी पुणे, सातारा आणि ठाण्यातून आरोपींना अटक केली. अजय बाळकृष्ण लोखंडे, रेवणसिद्ध राजाराम जावडे, सागर दामोदर जाधव, विकास अंकुश देहाळे, दिलीप काशिनाथ ढेकळे अशी अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत. तक्रारदार शनिवारी सायंकाळी सातच्या सुमारास भुलेश्वर येथील पोपळवाडी तिसरी येथून जात असताना चार व्यक्तींनी त्याला अडवले. पोलीस असल्याची बतावणी करून त्याला मोटरगाडीत जबरदस्तीने बसवले. आरोपींनी चाकूचा धाक दाखवून त्याला जीवे मारण्याची धमकी देत त्याच्याकडून ५० लाख रुपयांची बॅग हिसकावली. त्यानंतर आरोपींनी त्याला नवी मुंबईत उतरवले.

### सोने तस्करीप्रकरणी सात आरोपींना अटक

**मुंबई, दि. २४ प्रतिनिधी**

ऑपरेशन अल्केमिस्ट मोहीमेतर्गत सोने तस्करी करणाऱ्या सात जणांना सीमा शुल्क विभागाने अटक करुन त्यांच्याकडून दुबईहून तस्करीमार्गे आणलेले सुमारे नऊ कोटीचे सोने जप्त केले आहे. जप्त केलेल्या सोन्याचे वजन ७.८७० किलो असून ते अंड्याच्या आकारातील कॅप्सुलमधून आणण्यात आले होते. या सर्वांविरुद्ध सीमा शुल्क कायद्यांतर्गत कारवाई करण्यात आली आहे. सोने तस्करी करणाऱ्या आरोपीविरुद्ध सीमा शुल्क विभागाने ऑपरेशन अल्केमिस्ट नावाची एक मोहीम हाती घेतली होती. या मोहीमेतर्गत विदेशातून विशेषता दुबईहून येणाऱ्या प्रत्येक संशयित प्रवाशासह त्यांच्या सामानाची तपासणी सुरु केली होती. रविवारी रात्री दुबईहून आलेल्या दोन प्रवाशांना या अधिकाऱ्यांनी चौकशीसाठी ताब्यात घेतले होते. ते दोघेही घाईघाईने विमानतळाबाहेर जाण्याचा प्रयत्न करत होते. त्यांच्या सामानाची घडल्यानंतर त्यात अठरा अंड्याच्या आकाराचे कॅप्सुल सापडले होते. त्यात सोने लपवून आणण्यात आले होते. ते सोने नंतर वितळविण्यात आले होते. त्यानंतर सोन्याचे वजन ७ किलो ८७० ग्रॅम असल्याचे उघडकीस आले. त्याची किंमत सुमारे नऊ कोटी रुपये आहे. चौकशीत सोने तस्करी करणारी ही टोळी असल्याचे उघडकीस आले. दोन्ही आरोपी ऑपरेटर असून त्यांच्या चौकशीतून त्यांच्या इतर पाच सहकाऱ्यांची नावे समोर आले होते. त्यानंतर या अधिकाऱ्यांनी वेगवेगळ्या ठिकाणाहून या पाचही आरोपींना अटक केली.

### अवयवदानातून तिघांना नवजीवन

**मुंबई, दि. २४ प्रतिनिधी**

एका ५० वर्षीय रेखा मारू यांच्या मृत्यूनंतर त्यांच्या अवयवांचे दान करून तीन रुग्णांना नवजीवन मिळाले. यंदा मुंबईत नोंदवण्यात आलेले हे २६ वे अवयवदान आहे. कंळबोली येथे राहणाऱ्या रेखा मारू यांना १० जून रोजी ब्रेन स्ट्रोक आला. त्यानंतर त्यांना तातडीने नवी मुंबईतील खारघर येथील मेडिकव्हर रुग्णालयात दाखल करण्यात आले. सिटी स्कॅन तपासणीत त्यांच्या मेंदूमध्ये रक्तस्राव झाल्याचे आढळले. डॉक्टरांनी शस्त्रक्रिया करून रक्तस्राव बंद केला आणि जमलेले रक्त काढून टाकले. मात्र त्यानंतर पुन्हा रक्तस्राव होऊ लागल्याने त्यांना ब्रेन डेड घोषित करण्यात आले. यानंतर रेखा मारू यांचे पती महेंद्र मारू आणि मुलगा तरुण मारू यांनी अवयवदानाचा निर्णय घेतला. त्यानुसार २१ जून यकृत आणि दोन किडनीचे दान करण्यात आले.

### अंधेरीत आरोग्य शिबिराचे आयोजन

**मुंबई, दि. २४ प्रतिनिधी**

इंडियन कॅन्सर सोसायटी आणि जनप्रहार फाउंडेशनच्यावतीने अंधेरी येथील गुंडावली येथील ओंकार दर्शन बिल्डिंग कॉम्प्लेक्समध्ये महिलांसाठी मोफत कर्करोग तपासणी शिबिराचे आयोजन केले होते. यामध्ये एकूण ७५ जणांची तपासणी करण्यात आली. संस्थेचे संस्थापक अध्यक्ष ॲड. रविकांत सर्वदानंद शुक्ला यांच्या नेतृत्वाखाली हे शिबिर आयोजित केले होते. यामध्ये ६० महिलांनी स्वतःची तपासणी केली. १५ पुरुषांची दंत आणि सामान्य आरोग्य तपासणी करण्यात आली.

# महानिर्मिती राज्यात उभारणार १०७१ मेगावॅट क्षमतेचे सौर ऊर्जा प्रकल्प - मुख्यमंत्री

**मुंबई, दि.२४ प्रतिनिधी**

पारंपरिक ऊर्जेवरील अवलंबित्व कमी करून कार्बन उत्सर्जन घटवून शेतक-यांना सिंचनासाठी दिवसा अखंडित वीजपुरवठा देवून शेतीची उत्पादनक्षमता वाढविण्यासाठी शासन विविध योजना राबवित आहे. राज्यात शाश्वत विकासास चालना देण्यासाठी महानिर्मिती तर्फे १,०७१ मेगावॅट क्षमतेचे सौर ऊर्जा प्रकल्प मुख्यमंत्री सौर ऊर्जा प्रकल्प २.० अंतर्गत लवकरच कार्यान्वित होणार आहेत.या प्रकल्पांमुळे राज्यातील तीन लाख शेतकऱ्यांना लाभ होणार आहे, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

महानिर्मिती ही म.रा. वि.मं. सूत्रधारी कंपनी मर्यादित या कंपनीची संपूर्ण मालकीची उपकंपनी असून, सुमारे १३,८८० मेगावॅट क्षमतेसह भारतातील सर्वात मोठ्या राज्य-नियंत्रित विद्युत उत्पादकांपैकी एक आहे. नॅशनल थर्मल पॉवर कंपनी नंतर ही देशातील दुसऱ्या क्रमांकाची राज्य मालकीची जनरेशन कंपनी आहे. औष्णिक, वायू, जल विद्युत आणि सौर असे ऊर्जा उत्पादन क्षेत्रात वैविध्य असलेली महानिर्मिती ही कंपनी नवीकरणीय ऊर्जेचे प्रकल्प सुरू करत आहे, ज्यामुळे वीज ग्राहकांना कमी दरात वीजपुरवठा करत कार्बन उत्सर्जनात घट होण्यास मदत होणार आहे.

द रॉकफेलर फाउंडेशन, इकीया फांउडेशन आणि बेझॉज अर्थ फंड यांच्या सहकार्याने स्थापन झालेली जीईएपीपी इंडिया (ग्लोबल एनर्जी अलायन्स फॉर पीपल अँड प्लॅनेट) ही संस्था विकसनशील देशांमध्ये न्याय्य, समतोल व वेगवान हरित ऊर्जेसाठी मदत करते. जीईएपीपी इंडिया ही जीईएपीपी एलएलसीची भारतीय शाखा असून, भारतात विशेषतः वितरणक्षम ऊर्जेसाठी उपयुक्त उपक्रमांची अंमलबजावणी करत आहे.

पारंपरिक ऊर्जेवरील अवलंबित्व कमी करून कार्बन उत्सर्जन घटवून शेतक-यांना सिंचनासाठी दिवसा अखंडित वीजपुरवठा देवून शेतीची उत्पादनक्षमता वाढविणे हे राज्य शासनाचे ध्येय आहे.कृषी ग्राहकांच्या सेवेखर्चात कपात करून शाश्वत ऊर्जेच्या माध्यमातून शेतकऱ्यांचा आर्थिक विकास करण्यासाठी महाराष्ट्र शासनाची अत्यंत महत्वकांक्षी असलेली मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० आहे ही योजना वितरित पद्धतीने नवीकरणीय ऊर्जा वापरून कृषी वापरासाठी सौर प्रकल्प जोडण्यात येतात. सन २०२५ पर्यंत सुमारे ३०% फीडरचे सोलरायझेशनचे उद्दिष्ट 'मिशन २०२५' म्हणून निश्चित केले आहे, ज्यामध्ये शेतक-यांना दिवसा वीज देण्यासाठी ०.५ मेगावॅट ते २५ मेगावॅट क्षमतेचा कृषी भार असलेल्या वितरण उपकेंद्रापासून ५ - १० किमी परिघात विकेंद्रित सौर प्रकल्प उभारले जातात.

जीईपीपी इंडिया हा प्रकल्प प्रभावीपणे राबवण्यासाठी प्रकल्प मॉनिटरिंग युनिट (PMU) सुविधा आणि एक डिजिटल प्लॅटफॉर्म उपलब्ध करत आहे, माहितीचे संकलन, या प्रकल्पाची सद्यस्थिती आणि प्रकल्पांचे सुलभ व्यवस्थापन शक्य होईल. जीईपीपीच्या तंत्रज्ञान आणि नवकल्पनांचा उपयोग करून मुख्यमंत्री सौर ऊर्जा प्रकल्प २.० ची प्रभावी अंमलबजावणी करणे. महाराष्ट्रात शाश्वत विकासास चालना देणे हा या प्रकल्पाचा मुख्य उद्देश आहे.

# मतदार याद्यांसाठी २१०० शिक्षकांची नेमणूक

**मुंबई, दि.२४ प्रतिनिधी**

निवडणूक आयोगाच्या निर्देशांनुसार, मतदार याद्यांच्या विशेष संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रमाच्या पूर्वतयारीसाठी मुंबई महानगरपालिकेतील २१०० शिक्षकांची नेमणूक करण्यात आली आहे. शिक्षकांना मतदान केंद्रस्तरीय अधिकारी व मतदान केंद्रस्तरीय अधिकारी पर्यवेक्षक म्हणून जबाबदारी देण्यात आली आहे. शिक्षकांना पूर्णवेळ कार्यालयात उपस्थित राहूनच निवडणुकीशी संबंधित कामे ऑनलाइन पद्धतीने करावी लागणार आहेत. यासाठी स्थानिक मतदार नोंदणी अधिकारी कार्यालयात रुजू होण्याची आवश्यकता नसल्याचे पालिका प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

निवडणूक आयोगाकडून लवकरच मतदार याद्यांचा विशेष संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रम जाहीर होणार आहे. त्यासाठी मतदान केंद्रस्तरीय अधिकारी व मतदान केंद्रस्तरीय अधिकारी पर्यवेक्षक यांच्या नेमणुका करण्याचे निर्देश महाराष्ट्राचे मुख्य निवडणूक अधिकारी यांनी दिले होते. या अनुषंगाने, जिल्हा निवडणूक अधिकारी या नात्याने मुंबई महानगरपालिका आयुक्त यांनी, मुंबई शहर जिल्हा तसेच मुंबई उपनगर जिल्ह्यासाठी मतदान केंद्रस्तरीय अधिकारी आणि मतदान केंद्रस्तरीय अधिकारी पर्यवेक्षक यांच्या नेमणुका करण्याचे निर्देश दिले होते. या पार्श्वभूमीवर मतदार याद्यांच्या विशेष संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रमाच्या पूर्वतयारीसाठी पालिकेच्या शिक्षण विभागाअंतर्गत कार्यरत २१०० शिक्षकांच्या नेमणुका करण्यात आल्या आहेत.

# रॅपिड टेस्टच्या आधारावरच डेंग्यू, लेप्टोचे निदान ?

**मुंबई, दि.२४ प्रतिनिधी**

मुंबई महापालिकेच्या उपनगरी रुग्णालयांत डेंग्यू व लेप्टोस्पायरोसिससारख्या गंभीर आजारांच्या निदानासाठी केवळ रॅपिड टेस्टचा आधार घेतला जात असल्याचे समोर आले आहे. 'एलायझा' वा 'पीसीआर' या पुष्टीकरण चाचण्या न करताच उपचार सुरू केल्याचे माहिती अधिकारातून उघड झाले आहे. विशेष म्हणजे, महापालिकेच्या आकडेवारीत फक्त एलायझा पॉझिटिव्ह रुग्णांचीच नोंद घेतली जाते. त्यामुळे संक्रमणाचा नेमका आकडा समजणे कठीण झाले असून तज्ज्ञांनी या पद्धतीवर गंभीर प्रश्न उपस्थित केले आहेत.

ॲड. तुषार भोसले यांनी माहितीच्या अधिकारात मागवलेल्या माहितीनुसार, गोवंडीतल शताब्दी, कुर्ला भाभा, सांताक्रुझमधील व्ही. एन. देसाई आणि वद्रेतील भाभा या महापालिकेच्या रुग्णालयांत २०२२ ते फेब्रुवारी २०२५ या कालावधीत रॅपिड टेस्टमध्ये शेकडो रुग्ण पॉझिटिव्ह आढळले. मात्र, यापैकी बहुतांश रुग्णांची एलायझा चाचणीच झालेली नाही. उदाहरणार्थ, भाभा रुग्णालयात डेंग्यूच्या १,६८९ रुग्णांपैकी एकाचाही एलायझा चाचणी अहवाल उपलब्ध नाही. लेप्टोच्या ९४ रुग्णांबाबतही हीच स्थिती आहे. गोवंडी शताब्दी रुग्णालयात डेंग्यूचे ९१३ आणि लेप्टोचे ४५ रुग्ण पॉझिटिव्ह सापडले; पण कोणत्याही नमुन्याची पुष्टीकरण चाचणी झालेली नाही. महापालिकेची आकडेवारी केवळ एलायझा पॉझिटिव्ह रुग्णांपुरती मर्यादित असल्याने प्रत्यक्षात रॅपिड टेस्ट पॉझिटिव्ह असलेल्या अनेक रुग्णांची नोंद होत नाही. यामुळे डेंग्यू व लेप्टोच्या रुग्णांची खरी संख्या लपून राहत असून रुग्णनिदान आणि प्रतिबंध उपायांवर त्याचा गंभीर परिणाम होण्याची शक्यता आहे.

# सामाजिक क्षेत्रातील योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी राज्य शासन व 'सीईजीआयएस' यांच्यात सामंजस्य करार

**मुंबई, दि. २४ प्रतिनिधी**

सामाजिक क्षेत्रातील योजनांच्या अंमलबजावणीसाठी वॉररुम तयार करण्यात आली आहे. या वॉररुमच्या कार्यक्षमतेत वाढ होऊन सामाजिक क्षेत्रातील योजना, उपक्रम व उपाययोजना प्रभावीपणे राबविण्यासाठी तांत्रिक, विश्लेषणात्मक आणि धोरणात्मक सहाय्य पुरविण्यासंदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत महाराष्ट्र शासन, मुख्यमंत्री कार्यालय आणि सेंटर फॉर इफेक्टिव्ह गव्हर्नन्स ऑफ इंडियन स्टेट्स (सीईजीआयएस) यांच्यात सामंजस्य करार झाला.



मुंबईतील वर्षा या शासकीय निवासस्थानी झालेल्या कार्यक्रमात मुख्यमंत्री यांचे सचिव डॉ.श्रीकर परदेशी व सीईजीआयएसचे सह-संस्थापक कार्तिक मुरलीधरन यांनी या सामंजस्य करारावर स्वाक्षरी केल्या. यावेळी मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव विकास खारगे, प्रधान सचिव अश्विनी भिडे, सचिव डॉ.श्रीकर परदेशी, सेंटर फॉर इफेक्टिव्ह गव्हर्नन्स ऑफ इंडियन स्टेट्स (सीईजीआयएस) चे मुख्य कार्यकारी अधिकारी विजय पिंगळे, सल्लागार विनी महाजन, स्ट्रॅटेजी सल्लागार मुरुगन वासुदेवन, वरिष्ठ कार्यक्रम सल्लागार ओंकार देशमुख, वरिष्ठ कार्यक्रम सल्लागार तन्वी ब्रम्हे आदी उपस्थित होते.

यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, सामाजिक क्षेत्रातील योजना, उपक्रमाची अंमलबजावणी प्रभावीपणे करण्यासाठी मागोवा प्रणाली (ट्रॅकिंग सिस्टीम) उपयुक्त ठरणार आहे. ही प्रणाली सीएम डॅशबोर्डशी जोडण्यात यावी. या करारामुळे धोरणात्मक क्षमता वाढेल. तसेच क्षेत्रीय समन्वय सुधारून नागरिकांना अधिक प्रभावी व उत्तरदायित्व असलेली सेवा पुरविण्यासाठी मदत होणार आहे.

या कराराअंतर्गत सीईजीआयएस ही संस्था पुढील पाच वर्षांमध्ये महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक क्षेत्राशी संबंधित विविध विभागांसोबत काम करणार असून धोरणे आणि अंमलबजावणी या दोन्ही पातळ्यांवर तांत्रिक, विश्लेषणात्मक आणि धोरणात्मक सहाय्य पुरविणार आहे. मुख्यमंत्री कार्यालयासाठी निर्णय सहाय्य प्रणाली (डिसीजन सपोर्ट सिस्टीम) विकसित केली जाणार आहे. ही यंत्रणा मुख्यमंत्री कार्यालयाच्या वॉररुमसाठी डेटावर आधारित निर्णय प्रक्रिया सक्षम करण्यासाठी मदत करणार आहे. या प्रणालीद्वारे राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय निकषांच्या आधारे परिणामकारक लक्ष्य ठरवणे, माहितीतील विसंगती कमी करणे आणि नागरिकांच्या अभिप्रायाची गुणवत्ता सुधारण्यासाठी कार्यक्षम देखरेखीसाठी या प्रणालींचा उपयोग केला जाणार आहे.

# संभाजीनगर मनपा शाळा आता दहावीपर्यंत

**मुंबई, दि.२४ प्रतिनिधी**

कांदिवली, हनुमान नगर येथील आकुर्ली रोडवरील संभाजीनगर मराठी मनपा शाळेत या वर्षापासून १० वीपर्यंतचे वर्ग सुरू करण्यात आले आहेत. यामुळे ८ वीच्या विद्यार्थ्यांना त्याच शाळेत इयत्ता ९ वीमध्ये प्रवेश मिळाला. तसेच विभागातील इतर विद्यार्थ्यांनाही या ठिकाणी आता इयत्ता १० वीपर्यंत मोफत शिक्षण आणि विनामूल्य शालेय साहित्य मिळणार असल्याने विद्यार्थ्यांसह पालकांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

कांदिवली पूर्वेला असलेल्या हनुमान नगर, संभाजी नगर आकुर्ली रोड या मुख्य मार्गावर पालिकेची संभाजीनगर मराठी मनपा शाळा आहे. पूर्वी ही शाळा फक्त ८ वीपर्यंतच होती. त्यामुळे पुढील शिक्षणासाठी विद्यार्थ्यांना दुसऱ्या शाळांमध्ये जावे लागत होते. त्यातच शाळा बैठ्या स्वरूपात असल्याने पावसाळयात पाणी साचणे, गळकी छप्पर यांसारख्या अनेक अडचणींना विद्यार्थी आणि शिक्षकांना तोंड द्यावे लागत होते. मात्र, माजी नगरसेविका सुरेखा मनोज पाटील आणि आमदार अतुल भातखळकर यांच्या प्रयत्नांमुळे या शाळेची पुनर्बांधणी करून ती आता भव्य सहा मजली इमारतीत सुरू करण्यात आली आहे. या नव्या इमारतीमध्ये आधुनिक शिक्षणासाठी आवश्यक सर्व सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या.



# इराण-इस्रायल संघर्षविराम भंगल्याच्या बातमीमुळे शेअर बाजारात मोठी उलथापालथ

मुंबई, दि. २४ प्रतिनिधी

आज भारतीय शेअर बाजारात मोठी उलथापालथ पाहायला मिळाली. सुरुवातीला जोरदार तेजी दिसली असली तरी दुपारनंतर अचानक मोठ्या प्रमाणात विक्री झाली. मध्य पूर्वेत पुन्हा एकदा तणाव निर्माण झाल्याच्या बातम्यांमुळे गुंतवणूकदारांचे सेंटिमेंट ढासळले आणि बाजाराने मिळवलेली सगळी वाढ गमावली. व्यापारादरम्यान बीएसई सेंसेक्स आपल्या दिवसाच्या उच्चांकाशी तुलना करता सुमारे १११८.०४ अंकांनी घसरून ८१,९००.१२ या नीचांकी पातळीवर पोहोचला. दुसरीकडे निफ्टी जवळपास ३०० अंकांनी घसरून २५,००० च्या पातळीवर गेला.

याआधी सकाळच्या व्यवहारात दोन्ही निर्देशांकांमध्ये १ टक्क्यांहून अधिक वाढ झाली होती. सेंसेक्सने सकाळीच १,१२१ अंकांची उडी घेतली होती. जागतिक बाजारातून मिळालेली मजबुती आणि कच्च्या तेलाच्या किंमतीत घट यामुळे बाजाराला बळ मिळाले. मात्र इस्रायल आणि इराण यांच्यातील संघर्षविराम पुन्हा भंगल्याच्या बातम्यांमुळे ही तेजी संपुष्टात आली.

निफ्टीमध्ये ऑयल अँड नॅचरल गॅस कॉर्पोरेशन (ओएनजीसी), पॉवर ग्रिड कॉर्पोरेशन ऑफ इंडिया, ट्रेंट, इंडसइंड बँक आणि एनटीपीसी या कंपन्यांच्या शेअरमध्ये ३ टक्क्यांपर्यंत घसरण झाली. मंगळवारी सेंसेक्स ११०० पेक्षा अधिक अंकांनी वाढून ८३,००० च्या वर गेला होता, पण नंतर ही वाढ गमावून तो केवळ १५८ अंकांच्या वाढीसह बंद झाला. दोन्ही बेंचमार्क निर्देशांक शेवटी

**सेन्सेक्स 82,055**

**निफ्टी 25,044**

वाढीने बंद झाले.

मंगळवारी सेंसेक्सने ८२,५३४ वर व्यवहार सुरू केला आणि दिवसअखेरीस ०.१९ टक्क्यांच्या वाढीसह ८२,०५५ वर बंद झाला. दुसरीकडे निफ्टी ५० मंगळवारी २५,१७९ वर खुला झाला आणि ०.२९ टक्क्यांच्या वाढीसह २५,०४४ वर बंद झाला. बीएसई मिडकॅप आणि स्मॉलकॅप निर्देशांक देखील वाढीने बंद झाले. मिडकॅप निर्देशांक ०.५६ टक्क्यांनी तर स्मॉलकॅप निर्देशांक ०.७१ टक्क्यांनी वाढला.

निफ्टी ५० मध्ये सर्वाधिक नफा मिळवणाऱ्या शेअर्समध्ये जिओ फायनान्शियल सर्व्हिसेस सर्वात वर होता, ज्यात २.६१ टक्क्यांची वाढ झाली. त्यानंतर अडानी पोर्ट्समध्ये २.५७ टक्के, श्रीराम फायनान्समध्ये २.१८ टक्के, ग्रासिम इंडस्ट्रीजमध्ये २.११ टक्के आणि कोटक बँकेत १.८१ टक्के वाढ झाली.

# विठुरायाच्या दर्शनाचे बोगस पास , तपास सुरु

सोलापूर, दि. २४ प्रतिनिधी

आषाढी एकादशीनिमित्त लाखो वारकरी पंढरपूरच्या दिशेने विठ्ठलनामाचा गजर करत वाटचाल करत असताना, काही फसवणूक करणाऱ्या टोळ्यांनी या भक्तिभावाला काळिमा फासणारा प्रकार घडवला आहे. थेट ज्ञानेश्वर महाराजांच्या पालखी सोहळ्यात सहभागी असलेल्या काही भाविकांना मंदिर प्रवेशासाठी बनावट 'टोकन दर्शन' पास विकल्याची घटना समोर आली आहे.

ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्यात चालत असलेल्या काही भाविकांना तुम्हाला देवाच्या टोकन दर्शनाचे पास १०० रुपयात देतो, असे सांगून सासवड परिसरात जुन्या पासावर हे नवीन डुप्लिकेट पास बनवून दिल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. मात्र जेव्हा हे भाविक आज विठ्ठल मंदिरात दर्शनासाठी पोहोचले, तेव्हा प्रवेशद्वारावर स्कॅनिंग करताना ते पास बोगस असल्याचे स्पष्ट झाले. त्यानंतर मंदिर प्रशासनाने तात्काळ कारवाई करत या सात भाविकांना बाजूला घेऊन चौकशी सुरू केली. मात्र, त्यांना हे पास कोणी तयार करून दिले? याबाबत माहिती सांगता आली नाही आले नाही. त्यानंतर प्रशासनाने या भाविकांना पोलिसांकडे पाठवले असून बोगस पास रॅकेट उघड करण्याचे आव्हान आता पोलिसांसमोर असणार आहे.

सध्या आषाढी वारीदरम्यान विठ्ठल दर्शनासाठी भाविकांना १० ते १२ तासांपर्यंत रांगेत थांबावं लागतं, तर अधिकृत टोकन प्रणालीमुळे अर्ध्या तासात थेट दर्शनाचा लाभ मिळतो. याचाच गैरफायदा घेत काही भामटे बनावट पास बनवून फसवणूक करत आहेत. फसवणूक झालेल्या भाविकांनी सांगितले की, सासवडच्या दरम्यान त्यांना हे पास मिळाले. त्यामुळे हा प्रकार वारीच्या मार्गातच कुठे तरी घडत असल्याची शक्यता अधिक बळकट झाली आहे. मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी या प्रकरणी कडक भूमिका घेतली असून, यापुढे कुणीही असे पास विकताना आढळल्यास गुन्हे दाखल करून कठोर कारवाई करण्यात येईल, असे स्पष्ट केले आहे. तसेच त्यांनी सर्व भाविकांना अधिकृत संकेतस्थळावरूनच मोफत टोकन बुक करण्याचे आणि अशा बनावट पासांना बळी न पडण्याचे आवाहन केले आहे.

## पंढरपूरमध्ये मांस विक्रीवर बंदी

आषाढी वारीचा पावन सोहळा जवळ येत असून, लाखो वारकरी पालख्या घेऊन पंढरीच्या दिशेने आपल्या लाडक्या विठुरायाच्या दर्शनासाठी मार्गस्थ झाले आहेत. या वारीच्या मार्गावर अनेक ठिकाणी उघडपणे मास-मटन विक्री करणारी दुकाने दिसून येतात. अगदी पंढरपूरमध्ये प्रवेश करतानाही विविध मार्गांवर अशी दुकाने आढळतात. गेल्या अनेक वर्षांपासून पालखी सोहळ्याचे प्रमुख आणि वारकरी संप्रदायातील संत मंडळी यात्रा कालावधीत पंढरपूर शहर तसेच पालखी मार्गावरील गावांमध्ये मास-मटन विक्री बंद ठेवावी, अशी मागणी करत होते. या वर्षी अखेर त्यांच्या मागणीला यश आले असून, आषाढी वारीच्या इतिहासात प्रथमच, यात्रेच्या कालावधीत सलग 10 दिवसांसाठी पंढरपूरमध्ये मास-मटन विक्रीवर बंदी घालण्यात आल्याची घोषणा पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी केली आहे. ही बंदी लागू केल्यामुळे वारकरी संप्रदायात आनंदाची भावना व्यक्त केली जात आहे.

# 26 जून रोजी फ्रेंड्स ऑफ डेमोक्रसीची मुंबई मराठी पत्रकार संघात सभा

मुंबई, दि. २४ प्रतिनिधी

गुरुवार, दि. २६, जून २०२५ रोजी, सायंकाळी ५ वा., दुसरा मजला सभागृह, मुंबई मराठी पत्रकार संघ, महापालिका मार्ग, आझाद मैदान, मुंबई येथे फ्रेंड्स ऑफ डेमोक्रसी यांचे वतीने एका सभेचे आयोजन केले आहे. त्यासंदर्भात त्यांनी एक परिपत्रक जाहीर केले आहे. ज्या राजकारण्यांना देशाच्या संविधानाशी आणि देशवासीयांच्या कल्याणाशी काहीच देणे घेणे नसते, त्या राजकारण्यांना छद्म-राष्ट्रवादाचा आधार घेऊन राष्ट्रविघातक अजेंडा पुढे रेटावा लागतो. छद्म-राष्ट्रवादाने फॅसिस्ट हुकूमशाहीची सहाय्यक भूमिका अनेकदा बजावली आहे. आज देशात उन्माद माजविला जातोय, अल्पसंख्यांक व दलित समाजाला ज्या प्रकारे लक्ष्य केलं जातंय, विरोधकांना नामोहरण करण्यासाठी जसा तुरुंगाचा रस्ता दाखवला जातोय. ते पाहता देशात फॅसिझमने आपली मुळे घट्ट रोऊन लोकशाहीच्या नावे हुकूमशाही कारभार चालवला आहे, असे म्हणावे लागेल. या संविधान-विरोधी, फॅसिस्ट हुकूमशाहीवादी शक्तींना सर्व पातळ्यांवर संघटित विरोध करण्याची गरज आहे. त्यासाठी साऱ्या लोकशाहीवादी व संविधानप्रेमी व्यक्तींनी एकत्रित येण्याची गरज आहे.

**फॅसिस्ट-हुकुमशाहीविरोधी सभा**
मा. संजय राऊत, सदस्य राज्यसभा,
मा. हर्षवर्धन सपकाळ प्रदेशाध्यक्ष राष्ट्रीय काँग्रेस,
मा. अनिल देशमुख, माजी गृहमंत्री, महाराष्ट्र राज्य.
मा. श्वेता संजीव भट, गुजरात अध्यक्ष
मा. कुमार केतकर, माजी राज्यसभा सदस्य
**गुरुवार, २६ जून २०२५**
सभागृह दुसरा मजला, मुंबई मराठी पत्रकार संघ,
**वेळ सायं. ५ वाजता**

आम्ही, लोकशाहीवादी व संविधानप्रेमींनी आपल्या क्षमतेनुसार, फॅसिस्ट हुकूमशाहीला विरोध करण्याचे ठामपणे ठरविले आहे. यासाठी फॅसिस्ट हुकुमशाहीविरोधी सभेचे आयोजन करण्यात आले आहे. आपली प्रतिबद्धता व्यक्त करण्यासाठी या कार्यक्रमास लोकशाही आणि संविधानप्रेमी नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे विनम्र आवाहन छाया थोरात, विजय दिवाण, आशुतोष शिर्के, डॉ. विवेक कोरडे यांनी फ्रेंड्स ऑफ डेमोक्रसी (FOD) यांच्यावतीने केले आहे.

# चंद्रभागेची पाणीपातळी वाढली, आषाढी एकादशीला पूर नियंत्रणासाठी प्रशासनाची तारेवरची कसरत

सोलापूर, दि. २४ प्रतिनिधी

पुणे आणि सातारा जिल्ह्यात सुरू असलेल्या पावसामुळे उजनी धरणातून 41 हजार 600 तर वीर धरणातून 15 हजार क्युसेक विसर्गाने पाणी सध्या भीमा नदीकडे येत आहे . नीरा आणि भीमा खोऱ्यामध्ये मोठ्या प्रमाणात पाऊस पडत असल्याने तसेच धरणातील विसर्गामुळे चंद्रभागेचे वाळवंट आणि मंदिरे पाण्याखाली गेली आहेत .. अजूनही पाण्याची पातळी मोठ्या प्रमाणात वाढणार असल्याने सध्या चंद्रभागेत स्नानाला येणाऱ्या भाविकांनी काठावर उभारून केवळ पाय धुण्याचे आवाहन प्रशासनाने केले आहे.



आषाढी यात्रा काळात पंढरपूरमध्ये पूर येऊ नये, यासाठी मुख्यमंत्र्यांनी दिलेल्या सूचनेनुसार प्रशासन कार्यवाही करीत आहे. त्यामुळेच सध्या उजनी धरणाची पाणी पातळी ही 70 टक्क्यांपर्यंत आणून ठेवण्याचा प्रयत्न धरण प्रशासनाकडून सुरू आहे. तरीही पुणे आणि धरणाच्या पाणलोट क्षेत्रात जोरदार पाऊस सुरू असल्याने उजनी धरणातून सध्या 40 हजार क्युसेक वी विसर्गाने पाणी सोडण्यात येत आहे. याच पद्धतीने वीर धरणातही पाणीसाठा वाढल्याने येथून 15000 क्युसेक एवढे पाणी सोडण्यात येत आहे. सध्या पंढरपूर परिसरातही जोरदार पाऊस सुरू असल्याने फ्री कॅचमेटमधून येणारा पाण्याचा ओघही मोठ्या प्रमाणात आहे. त्यामुळे सध्या चंद्रभागेत अजूनही पाण्याची पाणी पातळी मोठ्या प्रमाणात वाढणार आहे.

## चंद्रभागेत स्नान न करण्याचे आवाहन

भीमा नदी पात्रात उजनी धरणाच्या विसर्गामुळे येणारा पाण्याचा ओघ तसेच वीरधरणातून नदीपात्रात सोडण्यात आलेल्या पाण्यामुळे चंद्रभागा नदीपात्रात चाळीस हजार क्युसेक पेक्षा अधिक विसर्ग प्रवाहित झालाय. चंद्रभागेच्या वाळवंटातील सर्व मंदिर पाण्याखाली गेली आहेत .दरम्यान सर्व संतांच्या पालखी पंढरीकडे मार्गस्थ झाल्या आहेत . अनेक भाविक पंढरपुरात आल्यानंतर चंद्रभागा नदीत स्नान करून देवाचे दर्शन घेण्यासाठी पुढे जातात .आषाढी एकादशीला आता केवळ पंधरा दिवस राहिले आहेत . दरम्यान भाविकांच्या गर्दीमुळे स्नान करताना पाण्याचा अंदाज येणार नाही .म्हणून खबरदारीचा उपाय म्हणून भाविकांनी चंद्रभागेत स्नान न करण्याचे आवाहन प्रशासनाकडून केले जात आहे. यासाठी 40 कोळी बांधवांना आपत्कालीन यंत्रणेत सामावून घेत भाविक बुडू नयेत याची खबरदारी प्रशासनाकडून घेतली जात आहे .

# मानवी शरीराचे अवयव ओळखण्याचा जागतिक विक्रम

तामिळनाडूतील तंजावर येथील आद्रिका विवेक नावाच्या चिमुकलीने एका असाधारण कामगिरीत ३० सेकंदांच्या कालावधीत मानवी शरीराचे जास्तीत जास्त अवयव ओळखण्याचा विश्वविक्रम केला आहे. ही उल्लेखनीय कामगिरी २४ ऑगस्ट २०२३ रोजी घडली, जेव्हा २ वर्षे, ४ महिने आणि २७ दिवसांच्या कोवळ्या वयात आद्रिकाने २२ मानवी शरीराचे अवयव ओळखले. या उत्कृष्ट कामगिरीला वर्ल्डवाइड बुक ऑफ रेकॉर्ड्सने मान्यता दिली आहे, ज्यामुळे इतिहासात आद्रिकाचे स्थान मजबूत झाले आहे. यापूर्वी १ डिसेंबर २०२२ रोजी महाराष्ट्रातील पुणे येथे मानवी शरीराचे बहुतेक अवयव ओळखणारा सर्वात लहान मुलगा विरेनने.. १ वर्ष ९ महिन्यांच्या वयात १ मिनिट १६ सेकंदात २२ मानवी शरीराचे अवयव ओळखून जागतिक विक्रमांच्या पुस्तकात




एक विक्रम नोंदवला आहे. त्यांनी १ वर्ष ९ महिन्यांच्या वयात १ मिनिट १६ सेकंदात २२ मानवी शरीराचे अवयव ओळखले आणि जागतिक रेकॉर्ड बुकमध्ये एक विक्रम नोंदवला.

ज्ञान आणि संज्ञानात्मक क्षमतेचे मंत्रमुग्ध करणारे प्रदर्शन करून आद्रिका विवेकची असाधारण प्रतिभा दाखवण्यात

**लोकमानस**

**मुलखावेगळी माणसं**

आली. अवघ्या ३० सेकंदात, आद्रिकाने मानवी शरीराच्या विविध अवयवांची सहज ओळख करून दिली, ज्यामुळे प्रेक्षकांना आश्चर्यचकित केले. तपशीलांकडे पाहण्याच्या उल्लेखनीय नजरेने, तिने डोके, डोळे, नाक, तोंड, कान, हात, पाय, बोटे आणि पायाची बोटे अशा विविध शरीराच्या भागांची अचूक नावे दिली. इतक्या लहान वयात तिच्या असाधारण संज्ञानात्मक विकासातून तिची जन्मजात बुद्धिमत्ता आणि ज्ञानाची तहान दिसून आली.

३० सेकंदांच्या कमी कालावधीत सर्वाधिक मानवी शरीराचे अवयव ओळखून इतिहासात तिचे स्थान मजबूत करून, वर्ल्डवाइड बुक ऑफ रेकॉर्ड्सने आद्रिका विवेकच्या कामगिरीला योग्य मान्यता दिली आहे. हा अविश्वसनीय विक्रम मानवी कामगिरीच्या इतिहासात कायमचा कोरला जाईल आणि अनेकांसाठी प्रेरणादायी ठरेल.केवळ ३० सेकंदात मानवी शरीराचे जास्तीत जास्त अवयव ओळखण्याचा आद्रिका विवेकने मिळवलेला जागतिक विक्रम हा एक उल्लेखनीय पराक्रम आहे. तिच्या अपवादात्मक संज्ञानात्मक क्षमता आणि ज्ञानाची तहान तिला इतिहासाच्या इतिहासात घेऊन गेली आहे. ही कामगिरी पालक, शिक्षक आणि संपूर्ण समाजाला तरुण मनांच्या क्षमतेचे संगोपन आणि विकास करण्यासाठी प्रेरणा देणारी ठरते.

# वैष्णोदेवी तीर्थयात्रेच्या मार्गावर मुसळधार पावसानंतर भूस्खलन

कटरा, दि. २४ वृत्तसंस्था

जम्मू-काश्मीरमध्ये मुसळधार पाऊस झाला आहे. या मुसळधार पावसामुळे रियासी जिल्ह्यातील त्रिकुटा पर्वतावर असलेल्या वैष्णोदेवी मंदिर तीर्थयात्रेच्या मार्गावर भूस्खलन झाल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे वैष्णोदेवीला जाण्यासाठी काही मार्गावरील रेल्वेची सेवा विस्कळीत झाल्याचं वृत्त समोर आलं आहे. तसेच वैष्णोदेवी मंदिराकडे जाणाऱ्या नवीन ट्रॅकवर सोमवारी मोठ्या प्रमाणात भूस्खलन झालं. त्यामुळे तेथील स्थानिक प्रशासनाने बॅटरी कार सेवा बंद केली आहे.



तसेच जम्मू-काश्मीरमध्ये आणखी मोठ्या प्रमाणात पाऊस पडण्याचा अंदाज हवामान खात्याने वर्तवला आहे. तर ईशान्य सीमावर्ती रेल्वेच्या न्यू हाफलोंग-जटिंगा विभाग रेल्वे ट्रॅकवर भूस्खलन झाल्यामुळे सोमवारी संध्याकाळपासून दक्षिण आसाम, त्रिपुरा, मणिपूर आणि मिझोरम आणि गुवाहाटी मार्गे देशाच्या उर्वरित भागांमधील रेल्वे सेवा बंद विस्कळीत झाल्याची माहिती एका अधिकाऱ्याने सांगितली आहे. या संदर्भातील वृत्त झी बिझनेसने दिलं आहे.

जम्मूच्या डोंगराळ भागात झालेल्या मुसळधार पावसामुळे रियासीतील कटरा येथील माता वैष्णोदेवी मंदिराकडे जाणाऱ्या हिमकोटी मार्गावर देखील भूस्खलन झालं आहे. त्यानंतर हा मार्ग तात्पुरता बंद करण्यात आला आहे. भूस्खलनानंतर तेथे पसरलेला ढिगारा हटवण्यासाठी माता वैष्णोदेवी श्राइन बोर्डाने तातडीने त्याठिकाणी पथक पाठवण्यात आल्याचं वृत्तात म्हटलं आहे. तसेच या घटनेत कोणतीही जीवितहानी झालेली नाही.

# इस्रायलमधून ५९४ भारतीय मायदेशी परतले

नवी दिल्ली, दि. २४ वृत्तसंस्था

इस्रायल-इराण तणावाच्या पार्श्वभूमीवर ऑपरेशन सिंधू अंतर्गत भारतीय नागरिकांना त्यांच्या मायदेशी परतण्याची प्रक्रिया सुरू आहे. मंगळवारी इस्रायलमधून ५४९ भारतीय नागरिकांना घेऊन हवाई दलाची तीन विमाने नवी दिल्लीत पोहोचली. पहिल्या विमानात १६१, दुसऱ्या विमानात १६५ आणि तिसऱ्या विमानात २६८ भारतीय नागरिकांना आणण्यात आले. केंद्रीय परराष्ट्र राज्यमंत्री (एमओएस) पवित्रा मार्गेरिटा आणि केंद्रीय राज्यमंत्री डॉ. एल. मुरुगन यांनी विमानतळावर भारतीय नागरिकांचे स्वागत केले. परदेशातील भारतीय नागरिकांची सुरक्षा ही सरकारची प्राथमिकता आहे, असे परराष्ट्र मंत्रालयाने म्हटलं आहे. परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी ट्विट केले की ऑपरेशन सिंधूचा इस्रायल टप्पा २३ जून २०२५ रोजी सुरू झाला. यामध्ये १६१ भारतीय नागरिकांची पहिली तुकडी जॉर्डनमधून मायदेशी परत आणण्यात आली. त्यानंतर, हवाई दलाच्या सी-१७ विमानाने इस्रायलमधून १६५ प्रवाशांना परत आणले. मंगळवारी दुपारी २६८ नागरिकांना घेऊन तिसरे विमान भारतात पोहोचले. मशहादहून नवी दिल्ली येथे पोहोचलेल्या एका विशेष विमानाने २९२ भारतीय नागरिकांना इराणमधून बाहेर काढण्यात आले. आतापर्यंत इराणमधून २२९५ भारतीय नागरिकांना परत आणण्यात आले आहे.

# डिफेंडरचे साहसवीराना आवाहन

**चलती का नाम गाडी**



डिफेंडर एका नवीन प्रकारच्या स्पर्धेत उतरण्यासाठी साहसाची अविश्वसनीय भावना असलेल्या व्यक्तींचा शोध घेत आहे. नवीन डिफेंडर ट्रॉफी भूतकाळातील ट्रॉफी आणि चॅलेंज इव्हेंट्सपासून प्रेरित आहे परंतु प्रशिक्षण आणि स्पर्धेच्या तीन कठीण फेऱ्यांमध्ये स्वतःचा वारसा निर्माण करेल. केवळ अशक्य गोष्टींना स्वीकारणाऱ्या आणि जागतिक संवर्धनाची आवड असलेल्यांनाच अर्ज करता येणार आहे. डिफेंडर हा दशकांपासून शोधक आणि मोहीम नेत्यांच्या पसंतीच वाहन आहे आणि नवीन जागतिक उपक्रम ५० हून अधिक देशांमध्ये प्रवेशिका आमंत्रित करत आहे. स्थानिक निवडी या उन्हाळ्यात सुरू होतील, पुढील वसंत ऋतूमध्ये राष्ट्रीय अंतिम फेरीत कोण पोहोचेल हे ठरवले जाईल. २०२६ मध्ये आफ्रिकेत डिफेंडर संवर्धन भागीदार टस्कसह आयोजित जागतिक अंतिम फेरीत कोण पोहोचेल याबद्दल जगभरात उत्सुकता आहे.

विजेत्यांना एका महाकाव्य मोहिमेसाठी एकत्र येण्याची संधी मिळेल जी डिफेंडर ट्रॉफी लोकांवर आणि त्याच्या भेटी असलेल्या ठिकाणी सकारात्मक आणि चिरस्थायी वारसा सोडेल याची खात्री करेल.एका महाकाव्य मोहिमेला महाकाव्य वाहनाची आवश्यकता असते. नवीन डिफेंडर ११० ट्रॉफी एडिशन हा साहसी खेळ उत्साही लोकांच्या नवीन पिढीसाठी सादर करेल, कारण ही स्पर्धा जागतिक ऑनलाइन प्रेक्षकांद्वारे पाहिली जाईल. या कार्यक्रमाचा उत्साह रस्त्यावर आणत, ट्रॉफी एडिशन दोन खास वारसा-प्रेरित रंगांमध्ये डीप सँडग्लो यलो आणि केसविक ग्रीन विशेषतः निवडलेल्या साहस-तयार स्पेसिफिकेशनसह ऑर्डर करण्यासाठी उपलब्ध आहे.

# काळानुसार एसटी सेवेत परिवर्तन होणे आवश्यक आहे का?

**वाद संवाद**

**१] आनंद मराठे [जेष्ठ नागरिक ]**

होय बदलत्या काळानुसार महाराष्ट्रातील अगदी खेड्यापाड्यात दुर्गम भागात पोचणाऱ्या एसटी सेवेत बदल हा व्हायलाच हवा. एसटीचे सर्वांगाने अत्याधुनिकरण झाले तरच आर्थिक दृष्टिकोनातून डबघाईला आलेली एसटीची सेवा हि पुढे कायम सुरळीत ठेवता येण शक्य आहे. खाजगी प्रवासी वाहतूक सेवांच्या तुलनेत एसटी चे जुने स्वरूप म्हणजे भंगार आहे यात बदल केल्याशिवाय तरणोपाय नाही.

**२] जगदीश माळी [ एसटी चालक ]**

एसटीची सेवा हि महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाची सर्वात स्वस्त आणि दूरगामी सेवा आहे. मध्यंतरी दिवंगत अभिनेते विक्रम गोखले याना एसटी चे ब्रँड अँबेसेडर बनवून नवे बदल केले गेले. मात्र तरी देखील प्रवाशांची एसटीकडे पाठच आहे. एसटीचे खाजगीकरण केले गेले आणि अत्याधुनिक सुविधांनी सुसज्ज अशी वाहन जर आणली तर एसटीची सेवा हि वेगाने धावू शकेल असं वाटत.

संकलन –संयोजन
**सुबोध रणशेवरे**
संपर्क -९८३३१४६३५६
ईमेल -subodh.ranshevre @rediffmail.com

# ऑपरेशन सिंदूरमध्ये सहभागी होता म्हणून तुम्हाला कोणतीही सूट मिळणार नाही

## एनएसजी कमांडोला सुप्रीम कोर्टाचा दणका

नवी दिल्ली, दि. २४ वृत्तसंस्था

भारतीय दंड संहितेच्या कलम ३०४-ब (हुंडाबळी) अंतर्गत पत्नीच्या हत्येचा आरोप असलेल्या एका ब्लॅक कॅट कमांडोला दिलासा देण्यास सर्वोच्च न्यायालयाने आज नकार दिला. भारताने पाकिस्तानविरुद्ध राबवलेल्या 'ऑपरेशन सिंदूर'मध्ये आपण सहभागी होतो, असे कमांडोने सांगताच, " तुम्ही ऑपरेशन सिंदूरचा भाग होता; पण त्यामुळे तुम्हाला घरी अत्याचार करण्याचे स्वातंत्र्य मिळत नाही," असे सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले.

राष्ट्रीय सुरक्षा रक्षक दलातील ब्लॅक कॅट कमांडोवर भारतीय दंड संहितेच्या कलम ३०४-ब (हुंडाबळी) अंतर्गत पत्नीची हत्या केल्याचा आरोप आहे. हुंड्यासाठी शारीरिक व मानसिक छळ केल्याचा मृत पत्नीच्या नातेवाईकांचा आरोप आहे. पोलिसांसमोर शरण येण्यापासून सूट मिळावी यासाठी कमांडोने दाखल केलेल्या विशेष रजेत वाढ मिळावी यासाठी त्याने उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. ती फेटाळल्यानंतर त्याने सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली हेती. आजच्या सुनावणीवेळी कमांडोच्या वकिलांनी युक्तीवाद करताना म्हटलं की, या प्रकरणातील साक्षीदारांमध्ये मोठी तफावत आहे. यावेळी न्यायमूर्ती उज्जल भुयान यांनी स्पष्ट केले की, तुम्ही ब्लॅक कॅट कमांडो म्हणून ऑपरेशन सिंदूरमध्ये सहभागी होता म्हणून तुम्हाला कोणतीही सूट मिळणार नाही. तुम्ही इतके शारीरिकदृष्ट्या तंदुरुस्त आहात की, तुम्ही एकट्यानेच तुमच्या पत्नीचा गळा दाबला असू शकतो." तसेच न्यायामूर्ती विनोद चंद्रन यांनी उच्च न्यायालयानेही कमांडोला दिलासा नाकारला होता, हे स्पष्ट केले. तसेच विशेष रजा याचिकेवर सरकारी पक्षाकडून उत्तर मागवत नोटीसही बजावली. "शरण येण्यापासून सूट देण्याची विनंती आम्ही फेटाळत आहोत. सहा आठवड्यांत उत्तर दाखल करण्यासाठी एसएलपीवर नोटीस बजावा," असे खंडपीठाने स्पष्ट केले.

# झेलेन्स्कींच्या हत्येचा कट उधळला, थोडक्यात वाचला जीव

कीव्ह, दि. २४ वृत्तसंस्था

गेल्या तीन वर्षांपासून रशिया आणि युक्रेन यांच्यातील युद्ध सुरू आहे. दोन्ही देशांकडून एकमेकांवर हल्ले सुरु आहेत. या हल्ल्यात युक्रेनचे मोठे नुकसान झाले आहे. अशातच आता युक्रेनचे राष्ट्राध्यक्ष वोलोदिमिर झेलेन्स्की यांच्या हत्येचा कट उधळण्यात आला आहे. रशियाची गुप्तचर संस्था एफएसबीने एका स्लीपर एजंटला सक्रिय केले होते. मात्र त्याला वेळीच अटक केल्याने झेलेन्स्की यांचा जीव थोडक्यात वाचला आहे.

युक्रेनची गुप्तचर संस्था एसबीयूचे प्रमुख वासिल माल्युक यांनी दिलेल्या माहितीनुसार. या एजंटला रशियाने दशकांपूर्वी आपल्या ताफ्यात सामील केले होते. हा एजंट पोलंडमधील रझेझोव विमानतळावर झेलेन्स्की यांना गोळ्या घालणार होता. या ठिकाणी ब्रिटिश सैनिक देखील तैनात आहेत.मात्र पोलंडच्या होमलँड सिक्युरिटी एजन्सीच्या मदतीने युक्रेनने हा कट उधळून लावला. यामुळे झेलेन्स्की यांचा जीव वाचला आहे. युक्रेनची गुप्तचर संस्था एसबीयूने दिलेल्या माहितीनुसार, हा एजंट निवृत्त लष्करी अधिकारी आहे, जो युएसएसआरच्या काळात सेवा देत होता. मात्र रशियाने त्याला आपल्या बाजूने वळवले होते. तो झेलेन्स्की यांच्यावर हल्ला करणार होता, मात्र त्यापूर्वीच त्याला पकडण्यात आले आहे. दरम्यान, युद्ध सुरू झाल्यापासून युक्रेनमध्ये ५०० हून अधिक रशियन हेरांना पकडले असल्याची माहिती समोर आली आहे.

महासागर MUMBAI
RNI No.: MAHAMAR/2016/79101
Printed, published and owned by Shrikrishna Tansukhdas Chandak at S. R. publication, Mohan - Arjun Compund, Godown No. 8, 9 & 10, Near Ghartan Pada, Vaishali Nagar Last Bus Stop, Dahisar (E),Mumbai - 400068 and Published From Bora Bazar Street,Fort, Mumbai -400001. Editor - SHRIKRISHNA TANSUKHDAS CHANDAK

महासागर मुंबई
हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी एस. आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंपाऊंड, गोडावून नं. ८,९,१०, घरटन पाडा जवळ, वैशाली नगर लास्ट बस स्टॉप, दहिसर ईस्ट, मुंबई- ४०००६८ येथे छापून बोरा बाजार स्ट्रीट, फोर्ट, मुंबई- ४०० ००१ येथे प्रसिद्ध केले. संपादक : श्रीकृष्ण तनसुखदास चांडक (मो. ९९२२९७००२३) Email : mumbaimahasagar@gmail.com
RNI No.: MAHAMAR/2016/79101